इतिहासातील स्मृतिचित्रे

अरविंद ताटके

श्री विद्या प्रकाशन

श्री विद्या प्रकाशन, पुणे

ई/३४२

इतिहासातील स्मृतिचित्रे

अरविंद ताटके

श्री विद्या प्रकाशन, पुणे

इतिहासातील स्मृतिचित्रे

किंमत तीन रुपये

प्रकाशक
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्री विद्या प्रकाशन
२५० क/१६ शनिवार पेठ,
अष्टभुजा देवी रस्ता, पुणे २

© अरविंद ताटके

प्रथमावृत्ती ३० एप्रिल १९६८
अक्षय्यतृतीया १८९०

मुखपृष्ठ
दलाल आर्ट स्टुडिओ
मुंबई

आतील चित्रे
ग. वि. देशपांडे
पुणे

मुद्रक
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय प्रा. लि.
नारायण पेठ,
पुणे २.

इतिहास-संशोधक

श्री. य. न. केळकर

यांना

आदरपूर्वक अर्पण

काळाचा पडदा

फुरसत सापडेल तेव्हा ऐतिहासिक ग्रंथ वाचण्याचा नाद मला आहे. १९५९ साली मी नाना फडणविसांचे व्यक्तिचित्र प्रथम लिहिले. पुण्याचे माझे मित्र अन् प्रख्यात इतिहाससंशोधक श्री. य. न. केळकर यांना ते इतके आवडले की त्यांनी आणखी व्यक्तिचित्रे लिहिण्याची सूचना मला आपुलकीने केली. त्यामुळे माझा उत्साह वाढला अन् मग 'दीपावली'-च्या दिवाळी अंकात वेगळ्याच धर्तीने मी 'आनंदीबाई' रंगविली. दिवाळी अंकाचा परामर्श घेताना मुंबई नभोवाणीवर तिचा खास उल्लेख करण्यात आला. त्यामुळे आणखी काही ऐतिहासिक चरित्रे रेखाटण्याची स्फूर्ती मला झाली अन् त्याचेच फळ म्हणजे ही 'इतिहासातील स्मृतिचित्रे'.

शाहू अन् महादजी शिंदे या व्यक्तिरेखा मी या पुस्तकासाठी नवीन लिहिल्या; इतर सहा, विविध नियतकालिकांत प्रसिद्ध झाल्या. त्यांचा या ग्रंथात समावेश करताना योग्य ते संस्कार करण्यास मी विसरलो नाही. ही सारी चित्रे मी ऐतिहासिक कागदपत्रांच्या अन् ग्रंथांच्या भक्कम आधारानिशी लिहिली. विखुरलेली माहिती संकलित करून मी या व्यक्तिरेखा सजविल्या, नटविल्या. साऱ्या व्यक्तीचे ठसठशीत चित्र डोळ्यापुढे उभे रहावे अशा पद्धतीनेच मी ही व्यक्तिचित्रे लिहिली. शाळा-कॉलेजातील प्रौढ मुले अन् इतर सरसकट वाचकांना इतिहासा-सारख्या रूक्ष समजल्या जाणाऱ्या विषयात गोडी उत्पन्न व्हावी अन् नंतर त्यांनी इतर ग्रंथ मुळातून वाचावे या हेतूनेच मी हे काम पत्करले. ते कितपत साधले ते ठरविण्याचा हक्क वाचकांचा.

माझे पुण्याचे इतिहासप्रिय मित्र श्री. पां. रा. तथा तात्यासाहेब ढमढेरे मला वेळोवेळी जुनी व दुर्मिळ ऐतिहासिक पुस्तके अल्प किंमतीत विकत देत अन् विविध तऱ्हेची माहितीही उत्साहाने पुरवीत.

माझे पितृतुल्य हितचिंतक श्री. य. न. केळकर यांनी काही दुर्मिळ पुस्तके मिळवून दिली. मुद्रणप्रत वाचून मार्मिक सूचनाही त्यांनी केल्या. प्रत्यक्ष भेटीत श्री. य. न. केळकर ऐतिहासिक चर्चा नेहमी करीत, नवीन माहिती सांगत अन् दुर्मिळ पुस्तकेही भेट देत. या तिघांचे आभार न मानता फक्त ऋणनिर्देश तेवढा करतो.

डॉ. भगवानराव कुंटे अन् डॉ. मुकुंदराव आगासकर या दोघांनी आपले शाहू-महादजी शिंदे यावरील अप्रकाशित प्रबंध स्नेहभावाने मला पहावयास दिले. या व्यक्तींविषयी चर्चा केली अन् तत्संबंधी काही मार्मिक सूचनाही त्यांनी केल्या. या उभयतांचा मी मनःपूर्वक आभारी आहे.

सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक कै. शंकरराव जोशी हा ग्रंथ पहाण्यास हयात नाहीत म्हणून फार हळहळ वाटते. माझ्यावरील त्यांच्या अकृत्रिम लोभाचे प्रतीक म्हणूनच की काय त्यांच्या पत्नींनी मला त्यांच्या ग्रंथसंग्रहातील पेशवे दप्तराचे काही ग्रंथ भेट दिले. या न फिटणाऱ्या ऋणाचा निर्देश करणे मला अगत्याचे वाटते.

मित्रवर्य श्री. दीनानाथ दलाल यांचा माझ्यावर लोभ आहे. 'आनंदीबाई' अन् 'दुसरे बाजीराव' 'दीपावली'तून प्रकाशात आणताना माझ्यावर पृष्ठमर्यादेचे बंधन त्यांनी अजिबात घातले नाही. त्यांचे आभार न मानता त्यांच्या सद्भावनेचा फक्त उल्लेख करतो.

प्रकाशक श्री दा. दि. कुलकर्णी यांची ओळख अगदी नवी. पण इतिहासप्रेमामुळे त्यांनी मोठ्या हौसेने हा ग्रंथ प्रकाशित केला. त्यांचा मी अतिशय आभारी आहे. त्याचप्रमाणे मुद्रक श्री. राजाभाऊ माटे यांचाही मी फार अभारी आहे.

अशीच आणखी काही स्मृतिचित्रे सादर करण्याचे आश्वासन हा 'काळाचा पडदा' दूर करण्यापूर्वी वाचकांना देतो.

पुरुषोत्तम निवास,
नौपाडा, ठाणे

— **अरविंद ताटके**
३१-१२-१९६७

अनुक्रमणिका



१ : अजातशत्रू शाहू

छत्रपती शिवाजी महाराजांचा नातू, संभाजीचा मुलगा अन् मराठ्यांचा तिसरा छत्रपती शाहू याचे चरित्र अनेक दृष्टींनी मननीय आहे. तो आख्यायिकांचा विषय बनला होता ही एकच गोष्ट त्याची लोकप्रियता सिद्ध करण्यास पुरे आहे. तो शूर नव्हता, पण शहाणा खचित होता. मुत्सद्दी नव्हता, पण विविध प्रकृतीच्या अनेक मंडळींचे मन काबीज करण्याची किमया त्याला साधली होती. पराक्रमी नव्हता, पण पराक्रमी माणसांची पारख करून त्यांच्या द्वारे राज्यशकट सुरळीतपणे चालविण्याची चतुराई त्याच्या ठिकाणी होती. आजोबा शिवाजी याच्यासारखा लोकोत्तर तो नसेल, पण लोकसंग्रह करण्यात त्याला तोड सापडणे कठीण. लढाया खेळण्याचे कसब त्याच्या ठिकाणी नव्हते, पण बाजीरावासारख्या रणशूराला पेशवेपद देऊन त्याच्याकरवी त्याने युद्धप्रसंग निभावून नेले. 'एक लाख फौज अन् बाजीराव यात मला निवड करावयास सांगितली तर मी बाजीरावाचीच निवड करीन' असे तो अभिमानाने म्हणे. तो स्वास्थ्यप्रिय वाटला तरी स्वार्थी खास नव्हता. रसिकतेत, चैनीत अन् ख्यालीखुशालीत तो मग्न असला तरी राज्याची अभिवृद्धी करण्याची विस्मृती त्याला कधीही होत नाही. साताऱ्यास बसून, पेशव्यांच्या

कारभारावर तो घारीच्या नजरेने, डोळ्यात तेल घालून सदैव लक्ष ठेवताना आढळतो. पेशवे त्याला पित्यासमान मानताना दिसतात. हा पराक्रमी म्हणून माहीत नसलेला, पण मराठी राज्य वर्धिष्णू व्हावे यासाठी सदैव झटणारा शाहू, नळराजाप्रमाणे 'पुण्यश्लोक' या पदवीला पात्र ठरला. त्याची कारकीर्द मोठी भाग्यशाली ठरली. चाळीस वर्षे छत्रपतिपद मोठ्या रुबाबाने सांभाळणारा असा हा मराठ्यांचा पहिला अन् शेवटचाच छत्रपती. 'राखावी बहुतांची अंतरे' ही समर्थोक्ती त्याने शिरोधार्य मानली अन् शिवाजीने निर्मिलेल्या स्वराज्याचे रूपांतर पेशव्यांच्या सहाय्याने याने साम्राज्यात केले. याची ही बहादुरी इतिहासाला विसरता येणार नाही.

शिवाजीचा मुलगा संभाजी याची पत्नी येसूबाई हिच्या पोटी दि. १८ मे १६८२ रोजी कुलाबा जिल्ह्यात माणगाव तालुक्यात गांगवली गावी शाहू जन्माला आला. प्रथम त्याचे नाव शिवाजी असेच ठेवण्यात आले पण मोगलांच्या बंदिवासात त्याचे नाव शाहू पडले व ते रूढ झाले. औरंगजेब त्याला म्हणे— "तुमचे आजे शिवाजी महाव्रात्य, प्रत्यक्ष सैतान. पण तुम्ही नातू तसे नाही, तुम्ही साव, सच्चे... तुमचे भले करावे असेच आमच्या मनात सदैव वागते." तेव्हापासून 'साव' नावावरून शाहू हे नाव प्रचलित झाले. ग्रँट डफ, रियासतकार सरदेसाई, संभाजी कर्ते वा. सि. बेंद्रे (क्षत्रपति संभाजी महाराज, स. १९६० पृ. ६२४) अन् छत्रपति शाहू या प्रबंधाचे कर्ते (मुंबई विद्यापीठाने मंजुरी दिलेला प्रबंध, स. १९६४ अप्रकाशित) डॉ. कुंटे वगैरे अभ्यासकांकडून या आख्यायिकेला दुजोरा मिळतो, त्यावरून ती अगदीच गप्प असावी असे काही मानता येणार नाही.

शाहूचे शिक्षण रायगडास झाले. जोत्याजी केसरकर हा सेवक त्याचा विद्यागुरू म्हणून सांगता येईल. घोड्यावर बसणे, निशाण मारणे वगैरे विद्या तो त्याच्याकडून शिकला. संभाजीने एकदाच त्याला स्वारीवर

नेलेले दिसते, पण तेव्हा तो फारच लहान होता. त्याचा बापाशी संबंध फारच कमी आहे. द. ब. पारसनिसांच्या ' इतिहाससंग्रह ' मासिकात बापाने त्याला मांडीवर घेतले असल्याचे एक चित्र पहावयास मिळते. पुढे संभाजीचा वध (दि. ११–३–१६८९) वगैरे दुर्दैवी घटना घडल्याने लहानपणीच त्याचे पित्याचे छत्र उडून गेल्याचे दिसते. एकंदरीत बापाशी त्याचा निकट संबंध आल्याचे इतिहासात नमूद नाही.

शाहू मोगलांच्या अटकेत (दि. ३-११-१६८९) पडला तेव्हा तो सात वर्षांचा होता. त्याची आई येसूबाई ही देखील त्यांच्याबरोबर होती. त्याची अठरा वर्षे बंदिवासात गेली म्हणजे त्याच्या ऐन उमेदीचा अन् तरुणपणचा काळ मोगलांच्या छावणीत वाया गेला. तिथे झालेले काही संस्कार त्याला कायमचे चिकटले. औरंगजेबाची मुलगी झिन्नतुन्निसा बेगम त्याच्यावर पुत्रवत प्रेम करी. ही अविवाहीत असून औरंगजेबाचा खाजगी कारभार सांभाळी. शाहू छावणीत आला तेव्हा ती शेहेचाळी-सच्या घरात होती, म्हणजे चांगलीच पोक्त होती. आचरणाने पवित्र अन् स्वभावाने उदार असल्याने तिची शाहूवर माया जडली— ती त्याची उपकारकर्त्री बनली. औरंगजेब पडला कडक धर्माचरणी. संभाजीच्या निधनोत्तर मराठ्यांनी त्याला नुसते त्राही भगवान करून सोडले. त्यांची त्याने पुरी धास्ती घेतली. तशात मराठे शाहूच्या सुटकेसाठी हमखास खटपट करतील ही भीती त्याच्या मनात खदखदत होतीच. यावर उपाय म्हणून एक निराळेच अस्त्र त्याने बाहेर काढले. शाहूला त्याच्या परिवारासकट त्याने मुसलमान करण्याचे ठरविले. त्यामुळे शाहूच्या परिवारात नुसता आकान्त उडाला. शेवटी झीन्नतुन्निसा बेगमने मध्यस्थी केल्याने शाहू अन् त्याच्या मंडळींवरील प्रसंग टळला. पण दोन मराठे सरदारांना बाटवून औरंजेबाने आपला हेका पुरा केलाच. राजारामाच्या मृत्यूनंतर (दि. २–३–१७००) शाहू एकदा फार आजारी पडला. तो बरा

व्हावा म्हणून बेगम त्याच्या उशाशी सारखी बसून होती. औरंगजेबाच्या मनालाही द्रव फुटला. तो समाचाराला येऊन शाहूला बोलला, " चुलता गेला म्हणून तुझी तबियत बिघडली काय ? "

" आता आपणच मला सर्वांच्या ठिकाणी आहात. चुलत्याचं माझ्यावर प्रेम असतं तर आम्हांला ते रायगडास ठेवून जाते ना. " शाहू मोठ्या खुबीदारपणे म्हणाला. औरंगजेबाच्या स्वभावाची पछान त्याला पुरी असल्यानेच त्याने असे मुत्सद्दीपणाचे उत्तर देऊन वेळ मारून नेली असावी. तेव्हा पाताळयंत्री पातशहा म्हणाला,

" राजे, तुम्ही फिकीर कशाला करता ? दक्षिणेतली सारी मंडळी चोर आहेत. तुम्हीच तेवढे सच्चे. दक्षिणचे राज्य तुम्हासच देववीन. " एकंदरीत काय तर शिवाजीला अटकेत टाकणारा अन् संभाजीचा क्रूरपणे वध करणारा आलमगीरही शाहूशी प्रेमळपणे वागताना आढळतो. शाहूचा गोड स्वभाव हेही त्याचे कारण असावे.

या समझौत्यानंतर शाहूची दोन लग्नेही झाली. (नोव्हे.१७०३) राजसबाई अन् अंबिकाबाई ही त्याच्या बायकांची नावे... लग्न थाटात झाले. औरंगजेबाने त्याला आहेर म्हणून अक्कलकोट, इंदापूर, सुपे, बारामती अन् नेवासे या पाच परगण्यांची जहागीर तर करून दिलीच अन् वर बक्षिस म्हणून एक सोन्याची तलवार, रायगड सर केला त्या वेळी हाती लागलेली शिवाजीची भवानी तलवार नि अफजलखानाची तलवारही त्याला दिली. शाहू औरंगजेबाचे प्रेम संपादन करू शकला ही मोठ्या नवलाचीच गोष्ट होय. त्याच्या बंदिवासात शहाजीचा रक्षापुत्र रायभानजी याचीही त्याला बरीच मदत झाली अन् पुढे शाहूला गादीवर बसविण्यातही तो त्याचा प्रमुख सल्लागार होता. बंदिवासात असतानाच शाहूचा बाळाजी विश्वनाथाशी परिचय झाला अन् पुढे त्याने त्याला पेशवेपद देऊन तो दृढ केला. बेगमेशी संधान बांधून बाळाजीने त्याला मदत

केल्याचे (शाहू छत्रपती, डॉ. कुंटे, १९६४, अप्रकाशित) दिसते. दि. २० फेब्रुवारी १७०७ रोजी औरंगजेबाच्या निधनोत्तर त्याच्या मुलांत गादीबाबत तंटे सुरू झाल्यावर काही शर्तींनिशी शाहूची मोगलांच्या छावणीतून सुटका झाली (दि. ८ मे १७०७). येसूबाईची सुटका मात्र झाली नाही. त्याचे शल्य शाहूला टोचले नसेल असे म्हणवत नाही. त्याच्या दोन पत्नींपैकी एक अंबिकाबाई लौकर वारली. दुसरी सावित्रीबाई येसूबाईबरोबर अटकेतच राहिली. त्याच्या सुटकेने बेगमेला आनंद झाला तसे अपार दुःखही झाले. त्याच्यावर तिचे मुलासारखे प्रेम होते. तेव्हा त्याचा वियोग तिला दुःसह होणे साहजिकच होते. त्या वेळी ती बोलली– "आईची काळजी करू नये, लौकरच तिची रवानगी करीन." (डॉ. कुंटेकृत शाहू छत्रपति, पृ. ५१, गोगटेकृत शाहू चरित्र, स. १८९३, पृ. ४०) बेगमेला मात्र आपले आश्वासन लौकर पुरे करता आले नाही असे दिसते. कारण येसूबाई पुढे बराच काळ अटकेत राहिली. बेगमेच्या मृत्यूपूर्वी (दि. ७ मे १७२१) एक वर्ष आधीच तिची सुटका झाल्याचे दिसते. दि. १७०७ साली सुटका झाली त्या वेळी शाहू पंचविशीच्या घरात होता. अठरा वर्षे मोगलांच्या छावणीत बंदिवासात काढून आता तो हक्काची छत्रपतीची गादी मिळविण्यासाठी बाहेर पडला होता. त्याच्या जीवनाचे पहिले पर्व इथेच संपले असे म्हणावयास हरकत नाही.

सुटकेनंतर शाहूला अनेक मराठे सरदारांचे पाठबळ मिळाल्याने त्याचा मार्ग सुकर झाला. राजारामाची पत्नी ताराबाई हिने त्याला विरोध केला. ती त्याला 'जोगडा गोसावी' म्हणू लागली. त्याला कुणी भेटू नये अन् मदत करू नये असे फतवे तिने काढले. नवऱ्याच्या मृत्यूनंतर तिने औरंगजेबालाही टक्कर दिली होती. तेव्हा शाहू आता छत्रपतीच्या गादीवर बसणार हे तिला कसे आवडावे? बाई काही कमी कर्तबगार

नव्हती. औरंगजेब तिला 'सैतान' म्हणतो तर शिवभारतकार कवी परमानंद याचा नातू गोविंद परमानंद तिच्याविषयी म्हणतो–

दिल्ली झाली दीनवाणी । दिल्लीशाचे गेले पाणी
ताराबाई रामराणी । भद्रकाली कोपली

तात्पर्य, ती पराक्रमी होती. पण शाहूबाबत तिचे धोरण चुकले अन् फसलेही. त्यामुळे शिवछत्रपतींची ही कर्तृत्ववान सून कुविख्यात अन् सवता सुभा स्थापून स्वराज्यात द्रोह करणारी ठरली. पण अखेरीस खेडच्या लढाईत शाहूने तिचा पराभव करून सातारा घेतले. छत्रपतीची गादी शाहूने मिळविल्यावर हिने कोल्हापुरास छत्रपतीची वेगळी गादी स्थापण्याचाही प्रयत्न केला. पण तिथेही तिचे दुर्दैव आड आले. तिचा सावत्र मुलगा संभाजी याने तिला कैदेत टाकले अन् आपणच गादी पटकाविली. ताराबाई अन् तिचा मुलगा शिवाजी या मायलेकरांना त्याने पन्हाळ्यास कैदेत ठेविले. संभाजीची अन् शाहूचीही यथावकाश धुसफूस चालू झाली. पुढे श्रीनिवासराव प्रतिनिधीने संभाजीचा पाडाव (१७३०) करून त्याचा कबिला कैद केला त्यांत ताराबाई होती. शाहू तिला कोल्हापुरास पाठविण्यास तयार होता. पण ती म्हणाली,

"मला कोठे तरी कैदेतच रहावयाचे.... तुम्हांजवळच राहू." तेव्हा शाहूने तिला सातारच्या किल्ल्यातल्या राजवाड्यात ठेवले. हिचा मुलगा आधीच वारला होता (१७२७) अन् हिच्या नशिबी मात्र कैद आली. पुढे हिचे शाहूबद्दल मन पालटले अन् हिच्याच नातवाला (रामराजा) त्याने वारस ठरविले. तरी हिच्या मागचा भोगवटा काही चुकला नाही. शिवछत्रपतींच्या दोन्ही सुनांच्या अशा दोन तऱ्हा झाल्या. येसूबाईने मोगलांची कैद तीस वर्षे भोगली तर ताराबाई स्वकीयांच्या बंदिवासात तब्बल सत्तेचाळीस वर्षे होती. येसूबाईचा शेवट गोड झाला तसा ताराबाईलाही आपला नातू गादीवर बसलेला पहाण्याचे भाग्य लाभले

अशी ही कर्तृत्ववान पण बरीचशी दुर्दैवी असलेली ताराबाई पानिपतच्या हाहाःकारानंतर दि. ९ डिसेंबर १७६१ रोजी निधन पावली. सासरा शिवाजी, दीर संभाजी, नवरा, जाऊ येसूबाई, मुलगा शिवाजी अन् पुतण्या शाहू वगैरेंची मृत्युमालिका पहाणे तिच्या नशिबी होते हा इतिहास वाचल्यावर तिच्याविषयी करुणा उत्पन्न होते.

ताराबाईचा विरोध मोडून काढल्यानंतर शाहूचा पुढील मार्ग निष्कंटक झाला. स. १७१३ त त्याने बाळाजी विश्वनाथास पेशवाईची वस्त्रे दिली. त्याचा मुलगा बाजीराव अन् बाजीरावाचा मुलगा बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब या उभयतांनीही पेशवेपदावर असामान्य कर्तृत्व दाखविल्याने शाहूचा पुढील काळ स्वास्थ्यात गेला असे इतिहास सांगतो. साताऱ्यासच तो स्थायिक झाला. प्रथम तो सातारच्या किल्ल्यात रहात असे. नंतर त्याने दोन वसाहती बनवून त्यांची नावे गुरुवार व शनिवार पेठ अशी ठेवली. त्या वसाहतीलाच पुढे शाहूनगर नाव पडले. इथे त्याने स्वतःसाठी दोन राजवाडे (१७२१) बांधविले. दि. १२ जानेवारी १७०८ रोजी त्याने स्वतःस छत्रपती म्हणून राज्याभिषेक करवून घेतला अन् नंतर सुमारे चाळीस वर्षे त्याने राज्य केले. १७२० ते १७४० या काळात पेशवा या नात्याने बाजीरावाचे नाव गाजले. त्याच्या निधनोत्तर पेशवा झाला नानासाहेब, तोही बापासारखाच कर्तृत्ववान असल्याने शाहूस राज्याची चिंता अशी नव्हतीच.

स. १७१९ मध्ये बाळाजी विश्वनाथाने दिल्लीहून स्वराज्याच्या सनदा आणताना येसूबाईलाही सोडवून आणले. त्यामुळे शाहूच्या आनंदाला पारावार नव्हता. शिवछत्रपतींची ही ज्येष्ठ सून येसूबाई ही देखील दुर्दैवीच म्हटली पाहिजे. नवऱ्याच्या क्रूर वधाने आधीच हिचे काळीज करपून गेले असेल त्यांत तीस वर्षे मोगलांची कैद नशिबी आली. कैदेत ती सुखी असावी तर तेही नाही. दि.१९-४-१७०५ साली तिने

चिंचवडच्या मोरया देवांना पुढीलप्रमाणे हृदयस्पर्शी पत्र धाडले आहे : ‘ आज्ञेप्रमाणे आम्हास अहमदनगरास घेऊन आले....परंतु खर्चाची बहुत तंगचाई जाली. आमचा तनखा जो दिल्हा तेथे ताम्रांनी व हरिभक्तांनी व काही काळाने करून प्रतिकूल जाली, यामुळे द्रव्य येणें राहिले. येथें अहमदानगरी साहुकारांचे पांच सात सहस्र ब्रह्मस्व जालें. आतां कोणी देत नाही. मागिल्याच पैकियास तगादे लाविले आहेत. त्याच्यामुळे बहुत कष्टी होतो. दुःखसागर स्वामीस काय म्हणऊन ल्याहावा ? ’ ‘ ब्रह्मस्व ’ म्हणजे कर्ज झाले अशी ही शिवछत्रपतींची सून लिहिते. तेव्हा कैदेत तिला काय सौख्य लाभले असेल ते दिसतेच आहे. शाहू तिला फार मान देई. ‘ न्यू हिस्टरी ऑफ दि मराठाज ’ या आपल्या ग्रंथाच्या दुसऱ्या खंडात रियासतकार सरदेसायांनी या मायलेकरांबद्दल पुढील गौरवोद्‌गार काढलेले आहेत. शिवाजी आणि जिजाबाईप्रमाणेच शाहू अन् येसूबाईचे नाव महाराष्ट्रीयांच्या मनात कायमचे कोरले गेले आहे, हे वर्णन यथातथ्य मानले पाहिजे. येसूबाई १७३१ साली वारली तेव्हा कोल्हापूरच्या संभाजीने शाहूला पुढीलप्रमाणे दुखवट्याचे पत्र (ऐतिहासिक पत्रबोध संपादक सरदेसाई) धाडले : “मातुश्री येसूबाई साहेब यांसी वेथा होऊन कैलासवास जाला म्हणोन लिहिले, त्यावरून ममताविषये चित्तास परम खेद प्राप्त जाला. हा अयत्नी मार्ग ऐसाच आहे. वडील सर्वज्ञ आहेत. विवेकेंकरून चिताचें सांतवन होय ते केले पाहिजे. विशेष लिहावे तरी वडील सुज्ञ आहेत. ”

येसूबाई वारली तेव्हा शाहू पन्नाशीच्या घरात होता. बाजीरावासारखा पराक्रमी पेशवा लढाया जिंकत असल्याने त्याला काळजी अशी कसलीच नव्हती. बाजीरावाचा भाऊ चिमाजीअप्पा हाही भावाच्या तोडीस तोड असल्याने शाहूला या उभयतांचे मोठे कौतुक वाटे. पण वेळ पडेल तेव्हा शाहू बाजीरावाला खडसावण्यास मागे-पुढे पहात नाही. एकदा

बाजीरावाने त्याला लिहिण्यास-भेटण्यास खळखळ केली. तेव्हा शाहू-कडून त्याला पुढीलप्रमाणे (पेशवे दप्तरखंड १७, पत्र २८) पत्र गेले :

' तुम्हास हुजूर यावयाविसीची दहापाच आज्ञापत्रे सादर केली. परंतु यावयाचा विचार न केलात. ज्या ज्या युक्ती ल्याहाव्या, त्या त्या लिहिला असता; एकाहि पत्राचे उत्तर लेहून आला नाही हे स्वामीस अपूर्व दिसून आले आहे. याउपरी येणे असेल तरी पत्रदर्शनी स्वार होऊन हुजूर दर्शनास येणे येविसीची आज्ञा.......बहूत सितावीने येणे. याउपरी दिवस गतीवर न घालावे. सूज्ञ असा ? ' पण असे असले तरी बाजीरावा-शिवाय त्याचे पान हालत नसे. त्याच्या अनुपस्थितीत तो राजकारणाची धोरणे स्वतंत्रपणे आखण्यास धजत नाही. निजामाशी बोलणी करण्यास तो आपल्या सुमंताला पाठविण्यास राजी नसतो, कारण बाजीरावाचा संचार तेव्हा (१७३६) उत्तरेत असतो. ' सदरेस एखादी अधिकउणी गोष्ट नबाब बोलिला तर सुमंतास परम संकट प्राप्त होईल. हा विचार आम्हांस सुचतो यास्तव राजश्री पंतप्रधान याजकडील वर्तमान येऊं द्यावे. मग यासी रवाना करणे ते करावे. यैसे बहुत तपासिले बोलिले ' (पे. द. खं. १७, पत्र ५६) या पत्रावरून शाहूला बाजीरावाची योग्यता पुरेपूर माहीत असल्याचे कळते. तो असा प्रतापी अन् पराक्रमी असला तरी त्याच्या स्वाऱ्यांची अन् मुक्कामांची खडान्‌खडा माहिती शाहूला साताऱ्यात बसून हवी असते. ' प्रतिपदेस मजल दरमजल जाणार म्हणून वर्तमान येथे आले, त्यावरून राजश्री स्वामींनी पुसिले त्यास स्वामींनी तो पत्री काही लिहिले नाही परभारा वर्तमान भलतेही येथे येते, त्यावरून राजश्री आम्हांस पुसतात. आम्हांस तो होये नव्हे म्हणावयासी काही कळले असत नाही. तरी येविसीचे काये वर्तमान ते लिहिले पाहिजे. ' (पे. द. खं. १७, पत्र ६८) या पत्रावरून शाहूला

बाजीरावाच्या हालचालींची किती अन् कशी आतुरता लागली होती त्याची छान कल्पना येते.

बंदुकी ओतण्याबद्दलचा ध्यासही शाहूला लागलेला असतो. त्याबद्दलचा तगादा तो बाजीराव चिमाजीकडे लावताना आढळतो. 'पावसाळा आला आहे तेव्हा तोफेचे काय झाले?' असेही पत्र सातारहून बाजीरावास रवाना (पे. द. खं. १७, पत्र ४५) जाते. सांगण्याचा हेतू हा की शाहू साताऱ्यास काही स्वस्थ बसलेला नसे. बाजीरावाच्या कारभारावर त्याची सक्त नजर असते. चिमाजीही शाहूला फार मानतो. वसईचा त्याने पाडाव केल्यावर तो शाहूला लिहितो— ' मुख्य गोष्ट महाराजांचे पुण्ये वसई फत्ते जाहाली. अन्यत्रांस सेवक लोकांचा उपाय होता. असा अर्थ नाही. ' चिमाजी आजारी असल्याने त्याच्या भेटीस जाऊ शकला नाही. तेव्हा नम्रपणे शाहूला लिहितो—' शरीर केवळ अशक्त पडले आहे. घराबाहेर निघून पालकित बसून यावयाची ताकत नाही. वैद्य आणून उपाये चालता केला आहे...... हे शरीर महाराजांच्या अन्नाचे वाढले. महाराज मायेबाप आहेत. सेवकाची चिंता महाराजाखेरीज दुसरा कोण करणार?....महाराजांचे कृपेंकरूनच आरोग्य होईल. ' (पे. द. खं. १७, पत्र ९८) शाहूने स्वारीवर जाणे टाकले म्हणून रियासतकार सरदेसाई त्याला ठपका देताना आढळतात. तो अयोग्य आहे असे म्हणता येणार नाही. पण तो स्वारीवर जात नसे म्हणून बाजीराव त्याला कसे उद्वेगाने लिहितो पहा-- 'आम्ही कर्जामुळे खराब फौज शिबदी ठेऊन देशांतर पाहावे म्हणोन योजितो. त्यास हे समागमी. स्वामीची मर्जी त्याप्रकारे जाहाली आम्ही मात्र संकटात. आपला प्रकार असा. ' (पे. द. खं. १७, पत्र २३) बाजीरावही त्याच्या बैठ्या धोरणावर रुष्ट दिसतो. पण तो साताऱ्यास ठाण मांडून बसलेला असला तरी पेशव्यांवरील दराऱ्याची त्याची पक्कड सुटलेली दिसत नाही. वेळच पडली तेव्हा काही

काळ का होईना त्याने नानासाहेब पेशव्याला पदच्युत कसे केले (मार्च १७४७) त्याची हकिगत सर्वश्रुतच आहे. आपण स्वारीवर जात नाही. याचा फार बभ्रा झाल्यामुळेच की काय १७३७ मध्ये मिरजेवर स्वारी करून ते गाव त्याने १७३९ मध्ये कबजात आणलेले दिसते.

राज्यपद भोगीत असताना शाहू लौकिक व्यवहार अन् शिष्टाचार नियमाने पाळी. बाजीरावाला तो तिळगूळ धाडतो त्याप्रमाणे चिमाजीचा मुलगा सदाशिवराव याच्या मुंजीच्या वेळी आशीर्वाद पाठविण्यास तो चुकत नाही. लग्ने लावताना तो जसा आढळतो तसा रघुनाथरावाच्या मुंजीस अन् सदाशिवरावभाऊच्या लग्नास उपस्थित रहाण्यास तो अनमान करीत नाही. नानासाहेब लहानपणी साताऱ्यासच असे. शाहूचा त्याच्यावर लोभ होता. रास्त्यांच्या मुलीशी–गोपिकाबाईशी त्याचे लग्न शाहूच्या मध्यस्थीनेच झाले. छत्रपती असला तरी कर्तव्यात तो कसूर करीत नाही. विशिष्ट हेतूने पाठविलेल्या जिनसा घेण्याचे तो कटाक्षाने टाळतो. नानासाहेब पेशव्याला मुलगा झाल्याची बातमी समजल्यावर पत्राने आनंद व्यक्त केल्याशिवाय तो रहात नाही. सामान्य माणसात मिसळून तो सर्वांची भलाई मिळवी. बदकाच्या जोडीपासून ते आंब्याच्या रोपापर्यंतची विचारपूस तो पत्राने बाजीराव – चिमाजीकडे करताना दिसतो. प्रजेवर तो कुटुंबवत्सल पित्याप्रमाणे माया करी ही गोष्ट त्याच्या-विषयीच्या पत्रव्यवहारात दिसून येते.

शाहूची रहाणी साधी असे. लहानपणापासून त्याची प्रकृती उत्तम होती. आजार त्याला ठाऊक नव्हता. पोशाखही त्याचा साधाच असे. पांढरा चोळणा अन् सदरा असा त्याचा वेष. वर्णाने तो सावळा असला तरी मुद्रेवरून तरतरीत दिसे. शिकारीचा त्याला फार नाद असे. त्यासाठी चाळीस माणसे त्याच्याबरोबर असत. शिकारीनंतर राजवाड्यात येऊन तो विश्रांती घेई. भोजनोत्तर दरबारास जाई. तदनंतर खाजगी पत्रव्यवहार

पाही. येणाऱ्या खलित्यांना अन् बातम्यांना उत्तरे देण्यासाठी तो तोंडी मजकूर सांगे. नंतरचा वेळ नाच-करमणुकीत घालवी. हुक्का ओढण्याची त्याला संवय होती. उत्तम घोडे अन् कुत्रे बाळगण्याचा त्याला सोस होता. वाघाच्या शिकारीची त्याला फार हौस असे. पहा त्या विषयीचे हे (पे. द. खं. ८, पत्र २९) पत्र — ' राजेश्री बोलले की वाग पाठऊन द्यावासा करार केला होता. त्यास अद्यापि वाग आला नाही. कदाचित वाग दुखवऊा असेल तरी वाघीण तऱ्ही पाठऊन द्यावी. ' उंट व घोडी पाठविण्यास तो चिमाजीस लिहितो. पेशव्यांनी ४० कुत्रे त्याला धाडले. पण त्याला काही ते पसंत पडले नाहीत. तसे पेशव्यांना कळविल्याशिवाय तो रहात नाही. पाठविलेल्या घोड्यात खोड निघाली की त्याचे पत्र गेलेच. जनावरांचा त्याचा षौक एवढा की त्यासाठी तो ती हिमालयातून आणण्याची आज्ञाही पेशव्यांना देतो. बायको बरी व्हावी म्हणून तो दान करतो. जिनसांचा नाद त्याला भारी. परदेशातून हत्ती, सुऱ्या, कापड, गुलाबदाण्या, तंबाखू वगैरे पदार्थ (पे. द. खं. ८, पत्र ५२) तो कान्होजी आंग्र्यांच्यामार्फत मागवितो. कस्तुरीच्या कुप्या परदेशातून मागविणारा आमचा हा छत्रपती किती रसिक असेल त्याची कल्पना वाचकांनी करावी. घरात गृहसौख्य फारसे लाभत नसताना तो मात्र सर्वांशी गोडीने वागतो. अन् म्हणून रियासतकारांनी त्याला ' कुटुंबवत्सल ' (Family Man) म्हणून गौरविलेले (पे. द. खंड ८, प्रस्तावना) दिसते.

शाहूची दोन लग्ने कैदेत झाली हे मागे सांगितलेच. पैकी एक पत्नी बंदिवासातच निवर्तली. दुसरी सावित्रीबाई केव्हा निवर्तली त्याची नोंद इतिहासात नाही. सुटून आल्यावर त्याने आणखी दोन लग्ने (१७०९) केली. मोठ्या बायकोचे नाव सकवारबाई अन् धाकटीचे सगुणाबाई. खेरीज त्याला तीन रक्षाही होत्या. त्यांतली विरूबाई ही त्याच्या फार

लोभातली असून सारे तिला मान देत. ही शिंद्यांनी शाहूला दिली असे द. ब. पारसनीस (ब्रह्मेंद्रस्वामी चरित्र स. १९००) सांगतात. जनानखान्याची व्यवस्था हिच्याकडेच असे. कोल्हापूरच्या संभाजीने तिला पुढीलप्रमाणे एक पत्र लिहिले. (करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने, संपा. मा. वि. गुजर, स. १९६२, भाग१ला, लेखांक५२) ‘ तीर्थरूपाचे व आमचे दर्शन होऊन विवीक व्हावा हा प्रसंग साधारण आहे यैसे नाही. या प्रयोजनी तुम्ही मध्यस्त होऊन उभयपक्षी संदेह निवृत्ती करिता तरीच परिणाम लागतो. ’ शाहूत अन् आपल्यात सौहार्द रहावे म्हणून संभाजी तिला मध्यस्थी करण्यास सांगतो. तो तिचा उल्लेख सौभाग्यवती असा करतो. ही बाई मोठी परोपकारी होती. परळी किल्ल्यावर रामदासांच्या समाधीसमोर आपल्या नावाचे एक तुळशी वृंदावन तिने बांधले. ही गेली तेव्हा शाहूचा सारा आधारच तुटला. सगुणाबाई अन् सकवारबाईला मुलीच झाल्या. सगुणाबाईला एक मुलगा झाला पण तो अल्पायुषी निघाला. अन् म्हणून एवढी लग्ने होऊन पुत्रसंतती नसल्याचा घोर उतारवयात शाहूला लागलेला दिसतो.

त्या काळातले एक सत्पुरुष ब्रह्मेंद्रस्वामी यांच्यावर शाहूची भक्ती होती. बाजीराव – चिमाजीही त्यांना मानी. त्यांना कुणी उपसर्ग देणार नाही म्हणून तो त्यांना आग्रहाने लिहितो. जे काय होईल ते स्वामींच्या आशीर्वादे अशी त्याची श्रद्धा असे. पण स्वामी काही कमी नव्हते. ते कित्येकदा ‘ तुमचे राज्य सोडून वाटेल तिकडे जाईन ’ अशी धमकी त्याला देत. मग शाहू त्यांना काकुळतीने लहितो : ‘ आपण न विचारता गेले ही गोष्ट वडीलपणास उचित की काय ? आपले जाण्यामुळे आमचे चित्त स्वस्थ नाही...... वडिलास आमचे गळ्याची शपथ असे. अनमान न करता माघारे आले पाहिजे. ’ शपथ घालून तो त्यांना परत येण्याची विनंती करतो यावरून त्यांच्याबद्दल त्याच्या मनात पराकाष्ठेचा आदर

दिसतो. बाजीरावाबद्दलही तसाच जिव्हाळा त्याला होता. मस्तानी-प्रकरण त्याच्या कानावर गेले तेव्हा त्याने नानासाहेबाला लिहिले– 'राऊ यास खट्टे न करावे.' बाजीरावाच्या पराक्रमाची किंमत तो जाणीत असल्याने त्याच्या प्रेमप्रकरणाबद्दल दुर्लक्ष करून त्याला न दुखविण्या-बद्दल तो नानासाहेबाला लिहितो. राज्यकर्ता म्हणून त्याला समज होती अन् प्रत्येक गोष्टी तो विवेकाने तडीस लावी. कोल्हापूरचा संभाजी निजामास जाऊन मिळाला (१७२५) त्या वेळी शाहूने त्याला लिहिले : 'हे राज्य श्रीचे, यवनाचे आश्रयास जाऊन जय कसा होईल ? तुम्हांस दौलत पाहिजे ती आम्ही नवीन सिद्ध करून देऊ पण राज्याचा वाटा मागणे पुराणांतरी झाले नाही' **पण असे** असूनही त्याने कोल्हापूरची गादी का ठेविली ते मात्र कळत नाही.

शाहूच्या जीवनाची अखेरची नऊ वर्षे दुःखातच गेली. १७४० साली बाजीराव–चिमाजीअप्पा ही रामलक्ष्मणाची जोडी एका पाठोपाठ निवर्तली. त्याच वर्षी त्याची आवडती रक्षा विरुबाईही निधन पावली. तिच्या निधनोत्तर त्याच्या संसाराचा उन्हाळा झाला अन् संसारसुखाला तो कायमचा पारखा झाला. सकवारबाई अन् सगुणाबाई या त्याच्या दोन बायकांत विस्तव जास्त नसे. आपसात भांडून शाहूचे मनःस्वास्थ्य त्या नष्ट करीत. या दोघींच्या भांडणाच्या तिढ्यात तो कसा सापडलेला असावा याविषयीचे ब्रह्मेंद्रस्वामींनी त्याच्या दोन्ही राण्यांना उद्देशून लिहिलेले मार्मिक पत्र (पारसनीसकृत ब्रह्मेंद्रस्वामी चरित्र, लेखांक २५८) पुढीलप्रमाणे आहे : 'तुम्हा दोघीस जो मंत्र तारक सांगितला आहे तो निष्ठेने जपणे म्हणजे पुत्रसंतान झालेच ऐसेच समजणे. तुम्ही आपले गुरूचे पायाची क्रिया केली आहे. छत्रपतीशी भांडो ना. तर आम्ही निरवानिरव केली आहे. भांडल्यास हा देश टाकीन आणि गोमुत्र तुम्हांवर टाकीन. राजाशी तुम्हीं भांडिलात नाहीत तर विश्वजन सुखी

होईल. तुम्ही जे जेवण कराल ते राजास अमृतासमान लागेल आणि तुमचे राजाचे एकचित्त नाही म्हणजे तुम्ही सोन्याचा ग्रास केला तरी राजास विषसमान वाटेल.... काय तुमच्या वडिलांचे पुण्य, काय जाणो छत्रपतीचे पुण्य की तुमचे अन्य जन्माचे सुकृत होते, तर मज देवाने भुली घातली आणि तुमच्या अश्रयास अकस्मात् आणिले आणि उपदेश जाहला. याचे सार्थक करा. इतकी तुम्हांस भिक्षा पदर पसरोन मागतो. तुम्ही भांडो नका.... आणि संसाराचा काही भरोसा नाही. जसा दीपक मालवाल्यास काही नाही,' या पत्रावरून या दोघी राण्यांचा कजागपणा शाहूला कसा भोवत असेल त्याची छान कल्पना येते.

साठी उलटली तशी शाहूची प्रकृती बिघडत चालली. घरातलो भांडणे तर मिटत नव्हती. पुत्रसुख नसल्याने राज्याला वारसा कोण नेमावा या चिंतेत तो चूर होता. तशात १७४५ साली ब्रह्मेंद्रस्वामीही निवर्तले. त्याच्या लोभातला आणखी एक बुरूज ढासळला. त्यांच्या अंत्ययात्रेला तो हजर होता. स्वामींचे शव स्वतःच्या पालखीत ठेवून ते तो धावडशीस घेऊन गेला. त्याच्या समाधीजवळ त्याने एक मोठे मंदिर बांधावयास घेतले. हे मंदिर १७५८ साली पुरे झाले. तेव्हा ते पहाण्यास तो हयात नव्हता. त्या काळी या मंदिरास एक लक्ष वीस हजार रुपये खर्च आला. त्याची गुरुभक्ती अशी अलौकिक होती.

१७४६ मध्ये शाहूची प्रकृती बरीच बिघडली असावी. सांप्रत राजश्री स्वामीची प्रकृती 'तरी तिसरे प्रहरापासून अंग मोडून येत असते. पोटावर बिब्याच्या फुल्या घातल्या आहेत,' असे पत्र पहावयास मिळते. तशात त्याच्या बायकांच्या भांडणांनी अन् उधळखोरीनेही तो हैराण झाल्याचे दिसते. याबाबतची त्याची मनःस्थिती रेखाटणारे पत्र (पे. द. खंड १८, पत्र ८५) पुढीलप्रमाणे आहे.' 'राजश्री स्वामी दोही महालाच्या कजिया-मुळे व दोहीकडील खर्च वेचाच्या तगादियामुळे राजश्री स्वामीची मर्जी

दिक आहे. आपला खानगी हिशेब किते व ऐवज मालवजा तरता बुडता पहात असतात. बंदोबस्त घरचा करावा ऐसे इच्छितात परंतु घडेल ते खरे... आठ दिवसाआड एक गोष्ट काढितात. निरंतर दिक दोही वाडियातील भीड मोडत नाही याजमुळे बंदोबस्त होत नाही. या गरीफदारीत सा महिने गेले. आणखी किती दिवस जातील पाहावे.' हे पत्र इतके बोलके आहे की घरची भांडणे अन् आर्थिक ओढघस्तीत शाहूची कशी तिरपीट उडाली असेल त्याचे चित्र वरील पत्रात हुबेहूब पहावयास मिळते.

शाहूच्या नशिबी आणखी मृत्युयोग पहावयाचे होते असे दिसते. त्याची धाकटी बायको सगुणाबाई आजारी (१७४८) पडली. 'धाकटे बाईस येक दोन दिवस कपाल दुखत होते. ज्वर येत होता...बहुत हैराण आहेत.... बाईचे शरीराचे कलेना. वैद्य म्हणतात की काही सुधे दिसते यैसे नाही,' असे पत्र (पे. द. खं. १८, पत्र १५३) पुरंदरे याजकडून भाऊसाहेब पेशव्याला गेलेले आहे. बायको आजारी अन् कर्जाचा लागलेला भुंगा यामुळे शाहू त्रासून गेला असावा. कर्जाबद्दल नानासाहेब पेशवा काय म्हणतो (पे. द. खं. १८, पत्र ८६) पहा 'राजश्री स्वामींचा गुता राहिला आहे. राजश्री स्वामीस लग्नामुळे व संसार कृत्ये, दोही महालाचे खर्च विशिष्ट वाढले तेणे करून कर्ज मबलग जाहले आहे. त्याचा परिहार जाला पाहिजे. आपले कर्ज तुम्हाविना वारील कोण ? जे आहा ते तुम्हीच माझे आहा म्हणोन आम्हाजवळ एक वेळ बोलले, कर्ज पेशवेच वारून टाकतील याची खात्री शाहूला असावी असे या पत्रात दिसते. अखेरीस सगुणाबाई वारली (दि. २५-८-१७४८) त्यामुळे त्याच्या दुःखात आणखीनच भर पडली. दुखण्याला उतार पडावा म्हणून तो तिला जेजुरीलाही घेऊन गेला. खर्चाकडे त्याने मागेपुढे पाहिले नाही; पण यशाने त्याला दगा दिला. तो काहीसा निराश बनला. मायेचे असे त्याला कोणी राहिले नाही. मोठी धनीण होती खरी पण ती पडली मुलुखाची तापट.

त्यामुळे एकंदर परिस्थितीमुळे त्याला वैताग येऊन तो साताऱ्याला कृष्णातीरी माहुलीस राहू लागला. साताऱ्यास न येण्याचा त्याचा निश्चय होता. जवळ जवळ वानप्रस्थाश्रम स्वीकारून तो सातारा व माहुलीच्या दरम्यान वनवासवाडीस वास्तव्य करून राहिला. आयुष्य संपत आल्याची समज त्याला आली असावी.

चाळीस वर्षे राज्यकारभार करून शाहू आता अखेरचे दिवस मोजीत होता. त्याच्याबद्दल अनेक विद्वानांनी भिन्न भिन्न अभिप्राय केलेले पहावयास मिळतात. पेशवेपद त्याने वंशपरंपरागतपणे चालू केले अन् चाकरीबद्दल सेवेबद्दल जमीन तोडून देण्याचा घातक पायंडा त्याने पाडला यावद्दल त्याला अनेकांनी ठपका दिलेला आढळतो. पैकी पेशवेपदाबाबत विचार करताना एक गोष्ट सहज दिसून येते ती ही की त्याच्या अमदानीतले सारे पेशवे कर्तृत्ववान होते. त्यामुळे त्यांच्यापुरते त्याने ठेवलेले धोरण चुकीचे होते असे म्हणता येणार नाही. त्याच्यानंतरचे छत्रपती कर्तबगार निपजते तर त्यांनी हे धोरण बदलून लायक इसमांचीच पेशवेपदावर नियुक्ती केली असती. कर्तृत्वात पुढचे छत्रपती किती कमी भरले त्याची मोजदाद इतिहासात पहावयास मिळते. तीच गोष्ट जहागिरीबद्दल म्हणता येईल. मराठेशाहीचे पुढचे धनी कर्तबगार निपजते तर सरदार–जहागिरदारांना सवतासुभा थाटण्याची छाती होती ना.

आपले कर्तृत्व अन् मर्यादा शाहू पुरेपूर जाणून होता. पण स्वराज्याचा विस्तार झाला पाहिजे अशी आस त्याला सदैव लागलेली दिसते. बाळाजी विश्वनाथाच्या मृत्यूनंतर कसलीही खळखळ न करता अन् प्रतिनिधी मंडळीसारख्या मातबर सल्लागारांच्या विरोधाला न जुमानता त्याने वीस वर्षांच्या तरुण बाजीरावास पंतप्रधानपद देण्याचा धाडशी निर्णय घेतला. यावरून त्याला गुणांची पारख किती अचूक होती त्याची खात्री पटते. बाजीरावाचा मुलगा नानासाहेब यालाच त्याने पुढे पेशवाईची वस्त्रे दिली

यावरून मानवी स्वभावाचे ज्ञान त्याला पुरेपूर होते असे म्हणावे लागते. स्वतः तो लढाया खेळला नसेल पण पेशव्यांकरवी लढाया मारूनच त्याने मुलूख वाढविला. पेशवे त्याला मानीत, त्याप्रमाणे छत्रपतीच्या गादीशी द्रोह करणारी ताराबाईही त्याच्याजवळच राहण्याचे पसंत करते. एवढा मोठा औरंगजेब! मराठेशाहीचा नायनाट करण्याचा विडा उचलून दक्षिणेत तो पंचवीस वर्षे ठाण मांडून बसलेला होता. कारस्थानात अन् पाताळ-यंत्रीपणात त्याला जोड सापडणे कठीण. तरीही तो काही धोरणाने का होईना शाहूवर माया करताना आढळतो. त्यावरून त्याच्या अंगात काही तरी अलौकिक गुण होते याबद्दल मनात संशय उरत नाही. त्याच्या अमदानीतले तिघे पेशवे पराक्रमी निघाल्याने स्वतंत्र कर्तृत्व दाखविण्याचे कारणही त्याला उरले नसावे. त्याच्या चाळीस वर्षांच्या कारकीर्दीतच मराठ्यांच्या स्वराज्याला साम्राज्याचा घाट आला, ते चिरस्थायी झाले. शिवाजीइतका तो भेदनीतीत निपुण नसेल, पण आजोबाने लावलेल्या स्वराज्याच्या वेलीचा वटवृक्ष कसा होईल याची तळमळ त्याला लागलेली होती असे इतिहास सांगतो. कोल्हापूरच्या वेगळ्या गादीचा मोड त्याने केला नाही ही मात्र त्याची अक्षम्य चूक होय. तरी ऐन तारुण्यातला काळ जनानखान्यातल्या निष्क्रिय वातावरणात गेल्यावरही छत्रपती झाल्यावर मराठ्यांच्या राज्याची अभिवृद्धी अन् भरभराट कशी होईल याचीच चिंता त्याने सदैव वाहिली याची साक्ष वारस निवडताना त्याने केलेल्या चिकित्सेकेत पहावयास मिळते. त्याच्या योग्यतेविषयी रियासतकार सरदेसायांनी व्यक्त केलेला पुढील अभिप्राय (मराठी रियासत, पुण्यश्लोक शाहू, स. १९४४) यथातथ्य मानावा लागेल. शाहूने तंजावरपासून दिल्ली पावेतो राज्याचा फैलाव केला. हे कृत्य नेभळ्या व निःसत्त्व इसमाकडून होणे शक्य नाही. दीपसिंगाने निजामाला आपला अभिप्राय कळविला की "शाहू राजा पोख्त, शहाणा, विवेकी, मजलसीने वागणारा आहे म्हणूनच याचे राज्य चालते."

तोच अभिप्राय ग्राह्य मानला पाहिजे. त्याच्यासारखा उदार, धोरणी, परदुःखाने विव्हळणारा राज्यकर्ता औरंगजेबाच्या पश्चात मराठी राज्यास लाभला म्हणूनच राज्याची वृद्धी होऊन आजचा अभिमानास्पद इतिहास बनला असे दिसून येते... बापाचा क्रूर वध, बादशाहीची सतरा वर्षांची कैद, त्याने चालविलेले प्रचंड युद्ध, त्यात उडालेली देशाची भयंकर दैना आणि खुद्द शाहूवर गुदरलेले नानाविध संकटप्रसंग हे जे जीवनाचे अनुभव फारच थोड्यांच्या वाट्यास येऊ शकतात, त्यांनी त्याच्या उत्तर आयुष्यास निराळीच कलाटणी दिली. राज्यपद प्राप्त होताच भूतदया हे त्याचे वर्तन सूत्र बनले आणि अंतसमयी कृतार्थतेचा अपरिमित आनंद त्यास लाभला.'

शाहूला आपला अंतकाळ समीप आल्याचे समजले तेव्हा त्याने ताराबाई-चा नातू रामराजा याला गादीचा वारस केले. आजार वाढल्यावर त्याला वनवासवाडीहून हलविण्यात येऊन साताऱ्यास रंगमहाल राजवाड्यात ठेवण्यात आले. नंतर दसऱ्याच्या सुमारास १ ऑक्टोबरला त्याने दोन याद्या पेशव्यांच्या स्वाधीन केल्या. त्याचे जणू मृत्युपत्र असलेल्या याद्यातील महत्त्वाचा भाग पुढीलप्रमाणे आहे—

"(१) तुम्ही फौज धरने... राज्यकारभार चालला पाहिजे. तर वंश पुढे बसवने. कोलापुरचे न करने...वंश होईल त्याच्या आज्ञेत चालून राजमंडळ चालवने. चिटणीस स्वामीचे विश्वासू त्याच्या तुमच्या विचारे राज्य राखने वंश होईल तो तुमची घालमेल करणार नाही.

(२) राज्यभार तुम्ही चालवाल हा भरवंसा स्वामीस आहे....तुमचे मस्तकी हात ठेविला आहे. वंश होईल तो तुमचे प्रधानपद चालवील. करील अंतर तर शपथ असे. त्याचे आज्ञेत राहून सेवा करने. राज्य राखने. बहुत काय लिहिने. सूज्ञ असा."

अखेरच्या क्षणी त्याचा पेशव्यांवर किती विश्वास होता. त्याची प्रचीती या याद्यांवरून येते.

अखेरीस शाहूचे दुखणे विकोपास गेले. ‘राजश्रीचे वृषण सुजले... मुसलमान तबीबांनी लेप लाविला होता’ या पेशवे दप्तरातील (खंड १८) उल्लेखावरून त्याला अंडवृद्धीचा विकार झाला असावा. अंतसमयी तो पेशव्याला बजावतो की–आमच्या हातचे देणगीस बाध आणिल्यास व आम्ही मान दिलेल्या लोकांचा छळ वगैरे केल्यास तुम्हांकडे पेशवाई पद कायम राहणार नाही, नंतर रामनाम घेत घेत दि. १५ डिसेंबर १७४९ रोजी रंगमहालवाड्यात सातारा येथे मराठ्यांचा हा पुण्यश्लोक छत्रपती शाहू, स्वर्गवासी झाला. त्याची बायको सकवारबाई त्याच्याबरोबर सती गेली. ही तापट बाई काही सुखासुखी सती गेली नाही. तिच्या भावाने तिला जेव्हा दटावले की–ब्राह्मणाशिवाय (पेशवा) राज्यास आवर घालील असा दुसरा सरदार मला दिसत नाही. तू उगाच भलत्याचे नादास लागून मागे राहशील तर यांचे हरभारे भरडावे लागतील. तेव्हा ती मनांत समजली अन् मग सती गेली.

‘धनीन सकवार बैसून। कीर्त केली तीन॥
गेली वैकुंठा भुवन। शाहूसी घेऊन। इंद्रे जयजयकार मांडिला॥’

असे त्या प्रसंगाचे वर्णन दादू शाहीर करतो.

शाहूच्या निधनोत्तर निजामाचा नातू शाहूविषयी बोलला– ‘मोगलाईत बंदगान आली. (निजाम) मल्हार राज्यात शाहू राजे होते. यैसे माणूस पुढे होणार नाहीत. सर्व राज्य स्वामीस (पेशव्यास) सोपवून गेले.... छत्रपति सारखा राजा होणे नाही. राज्ये बरे नांदविले. अजातशत्रू होते. श्री इच्छेने त्यांचा आवतार समाप्त झाला.’ (पे. द. खंड. २८, पत्र ५९)

शाहूने आपले अंतरंग पुढीलप्रमाणे प्रकट केले आहे: तुमच्या हातात पैसा नाही, आमच्याही नाही, मुलुख सगळा तुमचा आहे. फौजा जमवा, सोयीस येईल तिकडे संचार करीत जा, ठाणी बसवा, वाडे बांधा, वसाहती करा, उद्योगधंदे-व्यापार-सावकारी चालू करा, मंदिरे बांधा, देवाब्राह्मणांचे

संगोपन करा, अनाचार व द्वेष कोणाचा करू नका, म्हणजे देवही तुम्हांस पावेल, तुमचे दैन्य फिटेल, राष्ट्राचे भाग्य उदयास येईल. पैसा नाही तर कर्ज काढा, उद्योग वाढवून तो फेडा. ' छत्रपती शाहूने केलेला हा उपदेश आजही महाराष्ट्रीय बांधवांना आचरणात आणता येण्यासारखा आहे.

शाहूच्या पुढील छत्रपतींचा लौकिक विशेष डोळ्यात भरण्यासारखा नाही. म्हणून 'जुने मोडू नये, नवे करू नये' असे सांगणारा अजातशत्रू शाहू भोसले घराण्यातील पुण्यश्लोक छत्रपती होता असाच अभिप्राय इतिहासकारांना द्यावा लागेल.



२. मराठ्यांचा नेपोलियन थोरले बाजीराव

" मोगलाकडील वकील आला आहे. तो आमची फौज पंचवीस हजार कुमकेस मागतो. तेव्हा तुमच्यामध्ये मोगलास कुमक जाण्याची हिंमत आहे काय ? "

" मोगल म्हणजे काय ? आज्ञा झाली असता मोठ्या काळाच्या तोंडात देखील जाऊन सरकारचे पुण्यप्रतापे त्याचा बंदोबस्त करून येऊ. "

वरील संवाद छत्रपती शाहूमहाराज व पहिले बाजीराव पेशवे यांमधील आहे. हा तेजस्वी जबाब ऐकल्यावर शाहूमहाराज अतिशय खूष झाले नि त्या भरात त्यांनी बाजीरावाला पेशवाईची वस्त्रे बहाल करून शिक्केकट्यार-ही त्याच्या हवाली केली. ही हकीकत दिनांक १७ एप्रिल १७२० रोजी घडली.

मराठेशाहीचा इतिहास वाचताना शिवाजीनंतर चटकन् दुसरे नाव डोळ्यांपुढे उभे राहते ते थोरल्या बाजीरावाचे. रूप, रसिकता, मातृप्रेम, बंधुप्रेम, राष्ट्रप्रेम, गुरुभक्ती व पराक्रम या सप्तगुणांचा संगम बाजीरावाच्या चरित्रात दिसतो. विशीच्या उंबरठ्यावर त्याला पेशवेपद लाभले. पालखेडच्या युद्धात त्याने निजामाला जेर केला. बंगषाचा पराभव करून छत्रसालाचे छत्र त्याने शाबूत ठेवले. डभईच्या लढाईत त्याने निजामाचा मोड केला. दिल्लीस दौड

मारून दिल्लीश्वरावरही त्याने आपली जरब बसविली. त्याने लढाया मारल्या व जिंकल्या. जिवाला जीव देणारी माणसे त्याने तयार केली. राणोजी शिंदे, मल्हारराव होळकर, पिलाजी जाधव, पटवर्धन मंडळी, गोविंदपंत बुंदेले वगैरे व्यक्तींना त्याने नावारूपाला चढविले. हातावर कणसे चोळीत अन् घोड्याची मांड न विसकटता चण्याच्या फाका मारीत लांबलांब मजला मारून शत्रूला कंठस्नान घालणाऱ्या बाजीरावाच्या मागे पैशाची विवंचना सावलीसारखी होती. तरीही शनिवारवाड्यासारखा भव्य इमला उठविण्याचे स्वप्न त्याने बाळगले व ते साकार केले. आहारविहाराचा विधिनिषेध न बाळगता मस्तानीसारख्या यवन स्त्रीवर मोहबत करण्यासही तो कचरला नाही. तेव्हा मात्र रणांगणावर शत्रूला कर्दनकाळ भासणारा बाजीराव एखाद्या गरीब कोकराप्रमाणे आपल्या कुटुंबियांपुढे हतबल ठरला. आणि म्हणून त्याचे चरित्र स्फूर्तिदायक, कादंबरीला लाजविणारे अन् मनाला चटका लावण्याइतके हृदयस्पर्शी आहे.

बाजीरावाचा जन्म दि. १८ ऑगस्ट १७०० रोजी झाला. त्याची आई राधाबाई व वडील बाळाजी विश्वनाथ. शिवाजीच्या कारकीर्दीत बाजी नावाचे जे पराक्रमी पुरुष झाले त्यांची बखर बाळाजी विश्वनाथ वाचत असताना मुलगा झाल्याची सुवार्ता त्याला कळली. म्हणून त्याने मुलाचे नाव 'बाजीराव' ठेवले, अशी एक आख्यायिका बाजीरावाच्या एका चरित्रकाराने सांगितली आहे. त्याचे पाळण्यातले नाव होते विश्वनाथ, पण नंतर बाजीराव हेच नाव प्रचलित झाले. त्याच्या पत्नीचे नाव काशीबाई हीदेखील नवऱ्यासारखी सुस्वरूप असल्याने उभयतांचा जोडा हजारात शोभून दिसे. बाजीरावाचे लग्न लहानपणी झाले. त्याच्या लग्नाची निश्चित तारीख उपलब्ध नाही.

बाजीराव रूपाने सुरतपाक होता. उंचीने सहा फूट व प्रकृतीने चांगला बलदंड. अश्वारोहणाच्या कलेत त्याला तोड सापडणे कठीण. लहानपणा-

पासून वडिलांबरोबर स्वारीवर जाण्याची त्याला सवय असल्याने लढाईचा अनुभव त्याला अल्पवयातच मिळाला. स्वभावतःच तो शिपाईगडी होता व त्याची ही वृत्ती त्याच्या पुढील उद्योगास उपकारक ठरली.

दि. २ एप्रिल १७२० रोजी वडील बाळाजी विश्वनाथ निवर्तल्यावर पंधरा दिवसांनी कराडनजीक मसूर येथे दरबार भरवून शाहूने पेशवाईची वस्त्रे बाजीरावास दिली. श्रीपतराव प्रतिनिधी मंडळींचा त्याला विरोध होता. पण शाहूचा त्याच्या कर्तृत्वावर पूर्ण विश्वास असल्याने कुणाच्याही विरोधास न जुमानता त्याने बाजीरावाला पेशवाईची वस्त्रे दिली. दि. ६ डिसेंबर १७२१ रोजी त्याला पुत्ररत्न झाले. त्याचे नाव बाळाजी. हा मुलगा नानासाहेब पेशवे या नावाने इतिहासात विख्यात ठरला.

पुण्यास येण्यापूर्वी पेशवे सासवडास राहात. बाजीराव पेशवा झाल्यावर त्याने सासवडचा मुक्काम हलविला व तो पुण्यात स्थायिक झाला. त्या वेळी त्याचा स्वतःचा खास वाडा नसल्याने तो धडफळे यांच्या वाड्यात राहात असे. पेशवे बखरीत वाड्यासंबंधी माहिती आहे ती अशी : 'शाहूमहाराज म्हणतात : तुम्ही आपल्यास रहावयास जागा पेशवाईचे कारभाराजोगी मध्यदेशी पाहून तेथे वाडा बांधून, शहर वसवून तयार करावी.' तेव्हा बाजीराव म्हणाले, "पुणे जागा मध्यदेश आहे. आज्ञा झाल्यास तेथे राहावयाची जागा करू."

नंतर दि. १० जानेवारी १७३० रोजी शनिवारवाडा बांधावयास सुरुवात झाली व दि. २ फेब्रुवारी १७३१ रोजी वास्तुशांत करून बाजीराव त्यात राहावयास गेला. हा वाडा प्रचंड असून त्याचे काम सवाई माधवरावाच्या कारकीर्दीत चालू असावे, असे दिसते. तटाच्या व दरवाजांच्या रूपाने का होईना आजही बाजीरावाने बांधलेल्या शनिवारवाड्याची वास्तू पुण्यात पाहावयास सापडते. शनिवारवाड्याच्या बांधणीचा प्रारंभ झाल्यावर अनेक मराठे, ब्राह्मण सरदारांनी पुण्यात भव्य वाडे उठविले; तरी शनिवार-

वाड्यासारखा प्रचंड इमला त्या काळी बांधण्याची कल्पना बाजीरावाचीच. त्याच्या हौसेची व रसिकतेची सर्वोत्कृष्ट साक्ष म्हणजे शनिवारवाडा.

सन १७२८ मध्ये पालखेडच्या लढाईत बाजीरावाने निजामाचा नक्षा उतरविला. नंतर सन १७२९ च्या मार्च महिन्यात त्याने बुंदेलखंडात राजा छत्रसालाची भेट घेऊन त्याचा शत्रू महंमदखान बंगष याचा पराभव करून छत्रसालाची अब्रू राखली. बाजीरावाचे यापुढील सर्व आयुष्य लढाया खेळण्यात गेले. एका मागून एक लढायांची भरारी मारण्याच्या त्याच्या हव्यासामुळे कर्जाचा भुंगा त्याच्या मागे जन्मभर होता. तरीही त्याने निजामासारख्या प्रबळ शत्रूला जरबेत ठेवले. बंगषाला इतके देमाय धरणी ठाय करून सोडले की, तो ती स्त्रीवेश घेऊन पळून गेला, अशी आख्यायिका आहे. कोकण, कर्नाटक, गुजरात व राजपुताना या प्रांतातली बाजीरावाची राजकारणे यशस्वी झालेली दिसून येतात. शाहूचा लगाम नसता तर त्याने दिल्लीही काबीज केली असती. नादिरशहाच्या स्वारीनंतर सन १७३९ मध्ये बाजीराव उत्तरेकडे स्वारीवर निघाला. यावरून राजकारणाची त्याची झेप केवढी मोठी होती याची कल्पना येते. त्या स्वारीवर असताना त्याने बंधू चिमाजीअप्पा याला पत्र लिहिले, ते असे : ‘ आप्पा, परराज्य राहिले तरी सर्वावरी आहे. त्यास फार विचार न आणता इकडील कार्याची पैरवी मनात आणून कर्तव्य ते करावे. ’ या पत्राने त्याच्या अंतःकरणावर उत्तम प्रकाश पडतो. पुढे नादीरशहा दिल्ली सोडून परतल्याने बाजीराव बुऱ्हाणपुराहून परत फिरला.

बाजीरावाची कारकीर्द अवघी वीस वर्षांची. तरी तेवढ्यात त्याच्या कर्तृत्वाचा डंका हिंदुस्थानभर पसरला. या बाबत रियासतकार सरदेसाई यांचा अभिप्राय आहे तो असा : वीस वर्षांचा मुलगा राज्यकारभार अंगावर घेऊन तो अल्पावकाशात यशस्वी करून दाखवितो अशी उदाहरणे जगाच्या इतिहासातदेखील फारशी मिळणार नाहीत.......शिवाजीच्या

खालोखाल मराठ्यांच्या इतिहासात बाजीरावाची योग्यता समजतात ते सर्वथा युक्तच होय.'

आपल्या वीस वर्षांच्या कारकीर्दीत बाजीरावाने अविश्रांत श्रम केले. लष्करी डावपेचात तो शिवाजीच्या तोडीचा ठरतो. दिल्लीकर, निजाम व पोर्तुगीज या तीन सत्ताधीशांवर त्याने चांगला वचक बसविला. मराठ्यांच्या लष्करी सामर्थ्याचा दरारा हिंदुस्थानभर पसरला. कारण बाजीराव पहिल्या प्रतीचा सेनानी होता. मराठी सत्तेचा अंमल व विस्तार त्याने सर्व हिंदुस्थानभर केला. ' युद्धसंग्रामात तो सर्वांपुढे निर्भयपणे ठाकून उभा राहत असे. सभोवार बंदुकीच्या गोळ्यांचा मारा होत असता तो कधी कचरला नाही. कष्ट करण्याची सवय त्याला भरपूर होती. सामान्य शिपायाप्रमाणे प्रत्येक काम तो स्वतः करी आणि त्यांच्याचसारखे सामान्य अन्न खाण्यात आनंद मानी. ' असे बाजीरावाचे वर्णन सर रिचर्ड टेंपलने आपल्या ' ओरिएन्टल एक्स्पिरियन्सीस ' या ग्रंथात केले आहे, ते यथार्थ आहे. लष्करी गुणात बाजीराव असा श्रेष्ठ असल्याने शिवाजीप्रमाणे त्याचेही नाव मराठ्यांच्या इतिहासात चिरस्मरणीय झाले.

पत्नी काशीबाई व मुलगे नानासाहेब, रामचंद्र (जन्म सन १७२९), रघुनाथ (जन्म सन १७३४), नि जनार्दन (जन्म सन १७३५) असा बाजीरावाचा कुटुंबपरिवार. पैकी नानासाहेब व रघुनाथराव इतिहासात प्रसिद्ध आहेत. बाजीरावाचे आपल्या आईवर-राधाबाईवर-पराकाष्ठेचे प्रेम होते. ही राजकारणकुशल व व्यवहारीही होती. बाजीराव-निझाम प्रथम भेटीच्या वेळी तिने लिहिलेले पत्र आढळते. ते असे : ' श्री. आनंदराव सोमवंशी व शंभुसिंग जाधव या दोघांना घेतल्याशिवाय एकटेच खानाचे भेटीस जाऊ नये.' तसे शक्य नसल्यास पुढे ती म्हणते,– 'भेटीचा मनसुबा मोडे ते गोष्ट करणे.' या प्रसंगावरून ती किती खबरदार व धोरणी बाई होती ते दिसते.

त्या काळी वाहनांची सोय नव्हती. त्यामुळे प्रवास करणे फार धोक्याचे

असे, व खर्चही भरमसाट येई, तरीदेखील बाजीरावाने आपल्या आईची–राधाबाईची–काशीयात्रेची इच्छा पुरी केली.' येथील वर्तमान तरी राधाबाई कार्तिक शुद्ध द्वादशीस आली. त्रयोदशीपासून तीर्थविधी आरंभिला. तो सर्व करून पौष वद्य पंचमीस स्वार होऊन गयेस गेली. येथे जो धर्म जाहला तो पत्री लिहिता येत नाही.' असे पत्र बाजीराव–चिमाजीस आल्याचे पेशवे दप्तरात आढळते. या पत्रावरून बाजीरावाने आईची आर्थिक तजवीज किती उत्तम तऱ्हेने केली होती, हे तर दिसून येतेच, परंतु पैशाची विवंचना त्याच्या मागे कायमची असूनही त्याने आईला भरपूर धन देऊन तिची काशीयात्रा घडवून आणली. यावरून त्याची मातृभक्ती किती उत्कट होती, तेही समजते.

राधाबाईच्या काशीयात्रेच्या निमित्ताने, बाजीरावाची कीर्ती हिंदुस्थानभर कशी पसरली होती व त्याचे शत्रूही त्याला कसे मनापासून चाहत त्याची हकीकतही सांगण्यासारखी आहे. राधाबाई काशीयात्रेला निघणार असे समजल्यावर, आपल्या प्रदेशातून ती जाईल तेव्हा आपण तिचा परामर्श व्यवस्थितपणे घेऊ असे आश्वासन बाजीरावाला मोगल सरदारांनी व रजपूत राजेरजवाडयांनी दिले. नर्मदा तीरावर ती आली तेव्हा बाजी-रावाचा शत्रू महंमदखान बंगष यानेही तिचा सत्कार केला. जयपूरला तिचे वास्तव्य तीन महिने होते. मुलाने आईची काळजी घ्यावी त्याप्रमाणे जयपूरच्या महाराजांनी तिची काळजी घेतली. यावरून उत्तरेतील राजे-रजवाडे बाजीरावाला किती भजत त्याची कल्पना येते. 'त्या अशांततेच्या काळात कसलाही गैरप्रकार न घडता ही काशीयात्रा सुखरूप पार पडली. त्याचे श्रेय बाजीरावाच्या लोकोत्तर व्यक्तिमत्त्वाला व उत्तर हिंदुस्थानातल्या त्याच्या लोकप्रियतेला दिले पाहिजे.' असे उद्‌गार श्री. आनंदस्वरूप मिश्रा या चरित्रकारांनी काढले आहेत ते खरे दिसतात.

बंधू चिमाजी आप्पा यांच्यावरही बाजीरावाचे प्रेम विलक्षण होते. तो सदा स्वारीवर असल्याने घरच्या व्यवहाराचा भार चिमाजीवर पडे.

बाजीरावाचा कुठेही अगर कुणाशीही खटका उडला तर समेट करण्यात चिमाजी पुढाकार घेई. अशी राम-लक्ष्मणाची जोडी होती. ' बाजीरावाच्या कीर्तीमुळे चिमाजी आप्पाचे नाव पुष्कळसे लोपत गेले आहे. योग्यतेच्या मानाने पाहिले तर चिमाजी बाजीरावाहून कमी नव्हता. उलट काही काही बाबतीत तो बाजीरावाहून जास्त होता असे वाटते... बाजीरावावर त्याचा दाब असून या दाबामुळे राष्ट्राचे काम बरेचसे चांगले झाले. ' हे रियासतकार सरदेसाई यांचे भाष्य पाहिले की चिमाजीच्या योग्यतेचा अंदाज येतो.

बाजीरावाची पत्नी काशीबाई शांत स्वभावाची स्त्री होती. सासूप्रमाणे ती हुशार नसली तरी पतिसेवेत तिने कसूर केली नाही. तिला पायाचे दुखणे होते. बाजीरावाच्या पश्चात् तिनेही सासूप्रमाणे काशीयात्रा केली. बाजीरावाच्या मृत्यूनंतर अठरा वर्षांनी सन १७५८ मध्ये ती निवर्तली.

बाजीरावाच्या आयुष्यांतली दर्दभरी व करुण कहाणी म्हणजे मस्तानी-प्रकरण होय. मस्तानी ही बाजीरावाची प्राणप्रिय रक्षा. बुंदेलखंडाच्या छत्रसालाने बाजीरावास ही नजर केली, असा प्रवाद आहे. ' विडा खाऊन पिक गिळली तर दिसावी ' इतकी ती खूपसुरत होती. बाजीराव जसा हिच्यावर बेहद्द फिदा होता तशी हीदेखील त्याच्यावर भाळलेली होती. त्याच्याजवळ राहू लागल्यावर आहार, आचार व पोशाख तिने ब्राह्मणाला उचित ठेवला. परंतु प्रेमप्रकरणामुळे कुटुंबकलह निर्माण झाला. चिमाजीअप्पा, राधाबाई व मुलगा नानासाहेब या त्रिवर्गांना बाजीरावाची मस्तानी मोहबत मुळीच मान्य नव्हती. त्यामुळे उभयतांना बराच मनस्ताप भोगावा लागला. कादंबरीत शोभून दिसावे असे हे प्रकरण मोठे रंगेल होते. मस्तानीच्या सहवासामुळे बाजीरावाला मदिरेचे व्यसन जडले व तो मांसाहारही करू लागला. तेव्हा त्या काळी-समाजात व बाजीरावाच्या

कुटुंबियात किती खळबळ उडाली असेल त्याची कल्पना विद्यमान काळात येणे कठीण आहे. बाजीरावाने त्या काळी यवन स्त्रीला आपले प्रेमपात्र बनविले व खाण्यापिण्याचा विधिनिषेधही त्याने बाळगला नाही यावरून तो सामाजिक बाबतीत उदार मताचा असावा असे दिसते.

मस्तानीपासून झालेला मुलगा समशेरबहादर (जन्म १७३४) याची मुंज व्हावी अशी बाजीरावाची इच्छा होती. परंतु तेव्हाच्या ब्रह्मवृंदांनी याला मान्यता कशी द्यावी ? तेव्हा त्याचा मोठा हिरमोड झाला. पुढे या प्रेम-प्रकरणाचा शेवट मात्र शोकदायक झाला. सन १७४० मध्ये बाजीराव स्वारीवर गेल्यावर मस्तानीस अटक करण्यात आली. बाजीरावाला हे वृत्त समजले, परंतु स्वारी अर्धवट सोडून त्याला परत फिरता येईना. तशात त्या काळच्या सामाजिक चालींची फिकीर न करता बाजीरावाने तातडीने परत येऊन तिची सुटका केली असती तरी त्याला प्रतिबंध करण्याची कुणाला छाती झाली नसती. पण तसा हिय्या बाजीरावाला झाला नाही. अखेर बाजीरावाच्या मृत्यूचे वृत्त समजल्यावर हाय खाऊन मस्तानीही निधन पावली. सुप्रसिद्ध इतिहासकार किंकेड यांनी या प्रकरणाबद्दल उद्‌गार काढले आहेत ते असे 'शूरातला शूर व सुंदरातला सुंदर बाजीराव, प्रेमशृंगारातल्या उमद्या वीराप्रमाणे मृत्यू पावला.'

मस्तानीची पुढील वंशवेला पाहिली की मात्र आश्चर्य वाटते. मस्तानीचा मुलगा समशेरबहादर याने पानिपतच्या लढाईत चांगली तरवार गाजविली व तो धारातीर्थी मरण पावला. त्याचा मुलगा अली बहादर हाही पराक्रमी निघाला. सन १८५८ च्या स्वातंत्र्यसंग्रामात झाशीच्या लक्ष्मीबाईचा पक्ष ज्या बांद्याच्या नबाबाने घेतला तो नबाबही मस्तानीचाच वंशज. तात्पर्य, बाजीरावाच्या यवन स्त्रीपासून झालेल्या

संततीने व तिच्या वंशजांनीही अखेरपर्यंत राष्ट्रसेवा केली. हाही काळाने समाजावर उगवलेला सूड म्हणावयाचा की काय ते सांगणे कठीण आहे.

त्या काळातले प्रसिद्ध साधुपुरुष ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर यांना बाजीराव गुरुसमान मानत असे. उभयतांचे सौहार्द विलक्षण होते. स्वामी-वर शाहू महाराज व अनेक मराठे सरदारांचा मोठा जीव होता. बाजीराव चिमाजी अप्पांना स्वामी राम-लक्ष्मणाची जोडी म्हणत. स्वामींना अनेक सरदारांपासून वार्षिक देणग्या मिळत. त्यामुळे लाखो रुपये त्यांच्यापाशी होते. त्यांपैकी काही रक्कम ते कर्जाऊ देत. बाजीरावालाही त्यांनी कर्ज दिले होते. कर्जाच्या तिढ्यात पडल्यामुळे तो वैतागला होता. त्या वेळी त्याने स्वामींना लिहिलेले पत्र बोलके आहे. ते पत्र असे : ‘ तुम्ही जालेत गोसावी आणि आम्हांकडे प्रपंच लाविला. त्या प्रपंचामुळे आम्ही जोड इतकीच केली की वीस लाख रुपये कर्जदार झालो.... वरकड तुम्ही आपल्या पैक्यासाठी लिहिले तरी स्वामीने काही चिंता न करावी. आमचा जीव आहे तो पैकीयाची काय चिंता आहे? कोण समयी पाहिजे ते आम्हांसही कळते. पैका पावता करूच. आता प्रस्तुत तो आमचा जीवच मात्र आहे. येथे येऊन घेणे अगर तेथे बोलावशील तरी सर्व संग टाकून येतो. ’

बाजीरावाचे हे कर्ज त्याचे एकट्याचे नसून साऱ्या दौलतीचे होते ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे.

बाजीरावाने हे पत्र अगदी तिरमिरीत येऊन लिहिले असले तरी उभयतांचा जिव्हाळा अपूर्व होता.

बाजीराव गेल्यावर स्वामींनी चिमाजीस ‘ बाजीसारखा शिष्य गेला, याउपर या मुलुखातून जावे किंवा प्राण सोडावा, काय करावे ते लिहिणे ’ असे पत्र लिहिले. यावरून शिवाजी गेल्यावर समर्थ रामदासांना जसे दुःख झाले असेल तसाच शोक बाजीरावाच्या निधनानंतर स्वामींनी केलेला दिसून येतो.

बाजीरावाला पत्रे लिहिण्याचा नाद होता. बाजीरावकालीन लेखपत्रे सुमारे ३१०० मुद्रित स्वरूपात आढळतात व तीही तारखांसहित. याखेरीज ४०० पत्रे बिनतारखेची छापली आहेत. या ३५०० पत्रांपैकी बाजीरावाने लिहिलेली १५० पत्रे असून ती पाहिली की त्याच्या अंतःकरणाचा चांगला उलगडा होतो. त्या पत्रांवरून तो मनाचा मोकळा व मनाला दिसेल ते रोखठोकपणे लिहिणारा होता असे दिसते.

बाजीरावाला प्राणिसंग्रहाचा छंद होता. त्याने तरतऱ्हेचे घोडे, कुत्रे व पाखरे बाळगली होती. ग्रंथसंग्रहाचीही त्याला आवड होती. वेदान्तविषयातही तो रस घेई. वेदभाष्य त्याच्याजवळ नेहमी असे. रामायणाचे सुंदरकांड, युद्धकांड व उत्तरकांड हीदेखील त्याच्यापाशी होती. त्यावरून तो चांगला बहुश्रुत असावा असे दिसते. मुलगा नानासाहेब याच्यासारखा तो पट्टीचा संस्कृतज्ञ नसला तरी संस्कृत त्याला चांगले येत असावे.

दृष्टान्त, अनुष्ठाने यावरही बाजीरावाचा विश्वास होता. एकदा त्याने कृष्णभट कर्वे यांना अनुष्ठान करण्यास सांगितले. अनुष्ठान चालू असूनही बाजीरावाला दृष्टान्त घडेना. तेव्हा तो अस्वस्थ झाला आणि त्याने कृष्णभटांना विचारले, "अनुष्ठान यथासांग होत नाही की काय?"


मराठ्यांचा आद्य इतिहासकार ग्रँट डफ याने बाजीरावाचे वर्णन केले आहे ते असे : 'तो शूर असून मोठा युक्तिबाज होता.... रूपाने तो देखणा होता. त्याचे वागणे प्रतिष्ठित सरदारासारखे नसून एखाद्या रांगड्या शिपायासारखे असे. स्वारीवर असला की त्याची घोड्यावरची मांड कधी सुटत नसे. एकदा निजामाने एका चित्रकाराला त्याचे चित्र, तो असेल तसे काढून आणण्यास सांगितले. तेव्हा जे चित्र तयार झाले ते असे : बाजीराव घोड्यावर होता. घोड्याची अनीन मानेवर टाकलेली आहे. एक पाय घोड्यावर आडवा टाकलेला आहे. साध्या शिपायाप्रमाणे भाला

खांद्यावर लोंबत होता व हाताने तो कणसे चोळून त्यातले दाणे तोंडात टाकीत होता. '

बाजीरावाचे ग्रँट डफकृत हे वर्णन अगदी यथातथ्य म्हटले पाहिजे.

अतिश्रम बाजीरावाला नडले. दि. ७ मार्च १७४० रोजी तो उत्तरेकडे स्वारीवर निघाला. त्या वेळी त्याची प्रकृती फारशी चांगली नव्हती. ३० मार्चला तो बुऱ्हाणपूरला आला व ५ एप्रिलला रावेर प्रांती खरगोण येथे त्याचा मुक्काम झाला. तेथे त्याची प्रकृती बिघडली. एका रात्री त्याला सडकून ताप भरला. तरी अखेरपर्यंत त्याचे थंड पाण्याचे स्नान चुकले नाही. अखेरीस घोडयाच्या पाठीवर कायमची वस्ती करणारा शूर बाजीराव पेशवा दि. २८ एप्रिल १७४० रोजी (वै. शु. १३ सोमवार) नर्मदा तीरी लष्करी छावणीत निधन पावला.

आम्ही महाराष्ट्रीयांनी बाजीरावाचे पोवाडे गाइले तर नवल नव्हे. परंतु त्रिखंड कीर्तीच्या सर यदुनाथ सरकार या वंगीय इतिहासकारांनीही बाजीरावाची मुक्तकंठाने स्तुती केली आहे, ती विसरता येत नाही. यदुनाथांनी म्हटले, " शिवाजीनंतर हिंदुस्थानात हा अलौकिक पुरुष झाला असे दिसते. डयूक ऑफ वेलिंग्टन नेपोलियनबद्दल म्हणे की, त्याची रणांगणावरील उपस्थिती ५०,००० फौजेच्या तोडीची असे. शाहू असेच म्हणे की, मला जर एक लाख फौज व बाजीराव यात निवड करण्यास सांगितले तर मी बजीरावाचीच निवड करीन.'' यदुनाथांनी बाजीरावाची तुलना नेपोलियनशी केली आहे, यावरून तो युद्धशास्त्रात किती निपुण होता ते दिसते.



३. गोपिकाबाई पेशवे

पेशवाईतील दोन स्त्रिया विशेष गाजल्या. एक बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशव्यांची बायको गोपिकाबाई आणि दुसरे राघोबादादांची पत्नी आनंदीबाई. दोघीही मत्त्वाकांक्षी नि दोघींनाही दुर्दैवाचे दशावतार पाहावे लागले. आनंदीबाई कोपरगावी अपमानास्पद जिणे कंठू लागली. तर गोपिकाबाई गंगापुरास व्रतस्थपणे राहू लागली. तुलनेच्या मानाने जास्त दुःख गोपिकाबाईच्या वाट्यास आले. नवरा नानासाहेब अन् तीन तरुण मुलगे तिच्या डोळ्यादेखत गेले. पुत्र विश्वासराव पानिपतावर गारद झाला. माधवराव क्षयाला बळी पडला अन् नारायणरावाचा वध झाला. अर्थातच ऐन तारुण्यात हिच्या संसाराचा उन्हाळा झाला. पण सुंभ जळला तरी पीळ तुटत नाही असे म्हणतात, त्याप्रमाणे या मानी, करारी अन् तेजस्वी बाईने आपले सत्त्व कधी सोडले नाही. अखेरपर्यंत ती स्थितप्रज्ञ राहिली. संकटाचे हालाहल तिने शांतपणे पचविले. अन् म्हणूनच थोरल्या बाजीरावाच्या या बाणेदार सुनेचे – गोपिकाबाईचे – सारे जीवन मनाला चटका लावणारे, हृदयस्पर्शी आहे.

गोपिकाबाईचा जन्म १७२५ साली झाला. भिकाजी नाईक रास्ते या सावकाराची ही मुलगी. दिसण्यात अत्यंत सुस्वरूप अन् मोठी चुण-

चुणीत. एकदा दिवाळीत थोरले शाहू महाराज रास्त्यांकडे फराळास आले होते. वाढत असताना ही त्यांच्या नजरेस पडली तेव्हा तिची हुशारी आणि हुन्नर पाहून त्यांना संतोष वाटला. ते रास्त्यांना म्हणाले, "या मुलीचे लग्न आम्ही करतो. आमची गोष्ट तुम्ही मान्य केली पाहिजे." रास्त्यांचा होकार लागलीच आला. अन् मग हिचे लग्न शाहूने बाजीरावाचा मुलगा बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब यांच्याशी लावले. लग्नात शाहू महाराज जातीने हजर होते. तेव्हा लग्नाचा थाट काय वर्णावा ! हे लग्न १० जानेवारी १७३० रोजी झाले. लग्नाप्रीत्यर्थ खर्च झाला ३४३२५ रुपये. लग्नात गोपिका होती पाच-सहा वर्षांची तर नाना होता नऊ-दहा वर्षांचा. दृष्ट लागण्यासारखाच हा जोडा होता. मुलीच्या लग्नाची कमाल वयोमर्यादा त्या काळी असे नऊ. तेव्हा त्या काळच्या रीतीस धरूनच हे लग्न झाले.

२८ एप्रिल १७४० रोजी थोरले बाजीराव निवर्तले अन् मग नानासाहेबास शाहूने पेशवाईची वस्त्रे दिली. (दि. २५-६-१७४०) नानाची पहिली काही वर्षे सातान्यासच गेल्याने शाहूचा त्याच्यावर मोठा लोभ होता. पराक्रमी बाप निवर्तला नि कर्तबगार चुलता चिमाजी अप्पाही लौकरच मृत्यू पावला (दि. १७-१२-१९४०) तरी नानासाहेब मुळीच डगमगला नाही. त्याची बायकोही त्याच्या मनगटाला शोभेशीच होती.

या सुमारासच (१७४०) गोपिकाबाई पूर्णपणे वयात आली नानासाहेब त्या वेळी स्वारीवरच होता. दोन वर्षांनी तिला जो मुलगा झाला, तोच विश्वासराव. (दि. २२-७-१७४२) नवऱ्याला पेशवेपद लाभलेले अन् पुत्रदर्शन झालेले तेव्हा तिच्या सुखाला कसलाच पारावार नव्हता. तिला लिहिता-वाचता येत असे, राजकारणही तिला समजे - त्यात ती लक्षही घाली. नवऱ्याबरोबर ही पुष्कळदा स्वारीवर जाई. त्यांतच तीन वर्षांनी तिला आणखी एक मुलगा झाला त्याचेच नाव माधवराव.

या वेळी पेशवे-कुटुंबात वातावरण अगदी शांत नि सुखमय होते. शिवाजीने निर्मिलेल्या स्वराज्याचे रूपांतर थोरल्या बाजीरावाने साम्राज्यात केले होते. अन् त्याचाच कित्ता नानासाहेब गिरवीत होते. तशात तो अतिशय रसिक, बहुश्रुत अन् सुधारणाप्रिय होता. मराठ्यांचा अंमल पंजाब, बंगाल नि कर्नाटक या प्रांतातही वाढत चालला होता. पेशव्यांचे निवासस्थान असलेले पुणे शहर तर त्या वेळी ऐश्वर्याच्या अगदी शिखरावर होते. प्रख्यात शाहीर रामजोशी यांनी त्या शहराचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे :

" लंकाच पुण्यामध्ये लेश न दारिद्र्याचे ।
शहरात घरोघर सावकार गबर घरचे ।
सरदार एकाहून एक श्रीमंतांचे ।
लढणार शिपाई किती सांगू मी वाचे ।
हत्ती घोडे रथ अंबारी थवे पालख्यांचे ।
सरकारवाड्याभोताली झुलती बहारीचे ।
जागोजाग वस्ती भरदार ।
गर्दी बाजार ।
कमती नसे काही ॥ "

चिमाजी अप्पाचा मुलगा सदाशिवराव हाही बापासारखाच कर्तबगार बनत चालला होता. त्याच्यावर नानासाहेबांचे अतिशय प्रेम होते. त्याचे लग्नही नानानेच लाविले (दि. ७–२–१७४०). कारण बाजीराव आणि चिमाजी त्या वेळी स्वारीवर होते. सदाशिवरावाची उभारी अन् नानासाहेबांचे त्याच्यावरील प्रेम नि ममता गोपिकाबाईला आवडली नाही. तिच्या मनात विकल्प आला. सदाशिवरावाबद्दल असूया वाटू लागली. त्याच्या लग्नाचे तीन दिवस आधी बाजीरावाचा तिसरा मुलगा रघुनाथराव ऊर्फ राघोबा (जन्म दि. १–८–१७३४) याची मुंजही

नानानेच लावली. राघोबावर गोपिकाबाईची ममता होती. त्याच्यापेक्षा ती जवळ जवळ दहा वर्षांनी मोठी. पुढील काळात तिचे त्याच्याशी बिनसले अन् ती त्याचे मुखावलोकन करण्यास राजी नव्हती. तरी त्याच्या लहानपणी तिने त्याच्यावर आपत्यवात्सल्याने प्रेम केले, ही गोष्ट पेशवे दप्तरात आढळणाऱ्या तिच्या पत्रांवरून दिसून येते. त्याचे लग्नही नानाच्या अमदानीत झाले (१७४२). त्याची बायको जानकीबाई हिला गोपिकाबाईने लिहिलेले पुढील पत्र (पे. द.) आढळते ते असे : ' वरकड चिरंजीव दादा याचे जेवणास व फराळास जपत जावे.... आपणाकडून बहुत दिवस पत्र न येऊन वर्तमान कळत नाही. तरी ऐसे न करावे. सदैव पत्र संतोषाचे पाठवीत आसिले पाहिजे. आम्ही सर्व खुशाल असो. ' या पुढचे तिने राघोबाला लिहिलेले पत्र (पे. द.) पहा : ' आपणाकडून बहुत दिवस पत्र येत नाही. तर स्मरणपूर्वक सदैव पत्रे पाठवावी. आपणांस संक्रमणाचे तीळ शर्करायुक्त पाठवले आहेत. स्वीकार करावा. ' तिचा जिव्हाळा या पत्रात दिसतो. तशी राघोबा-बद्दलची आस्था पुढील पत्रात व्यक्त होते. ती कारकुनाला लिहिलेल्या पत्रात म्हणते (पे. द.) : ' श्रीमंत राजेश्री दादासाहेबांची शरीरप्रकृती कशी आहे ? मौन धरीले आहे म्हणून वर्तमान आइकिले; त्यावरून आपणास लिहून पाठवायाची आज्ञा झाली. त्यात स्नानसंध्या काय किती करितात ते सविस्तर लिहून पाठवावे. ' राघोबाच्या पहिल्या बायकोचे नाव जानकीबाई. नानासाहेब कर्नाटकाच्या स्वारीवर गेला तेव्हा गोपिकाबाई बरोबर जानकीबाईही तिकडे गेली होती. नंतर ती पुण्यास परतली. त्या वेळी गोपिकाबाईने तिला कसे खुबीदार पत्र लिहिले आहे ते पहा : ' तेथे दादावरच माया राहिली. इकडील विसरलासे दिसते, परंतु ऐसे नसावे. येकायेकीच मित्रपणास अंतर न पडावे. बहुधा विस्मरणेकडून होत असेल ते स्मरणेकडून करावे. ' या सर्व पत्रांवरून राघोबा नि त्याची

पत्नी जानकीबाई हिजवर गोपिकाबाईची कशी ममता होती ते समजते. पुढे तिच्यावर अनेक आपत्ती कोसळल्यामुळे तिच्या स्वभावात कडवट-पणा आला तरी तिचा मूळ स्वभाव प्रेमळ अन आवस्थेवाईक होता; याची खात्री तिच्या वरील पत्रांवरून येते.

१५ डिसेंबर १७४९ रोजी पुण्यश्लोक शाहुमहाराजांच्या निधनानंतर छत्रपती रामराजास ४ जानेवारी १७५० रोजी सातार्‍यास राज्याभिषेक झाला. तेव्हा गोपिकाबाई आपल्या दोन मुलांना – विश्वास–माधव – यांना घेऊन तिथे गेली होती. तेव्हा ताराबाईने तिला बहुमानाचा पोषाख देऊन तिचा चांगला सन्मान केला. ताराबाई (१६७५—१७६१) ही वास्तविक पेशव्यांची – नानासाहेबाची पक्की द्वेष्टी. पण त्या वेळी तिने दूरदृष्टीने गोपिकाबाईचा सन्मान केला असावा असे दिसते. रामराजा दत्तक प्रकरणी तिने गोपिकाबाईचा सल्ला घेतला होता हेही एक कारण ह्या सन्मानाच्या मुळाशी असावे. हा सन्मान होत असतानाच नाना-साहेबांचे बायकोवरील प्रेमही शुक्लेंदुवत् वाढत होते. कर्नाटकाच्या स्वारीवरून (१७५३) त्याने कारभार्‍यास पत्र धाडले (पे. द.) ते असे : ‘ तांब्याचा पेला येक पाठविला आहे. हा श्रीमंत सौ. बाईसाहेबास पाणी प्यावयास द्यावा – मुगदलाचा लाडू पाठविला आहे. हा भक्षून पहावा.’ कुठे पुणे नि कुठे कर्नाटक! पण तिथूनही नानासाहेब बायकोला लाडू अन् तांब्याचा पेला धाडतो यावरून गोपिकाबाईवरील त्याची प्रीती ध्यानात येते. दोन वर्षांनी, राघोबाची पहिली पत्नी वारल्यावर त्याचे दुसरे लग्न झाले आनंदीबाईशी (१७५५). त्याची ही दुसरी बायको पुढे चांगलीच गाजली अन् तिचा बराच दुर्लौकिकही झाला. तरीही पानिपतच्या लढाईपर्यंत या दोघांशी गोपिकाबाईचे सख्य असावे असे दिसते. पानपतच्या रणकंदनानंतर झालेल्या उलथापालथीमुळे सर्वच मनू बदलला.

दिवसेंदिवस सदाशिवरावभाऊचे कर्तृत्व वाढत होते. नानासाहेबांच्याही तो लोभात आला. कारकुनी कामात जसा हा टाकाला जबरा, तसा तरवार मारण्यातही चांगला तरबेज. कर्नाटकच्या स्वारीतही याने चांगली कामगिरी बजावली. पण असा हा पाणीदार अन् तरतरीत सदाशिराव गोपिकाबाईच्या डोळ्यात सलू लागला. हा शूर अन् तेजस्वी पुरुष आपल्या नवऱ्याला बाजूस सारून पेशवेपद बळकावून बसेल, अशी खोटी भीती तिला वाटू लागली. पेशवेकुटुंबातील अंतःकलह इथपासूनच वाढीस लागला. त्या वेळी घरातही तिचाच वरचष्मा होता. बाजीरावाची आई राधाबाई (मृत्यू १७५३) व बायको काशीबाई (मृत्यू १७५८) या निवर्तल्यानंतर वडीलकीचा मान हिच्याकडेच आला. त्या वेळी घरात बाजीरावाचा चौथा मुलगा जनार्दन याची बायको सगुणाबाई, सदाशिवरावाची पत्नी पार्वतीबाई, राघोबाची बायको आनंदीबाई अन् विश्वासरावाची बायको लक्ष्मीबाई वगैरे बायकांत गोपिकाबाई वयाने अन् मानाने मोठी. तिचा अधिकार त्या सर्व बायकांत ज्येष्ठ समजला जाई. नवऱ्यावरही अधिकार गाजविण्याचा प्रयत्न ती करी-- राजकारणातही नाक खुपसण्याचा प्रयत्न ती करी. पण नानासाहेब तिला बधत नसे. या सुमारास उदगीरच्या लढाईवर (१७५९) निघण्यापूर्वी कुणी मुजफरखान नावाच्या गारद्याने सदाशिवरावाचा खून करण्याचा प्रयत्न केला. यात गोपिकाबाईचे अंग होते, असा प्रवाद आहे. ग्रँड डफ (१७८९-१८५८) हा इतिहासकार बाईचे या कृत्यात अंग होते असे म्हणतो; पण त्यास आधार अगर पुरावा नाही. रियासतकार सरदेसाई यांनी आपल्या नानासाहेबांच्या चरित्रात (१९२६) गोपिकाबाईबद्दल पुढील उद्गार काढले आहेत, ' नानासाहेबाची बायको गोपिकाबाई हुशार व बाह्य कारभारात लक्ष घालणारी होती. तिने भाऊसाहेबाबद्दल पेशव्याचे मन कलुषित केले, असा प्रवाद होता. रामचंद्रबाबाच्या जोरावर

छत्रपतीची पेशवाई स्वतःच उपटण्याचा सदाशिवरावाचा बेत आहे, असे गोपिकाबाईने नानासाहेबाच्या मनात भरविले असावे. या प्रकरणी पेशव्याचे मन संशयग्रस्त झाले होते हे निर्विवाद आहे. ' सरदेसायांच्या या भाष्यावरून तिच्या मनात भाऊसाहेबाबद्दल आकस होता, ही गोष्ट उघड होते. पण त्याच्या खुनाच्या प्रयत्नांसंबंधी ते म्हणतात, हे कृत्य गोपिकाबाईच्या प्रेरणेने झाले असे डफ म्हणतो, पण त्यास आधार नाही. तात्पर्य तिचे या खुनात अंग नसले, तरी सदाशिवरावाबद्दल तिच्या मनात तेढ होती, याबद्दल संशय उरत नाही. या खुनाच्या सुमारास तिच्या जीवनाचे पहिले पर्व समाप्त झाले, असे समजण्यास हरकत नाही. नंतर तिच्या शोकपर्वास सुरुवात झाली.

या वेळी मराठ्यांचे साम्राज्य ऐश्वर्याच्या ऐन शिखरावर होते. नानासाहेब हा मोठा रसिक होता. धार्मिक पुस्तकांच्या आणि संस्कृत ग्रंथांच्या अनेक पोथ्या त्याने मिळविल्या. त्याप्रमाणे ब्रह्मवैवर्तपुराण मिळविण्याच्याही तो खटपटीत होता. या पुराणात श्रीकृष्णांनी गोपींबरोबर अन् राधेबरोबर ज्या क्रीडा केल्या, त्यांचे वर्णन आहे. हे पुराण पैदा करण्यासाठी तो अगदी आसुसला असल्याने त्यावरून त्याची वृत्ती समजून येते. नाटकशाळांचा अन् खेल्यांचाही त्याला षौक होता. उत्तरेतून त्याने सुंदर नि गोऱ्या मुली आणवल्या होत्या. 'दोन पोरी खूबसुरत, दहा दहा वर्षांच्या हिंदु शुद्ध जरूर खरेदी करून जरूर पाठवाव्या ' असे त्याने आपल्या दिल्लीच्या वकिलाला (हिंगणे याला) लिहिलेले पत्र उपलब्ध आहे. एकंदरीत काय तर तो अगदी स्त्रैण होता. त्याच्या अखेरच्या दिवसांत तर तो नाचरंग वगैरेत अगदी दंग होता. राजकारणात तो बायकोचे ऐकत नसेच नि वर आता त्याने नाटकशाळाही बाळगल्या तेव्हा गोपिकाबाईचे त्याच्याशी बिनसल्यास नवल नव्हे. ती अगदी वैतागली. तिच्या सर्वांगाचा अगदी भडका उडाला.

अशा परिस्थितीतच पानिपतचे रणकुंड पेटले. पुत्र विश्वासराव अन् सदाशिवराव यांनी तिकडे कूच केले. पानिपतावर अडचणीत असताना भाऊसाहेबांच्या मदतीस नानासाहेब निघाले. गोपिकाबाई बरोबर होतीच. तिने त्याला पुढे जाण्यापासून परावृत्त केले असाही प्रवाद आहे. हेतू हा की, भाऊसाहेबाचा काटा तिकडेच परस्पर निघावा. हा प्रवाद खरा असेल, तर ही मसलत तिच्या चांगलीच अंगलट आली, असे म्हटले पाहिजे.

भाऊसाहेब अडचणीत आहे हे वृत्त समजल्यावर नानासाहेब फौजेसह निघाला नि ग्वाल्हेरपर्यंत आला. इकडे पानिपतावर भाऊ अन् विश्वास ही दोन 'पाणीदार मोती' कामास आली. गोविंदाग्रजांनी आपल्या पानिपतच्या फटक्यात याविषयी पुढील उत्कृष्ट काव्यपंक्ती केलेल्या आढळतात :

दोन हरवली मोति; मोहरा
गेल्या सत्ताविस तशा।
रुपये खुर्दा नये मोजिता वचना
वदती वृद्ध अशा॥

नानासाहेब २० जानेवारी १७६१ रोजी भेलशास आला. बरोबर गोपिकाबाई नि माधवरावही होते. थोड्याच वेळात त्याला 'दोन मोती गलत, दहावीस अश्राफत, रुपयोंको गणति नाही' ही शोकदायक वार्ता समजली. तेव्हा त्याचा धीर खचला. त्या वेळी त्याची प्रकृतीही बरी नव्हती. १७८ पौंडांवरून त्याचे वजन ११४ पौंडांवर आले होते. त्याचा पुढे जाण्याचा विचार होता. पण बरोबरच्या मंडळींनी त्याला परावृत्त केले. त्या सुमारास (फेब्रुवारी-मार्च १७६१) त्याने नाना पुरंदऱ्यास पुढील हृदयस्पर्शी पत्र लिहिल्याचे आढळते: "एका भाऊवाचून

दुनिया दौलत व्यर्थ आहे. त्याचे हातचे पत्र पाहीन तेव्हा माझे बायकोस व मला जीव येईल. आता तो वेडेपणा आहे. लेक अल्पायुषी होता, सूर्यमंडळ भेदून गेला. ते दुःख परमार्थ शास्त्रपुराणेकरून टाकिले. परंतु चिरंजीव भाऊवाचून दुनिया व्यर्थ."

गोपिकाबाईही त्या वेळी दुःखात चूर होती. एकोणीस उमरीचा देखणा पोरगा विश्वासराव मृत्युमुखी पडला. भाऊसाहेब बेपत्ता झाला. 'फुटे बांगडी दीड लाख ती; राख झाली तरुणांची'– असे चित्र तिला उघड्या डोळ्यांनी पहावे लागले. या आघातामुळे तिच्या नवऱ्याला भ्रम झाला. या सर्वांत तिच्या काळजाला चटका देणारी एक गोष्ट घडली, तीही सांगितली पाहिजे. पानपतावर कूच करण्यापूर्वी २७ डिसेंबर १७६० रोजी नानासाहेबाने वाखरे नावाच्या ८–९ वर्षांच्या देशस्थ ब्राह्मण मुलीशी लग्न केले. तिचे नाव राधाबाई ठेवण्यात आले. हा घाव गोपिकाबाईच्या मर्मावरच होता. नवऱ्याचा बाहेरख्यालीपणा काही कमी नव्हता. तो तिलाही ठाऊक होता. त्या काळी तो प्रकार समाजात रूढ असल्याने त्याची क्षिती तिने फारशी बाळगली नसेल. पण आपल्या डोक्यावर नवरा सवत आणील अशी कल्पना स्वप्नातही नसणार. अर्थातच नानाच्या या द्वितीय विवाहामुळे तिच्या मानी मनाला दुःखाच्या इंगळ्या कशा डसल्या असतील याची कल्पना करणे कठीण. पण ती गोष्ट होऊन गेली खरी. ही संकटपरंपरा एवढ्यावरच भागती तर ठीक होते. पण दि.२३ जून १७६१ रोजी पर्वतीवर 'भाऊ, भाऊ' असा आक्रोश करीत नानासाहेबही निधन पावला. तेव्हा तिचे अवसान गळाले. नानाच्या निधनाने तिचे छत्र उडून गेले. शिवराम शाहीर हा प्रसंग डफावर थाप मारून कसा सांगतो पाहा :

नाना होते केवळ अवतार,
गोपिकाबाईचे छत्र,

कळस ढळला । पण नाही करुणा
आली त्या देवाला ।

ताराबाईची सून नि कोल्हापूरच्या छत्रपती संभाजीची बायको जिजाबाई (मृत्यु : १५-२-१७७३) हिने गोपिकाबाईला पुढीलप्रमाणे सांत्वनपर पत्र त्या वेळी धाडले : "ईश्वरे हे गोष्टी बहुत आनुचितच केली. तुम्हास व राजश्री रघुनाथ पंडित व माधवराव यांसी दुःखाच्या कोटी जाहल्या. राजश्री सदाशिव पंडित व विश्वासराव याचे ठिकाण न लागले ते चिंतेत निमग्न असता, ईश्वरे हा आघात प्राप्त केला. होणारास उपाय आहे असे नाही. विवेकेकरून शोकाचे परिमार्जन करावे, बहुत काय लिहिणे."

पती गेला, हातातोंडाशी आलेला ज्येष्ठ मुलगा गेला. भाऊसाहेबाचा ठावठिकाणा नव्हता. नवीन सवत आली तिलाही वैधव्य आले. आणि ते केव्हा? तर लग्न झाल्यावर केवळ सहा महिन्यांत. तिचे वय तेव्हा आठ-नऊ असेल. सदाशिवरावाची पत्नी पार्वतीबाईही एकाकी झाली. या सर्व प्रसंगांनी गोपिकाबाईची कंबर खचली. ऐन उमेदीत तिचा संसार उध्वस्त झाला. त्या वेळी तिचा मुलगा माधवराव होता सोळा वर्षांचा नि नारायणराव होता सहा वर्षांचा. त्या मुलांकडे पाहून तिला काळ कंठणे भाग होते.

दि. २० जुलै १७६१ रोजी माधवराव पेशवा झाला. त्या वेळी राघोबाने गोपिकाबाईला लिहिलेल्या पत्रात तिच्या योग्यतेबद्दल पुढील उद्‌गार काढले आहेत, 'वडिलास मनसुबाही कळतो. केवळ वरकडी बायकांप्रमाणे नव्हत. प्रपंच परमार्थ दोन्ही वडिलास कळतात. तेथे काय विस्तार लिहावे?' मुलगा तरी आपल्या कलाने वागेल अशी तिची कल्पना होती. पण ती फोल ठरली. यासंबंधी रियासतकारांनी पुढीलप्रमाणे उद्‌गार (मराठी रियासत मध्य विभाग ४, १९२५) काढले आहेत : 'गोपिकाबाई हुषार परंतु मनस्वी होती. नवऱ्याने आपल्या हयातीत तिचा

हट्ट कधी चालू दिला नाही; आणि राज्यकारभाराच्या बाबतीत तिला कधी विचारलेही नाही. परंतु नवऱ्याचे नियंत्रण दूर होताच माधवरावास पुढे करून राज्यकारभार चालविण्याची इच्छा तिला फार दिवस गाजविता आली नाही. वर्ष दोन वर्षांत माधवराव स्वतःचे विचाराने वागू लागताच ती सन १७६४ च्या फाल्गुनचे सुमारास नाशकास जाऊन राहिली, ती पुन्हा कधी पुण्यास आली नाही.' एकंदरीत काय, तर सगळ्याच गोष्टी तिच्या मनाविरुद्ध घडत होत्या. तरी बाई मोठी धीराची होती यात शंका नाही. मे १७६३ च्या सुमारास पुण्यास निजामाच्या स्वारीची हूल उठली, तेव्हा आनंदीबाई, रमाबाई (माधवरावांची बायको), सगुणा-बाई आणि नारायणराव अशी सर्व मंडळी पुरंदरावर जाऊन राहिली; पण गोपिकाबाई शनिवारवाडा सोडून गेली नाही.

माधवराव आईचे ऐकत तर नव्हताच पण प्रारंभी तो राघोबापुढे पड खाऊ लागला. ही गोष्ट गोपिकाबाईस सहन होईना. राघोबा हा तत्कालीन राजकारणातला कलिपुरुषच होता. राजकारणात अशा माणसाला एकदम खड्यासारखे बाजूला कसे टाकणार? माधवराव दमादमाने या गोष्टी करू पहात होता. पण आईला तेवढा धीर कोठला असायला ! माधवरावाचे आईवर प्रेम होते. पण राजकारणात तिने घोळ घालू नये – नाक खुपसू नये असे त्याला वाटे. अर्थात असे बाजूला बसणे गोपिकाबाईला मानवणारे नव्हते. तिच्या रोषास आणखी कारण तेव्हा घडले. तिचा भाऊ रास्ते याने नियमाप्रमाणे फौजही बाळगली नाही व हिशेब दाखविण्यासही तो खळखळ करू लागला. निःस्पृह माधवरावास त्यामुळे फार चीड आली. त्याने आपल्या मामाची भर दरबारात कानउघाडणी तर केलीच शिवाय त्याचा सरंजामही जप्त केला ही गोष्ट तिच्या मनास फार झोंबली. आपली इथे रया नाही असे तिच्या मनाने घेतले. माधवरावाची बायको रमाबाई हिच्याशीही तिचे विशेष रहस्य नव्हतेच.

तेव्हा बाई अशा विमनस्क स्थितीत त्राग्याने नाशकाजवळ गंगापुरास चालती झाली (१७६४). माधवरावाने तिच्या इतमामास शोभेल असा वाडा तिला तिथे बांधून दिला. ३४ हजारांचे वार्षिक उत्पन्न त्याने तिला दिले. तिथे तिचा बहुतेक वेळ पुराणश्रवणात नि ईश्वराराधनेत खर्च होई. अशा रीतीने तिच्या आयुष्याचे मध्यपर्व इथे संपले, तरी शोकपर्व मात्र संपले नव्हते.

गोपिकाबाई गंगापुरास गेल्यानंतर माधवराव तिला पत्रे लिहून सर्व खबरा कळवी. तिचे पत्र आले नाही तर, 'बहुत दिवस आशीर्वादपत्र येऊन वर्तमान कळत नाही' असे लिहून तिच्याबद्दल जिव्हाळा प्रकट करी. तिचा सल्ला मात्र तो चुकूनही घेत नसे. पुण्यास येण्याविषयी तो लिही. पण ते तिने कधी मनावर घेतले नाही. नाना फडणीसही तिने यावे म्हणून तिला लिही. ओझ्यासाठी उंट रवाना करण्याचे आश्वासनही तो तिला देई. पण तिने आपला हेका कायम ठेवला अन् ती कधी फिरून शनिवारवाड्यात आली नाही. महत्त्वाची पत्रे माधवराव तिला बालबोधीत लिही. तिला मोडी येत नसे. अर्थातच बालबोधीत पत्र आल्याने ती स्वतः ते वाचू शके. गुप्तता राखली जाई. तिला लिहिलेल्या पत्रांचा 'अपत्ये माधवरावाने चरणावरी मस्तक ठेवून' असा आरंभ तो करताना आढळतो. त्याच्याबद्दलही तिच्या मनात ममत्व असे. १७६९ च्या सुमारास त्याची प्रकृती बिघडली. तेव्हा तिने नाना फडणिसाला कळकळीचे पुढील पत्र लिहिले : 'ब्राह्मण लावले ते अनुष्ठानसमाप्तीपर्यंत वाड्यातच राहू द्यावे. त्यांनी यजमानास आरोग्य होण्याविषयी प्रार्थना करीत जावी... आठ पंधरा दिवस जास्त लागले तरी हरकत नाही. कमी पडू न द्यावे. ब्राह्मणांनी वाडयातच निजावे. हिमाइती ब्राह्मण आणि उपयोगी नसतील ते दूर करून परीक्षेचे उत्तम लावावे.' १७६५ च्या पत्रात तिने एकदा रमाबाई, नारायणराव व सगुणाबाईला गंगापुरासही

बोलाविले होते. एकूण काय, तर तिचा देह गंगापुरास असला, तरी तिचे मन शनिवारवाड्याभोवतीच कसे घोटाळत होते, याची खात्री वरील प्रसंगावरून येते.

चौतीस वर्षे पुण्यात शनिवारवाड्यात राहिल्यानंतर, चाळिशीच्या घरात त्या वाड्याचा त्याग करून ती गंगापुरास राहू लागली. ही गोष्ट तिच्या हट्टीपणाची द्योतक असली, तरी ऐश्वर्याचा मोह तिने कसा झुगारून दिला, ही गोष्टही दृष्टीआड करता येत नाही. पुण्याहून ती हव्या असलेल्या जिनसा मागताना आढळते. श्रीवर्धनी व चिकणी सुपारी, पिस्ते, सोवळ्यातली शाल, पायात घालण्यास काळ्या रंगाचे चर्मी जोडे, ब्राह्मणांचे पाय धुण्यास चांदीचा गडवा वगैरे जिनसा ती मागविताना आढळते. कंठ्या देऊन ती ब्राह्मणांचा सतत परामर्श घेते. तसेच दासींची लग्नेही स्वखर्चाने लावून देते. दारूबंदी करण्याबद्दल तिचा कटाक्ष असतो. कन्याविक्रयाच्या प्रथेबद्दलही ती नाना फडणविसाला लिहिलेल्या आपल्या पत्रात (पे. द. खंड ३२, पत्र नं. २०६) कडाडून हल्ला करताना आढळते. तिच्या पडत्या काळातही पुणे दरबाराचे सर्व कारभारी तिला वचकून असतात अन् नाना फडणविसासारख्या मंत्र्यालाही तिचा दरारा वाटतो – धाक वाटतो.

१७७२ च्या सप्टेंबरात गोपिकाबाईची प्रकृती बिघडते. पालखीत बसूनही बाहेर फिरण्यास तिला त्रास होतो. पण कसल्या तरी मात्रेने तिला गुण आला. काशीयात्रा घडावी असे तिला फार वाटते. पण तो योग साधत नाही, म्हणून ती फार हळहळते. यासंबंधी आनंदीबाई काय म्हणते (पे. द. खंड ४) पहा : ‘ पूर्वी माधवराव असता थोरली बाईचे (गोपिकाबाई) जाणे झाले नाही...बाई महायात्रेस किमर्थ जात नाही? गनिमाई म्हणावी तर पूर्वी ताईसाहेब (काशीबाई) गेली तेव्हा धनी होते. आता कोण आहे ? ’ आनंदीबाईलाही गोपिकाबाईच्या काशीयात्रे-

विषयी ओढ वाटते. मग स्वतः बाई गंगापुरास त्याबद्दल किती तळमळ असेल, त्याची कल्पना सांप्रतच्या वाहनांच्या विपुलतेच्या काळात येणे कठीण आहे. त्या काळी वाहनांचे दुर्भिक्ष अन् काशीचा पल्ला तर फार दूरचा. म्हणून काशीयात्रा घडणे त्या काळी फार कठीण असे. तशातही थोरल्या बाजीरावाची आई राधाबाई (१७३६ मध्ये), त्याची बायको काशीबाई ' (१७४६ मध्ये) अन् जनार्दनपंताची बायको सगुणाबाई (१७५८ मध्ये) या पेशवे कुटुंबातील तिघींनी काशीयात्रेचे पुण्य संपादिले होते. गोपिकाबाईच्या वाट्यास ते भाग्य लाभले नाही. म्हणून धार्मिक प्रवृत्तीची ती बाई मनातून फार कष्टी असे.

काय असेल ते असो. नियतीने गोपिकाबाईचा अगदी छळ केला, असेच म्हणणे भाग आहे. कारण १८ नोव्हेंबर १७७२ रोजी तिचा कर्ता मुलगा पेशवा माधवरावही थेऊर येथे क्षयाने मरण पावला. तिच्यावर पुन्हा दुःखाचे आभाळ कोसळले. पुढे हिचे अन् आनंदीबाईचे अगदी विळ्याभोपळ्याएवढे सख्य बनत गेले तरी आनंदीबाई या प्रसंगाबद्दल काय म्हणते (पे. द. खंड ४) पहा : ' बाईची धन्य आहे. दोन मूल हत्तीप्रमाणे गेले. आम्हास किती वाईट वाटते. मग त्यांचे काय पुसावे ?' आनंदीबाईची ही स्थिती. तेव्हा माधवरावाच्या मृत्यूने गोपिकाबाईचे हृदय कसे करपून गेले असेल, याची कल्पना येणे कठीण आहे. रमाबाईच्या आत्मार्पणामुळे तर तिचे मन दुभंगूनच गेले. या दुःखातून जरा ती मोकळी होते न होते, तोच नारायणरावाचा वध झाला. तिचा तिसरा मुलगाही काळाने ओढून नेला. काय गंमत पहा. तिला पाच मुलगे झाले. दोन अल्पायुषी निघाले अन् इतर तिघांचे मृत्यू तीन तऱ्हांनी झाले. बाईची स्थिती अगदी हीन दीन झाली नि तिच्या डोळ्यातले अश्रू सुकून गेले. नारायणरावाच्या वधाचे दुःख तिला इतके अनावर झाले की काही काळ ती मठात जोगीण बनून भिक्षेवर निर्वाह करू लागली. तिचे

नारायणावर अतिशय प्रेम होते. त्याचे सिंहगडास लग्न तिनेच लाविले. गंगापुरास तो तिच्याजवळ येऊन रहातही असे. दि. १८ एप्रिल १७७४ रोजी नारायणरावाची पत्नी गंगाबाई प्रसूत होऊन तिला मुलगा झाला तोच पुढे सवाई माधवराव या नावाने पेशवा झाला. तेव्हा गोपिकाबाई पूर्वस्थितीवर आली अन् मग गंगापुराहूनही तिची नजर सवाई माधवरावा-भोवती भिरभिरू लागली.

सवाई माधवराव पुढे पुढे थोडा स्वच्छंदी बनत चालला. नाना फडणविसांना तो जुमानीना. जेवताना तो मुसलमानी शब्द वापरी. जवळच्या मंडळीना–उपाध्ये–जोशी वगैरेंना तो शिव्या देई. प्रसंगी मारीही. चौकीवरील लोकांनाही तो शिव्या देई. कुणी ब्राह्मण दर्शनास गेला तर त्याच्यावरही तो अपशब्दांचा मारा करी. दरबारात जाण्यास तो आळस करी अन् मुत्सद्दी मंडळींचीही तो थट्टा करी. गंगापुराहून त्याच्या शिक्षणाची गोपिकाबाई नेहमी विचारपूस करी. तिला हा प्रकार कळला तेव्हा अर्थातच तिला फार वाईट वाटले. अन् मग तिने त्याला तेरा कलमी उपदेश केला. त्यातला महत्त्वाचा भाग पुढीलप्रमाणे होता :

" तालीमखान्यात जाऊन दंड काढावे.... जेठी यांनी कुस्तीचे डाव शिकवावे... शास्त्री व वैदिक महान शिष्ट आल्यास नमस्कार करून पण योग्यतेनुरूप उत्थापन देऊन काही भाषण करावे... कचेरीस यावे ते समयी सर्वांक्ष देऊन योग्यतेनुरूप नेत्रलाभ व भाषण होत असावे. कचेरीत लघु शब्द बोलू नये व गैरही बोलू नये. मनुष्यपरीक्षा असावी... दुसऱ्याचे क्षुद्र काढू नये.... पाक करणार व शिष्यमंडळी सुशिक्षित विश्वासूक असतील ते बाळगावे.... शास्त्री याजवळ विराटपर्वा-पासून भारतातील चिंतनिका करीत असावी... आपले वडिलांच्या गोष्टी कारभारी यासी एकान्त स्थळी विचारीत असावे व तसबिरा व नकाशे अनेक पहात असावे....खर्डे लिहावयास बसावे, ते समयी एक

दोन मुले संभावित गृहस्थांची असावी... घोडी फेरावयास चार रोजांनी जात जावे. ते समयी बरोबर पटवर्धन मंडळी व अन्य सरदार असावे. त्यांशी भाषणे करणे ते संतोष वृत्तीने करावे. ज्या दिवशी स्वारी जावयाची नाही, त्या दिवशी कागदपत्र दौलत प्रकरणी असतील ते कारभारी यांणी समजावीत असावे. ते समयी कोणी असो नये... कार्यकारी कारण मंडळ जवळ असावी. ते समयी बातमीदार याणी वर्तमान गुप्त सांगत असावे... बातमी प्रमाण अथवा अप्रमाण सांगतात याची चौकशी असावी."

तिने सवाई माधवरावास केलेला वरील उपदेश पाहिला की तिची अक्कल हुषारी, धोरणीपणा अन् मुत्सद्दयाला शोभेल असे तिचे शहाणपण दिसून येते. एकदा तिने सवाई माधवरावास गंगापुरास बोलावून त्याची परीक्षाही घेतली होती.

तिची प्रकृती आता उताराला लागली थोती. शरीर दुबळे होत चालले तसे तिचे मनही थकत चालले. कारस्थानप्रिय राघोबाला याच सुमारास तिला भेटण्याची इच्छा झाली (१७७३). हरिपंत फडके परवानगी विचारण्यास तिजकडे गेले. बाई त्या वेळी फार कष्टी होती. नारायणरावाचा वध राघोबाने करविला हा दंश तिच्या मनात होताच. त्याबद्दल पूर्वीचा असा जिव्हाळा आता पार नष्ट झाला होता. त्याची भेटीची इच्छा समजताच ती एखाद्या वाघिणीप्रमाणे चवताळली अन् मोठ्या कुर्रेबाजपणे बोलली, 'यास अनुताप झाला नाही. मी दर्शन देत नाही. यास लोकलज्जा नाही. तेव्हा पश्चात्ताप काही नाही. लबाडी आहे. याची प्रकृती मला ठाऊक आहे.' तरी पण आग्रहच झाला तेव्हा ती बाणेदारपणे म्हणाली. 'आहे त्याप्रमाणे प्रायश्चित्त घेऊन एकटा येईल तर दर्शन होईल.' राघोबाने ही अट मान्य केली. नंतर त्याने सक्षौर प्रायश्चित्त घेतले. तेव्हा तिने त्याची भेट घेली.

तिची साठी आता उलटली होती. कर्तीसवरती सर्व तरुण मंडळी

तिच्या डोळ्या देखत गेली. त्याचे शल्य तिला सारखे जाणवत होते. तिच्याहून किती तरी लहान असलेली तिची सवतही (राधाबाई) तिच्या आधीच वारली. सवाई माधवरावाची आई गंगाबाईही निर्वतली (१७७०). तिचे शरीर अन् मन दुःखाने पोखरून निघाले. एकाकीपणा तिला जाणवू लागला. तिचा स्वभाव हट्टी नसता तर आप्तस्वकीयांत ती रमली असती. गंगापूरला ती एखाद्या तपस्विनीप्रमाणे राहिली. चोवीस वर्षे तिचे गंगापुरला वास्तव्य होते. पण पुण्याची माया असूनही तिथे जाऊन येण्याचा मोह तिने टाळला. म्हणून तिच्या कडकडीत वैराग्याचे कौतुक वाटते. आदर वाटतो. तिचा स्वभाव तरुणपणी महत्त्वाकांक्षी, करारी अन् कलहप्रिय असला, तरी तिच्यावर ओढवलेल्या संकटपरंपरेमुळे तिच्याबद्दल मनात कणव उत्पन्न होते, अनुकंपा वाटते. नशिबाचा कौल या बाईला थोडासा जरी अनुकूल पडता तरी तिच्या शहाणपणाचे सोने झाले असते. पण कमनशिबामुळे तिचे सारे गुण मातीमोल झाले. दिव्यातील ज्योत जशी मंदावत जावी याप्रमाणे तिची जीवनज्योतही मंद होत गेली अन् मग नानासाहेब पेशव्याची ही कर्तृत्ववान बायको, गोपिकाबाई दि. ३ ऑगस्ट १७८८ रोजी वयाच्या ६४ व्या वर्षी गंगापुरास निधन पावली. तिचे क्रियाकर्म तिचा भाऊ गंगाधर भिकाजी रास्ते याने यथासांग पार पाडले अन् त्याप्रीत्यर्थ ३३५२९ रुपये खर्च केले. हिच्या मृत्यूने सवाई माधवराव उघडा पडला, पोरका झाला.

गोपिकाबाईच्या निधनोत्तर कोपरगावी रहात असलेल्या आनंदीबाईने सवाई माधवरावाला पुढीलप्रमाणे सांत्वनपर पत्र लिहिले : ' बाईसाहेबांस पंचवटीस रविवारी कैलासवास झाल्याचे वर्तमान सोमवारी सायंकाळी येथे अफवा आली. मंगळवारी प्रातःकाली नासिकचे सराफाचा माणूस आला त्याणे पक्के वर्तमान सांगितले.... चिरंजिवास आईबाप भाऊ

कोणीच नाही. आम्ही दूरच आहो. एक आजी तेही दूरच होती. परंतु ममतेचे तेवढेच मनुष्य होते.... त्यांचाही काळच आला होता. सृष्टीची वाट हीच आहे. ' पुत्रशोकाने पोळलेल्या पेशवाईतल्या या दुर्दैवी स्त्रीचे – गोपिकाबाईचे – स्मरण झाले की, वासुदेवशास्त्री खऱ्यांच्या 'गोपिकाबाईचा पुत्रशोक ' या काव्यातल्या पुढील पंक्ती आठवतात अन् मग गळा दाटून येतो :

शोभे ज्या अभिमन्यूचीच उपमा
विश्वास माझा गुणी
मानी माधव आठवीन न कसे
नारायणाही मनी
एकामागून एक नाश मुलगे
माझे कसे पावले ?
हा देवा ! करण्यास नाश पुरता
कैसे तुला फावले ?



४. महान मुत्सद्दी महादजी शिंदे

पेशवाईच्या उत्तरार्धात नाना फडणवीस अन् महादजी शिंदे हे दोन पुरुषश्रेष्ठ आपल्या कर्तृत्वाने गाजले. नानांचे नाव मुत्सद्दी म्हणून ख्यात-मान पावले, तर महादजीचा लौकिक मुत्सद्दी अन् तरवारबहाद्दर म्हणून पसरला. नानांनी सारे राजकारण पुण्यात बसून लढविले. त्यांचे सारे बळ लेखणीत दिसायचे. महादजीने दिल्लीपर्यंत दौड मारून उत्तर हिंदुस्थानात मराठ्यांच्या पराक्रमाचा बावटा फडकविला. पानपतचे खरे अपयश त्यानेच धुऊन काढले. कवायती फौजेचे महत्त्व त्यालाच समजले. त्याने केलेल्या उत्तरेकडील राजकारणात पुणे दरबाराकडून त्याला मिळावा तसा पाठिंबा मिळाला नाही. एरवी मोगल बादशहाकडून पेशव्यांना मानाची अन् गौरवाची वस्त्रे आणणाऱ्या महादजीचे नाव वेगळ्या प्रकारे इतिहात झळकले असते. दिल्लीच्या राजकारणात त्याला नानांकडून मनाजोगते साहाय्य मिळते तर मराठ्यांचा इतिहास वेगळ्या प्रकारे उठून दिसला असता, इंग्रजांच्या वाढत्या अंमलाची लाट वेळीच थोपवली गेली असती त्यामुळे पेशवाईच्या अखेरच्या काळातला सर्वश्रेष्ठ शूर म्हणून महादाजीचे नाव मराठ्यांच्या इतिहासात चिरस्मरणीय झाले आहे.

शिंद्यांचा मूळपुरुष राणोजी शिंदे. हा सातारा जिल्ह्यातील वर्धनगड डोंगराजवळ असलेल्या कण्हेरखेड गावचा पाटील. थोरल्या बाजीराव पेशव्यांच्या अमदानीत हा नावारूपाला आला. निजामाच्या स्वारीच्या प्रसंगी त्याने पुढील पत्र बाजीरावास लिहिल्याचे आढळते : ‘ ज्या प्रकारची आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्तू. भिऊन पुढे चालावयास अंतर करणार नाही. प्रसंग पडलाच तर स्वामीचे पुण्य समर्थ आहे. आमचा सांभाळ ईश्वर करीतच आहे. ’ एकंदरीत हा मोठा बाणेदार असून बाजीरावाच्या जीवास जीव देणाऱ्यांपैकी एक होता. महंदमखान बंगषाला जेरीस आणण्यातही हा अग्रेसर होता. हा बाजीरावाच्या दिल्लीच्या स्वारीत होता. १७३२ त हा माळव्याचा सुभेदार झाला अन् नंतर त्याने उज्जयिनीस आपल्या सुभेदारीचे ठाणे कायम केले. साठ लक्षांचा मुलूख याच्या अंमलाखाली असून, रामचंद्रबाबा सुखटणकर हा त्याचा दिवाण होता. बाजीरावाच्या निधनोत्तर पाच वर्षांनी ३ जुलै १७४५ रोजी सुजालपूर येथे हा निधन पावला. ‘ त्याच्या असामान्य कर्तृत्वामुळे अन् त्याला उपजत असलेल्या लष्करी ज्ञानामुळे त्याच्यावर, त्याचा धनी बाजीराव याचा लोभ जडला. ’ असे उद्‌गार त्याच्याविषयी इतिहास-संशोधक द. ब. पारसनिसांनी काढले आहेत, तर रियासतकार सरदेसाई आपल्या ‘ न्यू हिस्टरी ऑफ दि मराठाज् ’ (खंड २, स. १९५८) ’ या ग्रंथात त्याच्याविषयी म्हणतात– ‘ प्रामाणिकपणाने अन् पराक्रमाने त्याने बराच काळ मराठेशाहीची सेवा केली. बाळाजी विश्वनाथाच्या अमदानीत तो चाकरीस लागला. पुढे तो शिंदेशाहीची स्थापना करूनच स्वस्थ बसला नाही, तर बुंदेलखंडात अन् माळव्यात मराठ्यांची सत्ता चिरस्थायी करण्यात तो बाजीरावाचा प्रमुख मदतनीस होता. ’ बाजीरावाचा साहाय्यकर्ता राणोजी शिंदे असा मोठा कर्तृत्ववान इसम होता.

अशा या शूर राणोजीला पाच मुलगे होते. जयाजी ऊर्फ

जयप्पा, ज्योतिबा अन् दत्ताजी हे तीन मुलगे त्याला निमाबाई ऊर्फ मैनाबाई या पहिल्या बायकोपासून झाले. चिमाबाई या रजपूत रक्षेपासून त्याला तुकोजी अन् महादजी असे दोन मुलगे झाले. यांपैकी ज्योतिबाचा ओच्छ्र्याच्या छावणीत खून (स. १७४२) झाला. जयाप्पाचाही खून (स. १७५५) झाला अन् दत्ताजी (मृ . १०–१–१७६०) नि तुकोजी हे पानिपतच्या युद्धात गारद झाले. एकंदरीत राणोजीचे हे चारही मुलगे बापाप्रमाणे शूर निघाले. पाचवा मुलगा महादजी याचा जन्म १७२७ सालच्या सुमारास झाला असावा असे दिसते. त्याला भवानी नावाची एक बहीणही होती.

पानिपतच्या अगोदर आपल्या वडिलभावांबरोबर निरनिराळ्या कामगिऱ्यांवर महादजी वावरत असला तरी त्याचा नामोल्लेख ऐतिहासिक कागदपत्रांत आढळत नाही. पानिपतावर जनकोजी शिंदे अन् तुकोजी ठार झाल्यावर त्याने रणांगणातून पळ काढला. पळत असतानाच त्याच्यामागे एक पठाण लागला होता. दुर्दैवाने घोडी अडखळल्यामुळे महादजी नाल्यात पडला. तेवढ्यात पठाण जवळ आला अन् त्याने महादजीच्या पायावर वार करून त्याला कायमचा लंगडा केले. पठाणाने त्याच्या अंगावरील अलंकार अन् त्याची घोडीही हिरावून नेली. त्या वेळी तो विव्हळत पडला असताना त्याला राणेखान नावाच्या इसमाने वाचविले. आपल्या या उपकर्त्याचा त्याला कधीही विसर पडला नाही. पुढे त्याने राणेखानास मोठ्या योग्यतेस चढविले. महादजीच्या आयुष्याचे पहिले पर्व इथेच संपले. या वेळी तो चौतिशीच्या घरात होता.

घरचे सारे कर्ते पुरुष निवर्तल्यामुळे पानिपत युद्धानंतरची पहिली पाच सहा वर्षे महादजी कौटुंबिक घडामोडीतच व्यग्र असल्याचे दिसते. पुरुष-गेले तरी बायकांची मोठेपणा मिरविण्याची हौस काही संपली नव्हती. वडील माणूस कुणी नसल्यामुळे त्यांच्यावर दाब ठेवणे कठीण असल्याने

आर्थिक आपत्तींना महादजीला तोंड द्यावे लागले. त्याला अजून सरदारी मिळालेली नव्हती. घरच्या कर्जाचा भुंगाही त्याच्या पाठीशी होताच. पण राणोजीचे सारे पुत्र पानिपतावर कामी आले याचे विस्मरण पेशवा माधवरावाला झालेले नव्हते. महादजीला दक्षिणेत बोलावून त्याने सांगितले: " तुमच्या सरदारीची घालमेल होणार नाही. त्याबद्दल तुम्ही काळजी बाळगू नये. " घोडपच्या संग्रामात महादजीची कामगिरी दिसून आल्यावर माधवरावाने त्याच्यावर उत्तर हिंदुस्थानची कामगिरी सोपविली अन् त्यानंतर १५ जानेवारी १७६८ मध्ये त्याने त्याला सरदाराची वस्त्रे दिली. इथपासून त्याच्या स्वतंत्र कर्तृत्वाची चमक दिसू लागली.

त्या वेळी दिल्लीत अधिराज्य नजीबखानाचे होते. बादशहा शहाआलम इंग्रजाच्या आश्रयाखाली अलाहाबादला होता. १७६९ च्या अखेरीस रामचंद्र गणेश कानडे व विसाजी कृष्ण बिनिवाले यांच्या आधिपत्याखाली मराठी फौजा उत्तरेकडे निघाल्या. महादजीने आधीच तिकडे प्रयाण केले होते. तुकोजी होळकरही तिकडे गेला होता. जाटांकडून खंडणी वसूल करून, रोहिलखंडात धूम उडवून नि दुआब प्रांत ताब्यात घेऊन मराठे दिल्लीस आले. मराठ्यांनी आग्रा व मथुरा सर केले तेव्हा नजीबखानाने त्याच्याशी वाटाघाटी करण्याचा मनसुबा रचला. पण अकस्मात तो निवर्तल्याने (दि. ३१-३-१७७०) महादजीच्या साहाय्याने बादशहा शहाआलमने दिल्लीत पाऊल टाकले. ठरल्याप्रमाणे त्याबद्दल दहा लाख रुपये त्याने मराठ्यांना देण्याचे कबूल केले. १० फेब्रुवारी १७७१ मध्ये महादजीने दिल्ली सर केली अन् शहाआलमची बादशाहीवर स्थापना करण्याचे ठरविले. १२ एप्रिल १७७१ रोजी शहाआलमने अलाहाबाद सोडले. २६ जुलैला तो फर्रुखाबादेस आला. १६ नोव्हेंबरला अनूपशहराजवळ महादजीने त्याची गाठ घेतली. नंतर ते दोघे बरोबर निघाले अन् ६ जानेवारी (१७७२) मध्ये दिल्लीत येऊन शहाआलम दिल्लीच्या

तख्तावर एकदाचा बसला. पानिपतावर झालेली नाचक्की मराठ्यांनी भरून काढली ती अशी. या महात्कार्यात महादजीचा वाटा प्रमुख होता.

नजीबखान हा महादजीचा कट्टर शत्रू. तो तर निवर्तला होता. त्याच्या मुलगा झाबेताखान अजून हयात होता. पानिपतचे शल्य महादजी विसरला नव्हता. झाबेताखानाचा काटा काढण्याचे त्याने ठरविले. विसाजी कृष्ण महादजी अन् शहाआलम मिळून त्रिवर्गांनी दुआबामध्ये त्याच्यावर चाल (फेब्रुवारी १७७२) केली. तेव्हा झाबेताखान शुक्रतालच्या किल्ल्यात बंदोबस्ताने राहिला, पण ४ मार्चला महादजीने किल्ला हस्तगत केला तेव्हा झाबेताखान जीव वाचविण्यासाठी बिजनोर प्रांतात पळाला. पण मराठ्यांनी त्याचा पाठलाग सोडला नाही. पुन्हा ते नजीबगडावर त्याच्या पाठोपाठ गेले. तिथूनही तो निसटला. या गडाला फत्तरगड अगर नजीबाबादही म्हणतात. तिथे झाबेताखानाचा कबिला व दौलत मराठ्यांच्या हाती लागली. नजीबखानाची कबर तर फोडण्यात आलीच. खेरीज पानिपतावरून नेलेल्या तोफा अन् इतर संपत्तीहि त्यांनी मिळविली. रोहिल्यांची 'न भूतो न भविष्यति' अशी दाणादाण या वेळी उडवून आपल्या बंधूच्या वधाचा सूड महादजीने यावेळी उगवला. हत्ती, घोडे अन् बंदुका अशी अमाप लूट मराठ्यांना या वेळी मिळाली. भावांच्या मृत्यूचा बदला घेतल्याबद्दल महादजीस कर्तव्यपूर्तीचा आनंद भोगावयास मिळाला. या विजयाची बातमी माधवराव पेशव्याला समजली तेव्हा त्याने सरदारांना पुढीलप्रमाणे अभिनंदनपर पत्र धाडले.

'वर्तमान श्रवण करून फार संतोष जाहला. जाबेताखान रोहिला पातशाहीत फौजेने व मर्दुमीने अतिगर्वित होता. तुम्ही सर्वांनी एकदिल होऊन रोहिल्यांचे पारिपत्य केले ही गोष्ट अति उत्कृष्ट केली.... धन्याचा नक्षा हिंदुस्थानात वृद्धिंगत केला. शाबास तुमची... सिंदे होळकरांच्या

वडिलांनी महत्कार्य करून शत्रू पादाक्रान्त केले त्याच रीतीने हेही करितात, या दौलतीचे स्तंभ आहेत.'

बादशाहीचा पुरा बंदोबस्त करण्याचे महादजीच्या मनात होते पण या सुमारास माधवरावाचा मृत्यु अन् पुढे नारायणरावाचा खून या घटना घडल्याने उत्तरेकडील राजकारणास पुणे दरबारकडून विशेष पाठबळ न मिळाल्याने तेथील उद्योग थंडावले.

नारायणरावाच्या वधानंतर बारभाईंच्या कारभारास महादजीचा पाठिंबा होताच. सदाशिवराव भाऊचा एक तोतया माधवरावाच्या कारकीर्दीत उत्पन्न झाला होता. पुढे माधवरावाने त्याची शहानिशा करून त्यास रत्नागिरीच्या किल्ल्यावर कैदेत ठेविले. सवाई माधवरावाच्या कारकीर्दीत या तोतयाचे बंड पुन्हा माजले. त्याला पकडण्यात महादजीच पुढे आला अन नंतर मेखसूने त्यास ठार (दि. १८-१२-१७७६) करण्यात आले. याविषयी 'मराठी रियासत उत्तर विभाग १' मध्ये कोटा दप्तरातले पुढील पत्र पहावयास मिळते-' यजमान (महादजी) या प्रसंगी नसते तर हे खूळ कोणास जुटावे असे नव्हते. केवळ बुडावयाची वेळ आली होती. यजमानांनी मसलत उचलली हे शेवटास जाईल असे कोणी मानीत नव्हता. महादजीने कुणाची प्रतीक्षा न करिता यश संपादिले. सर्वत्र लौकिक जाहला.' तोतयाचे प्रकरण महादजीने निकालात काढल्यामुळे मराठा मंडळावर त्याचे वजन कायम झाले.

सवाई माधवराव पेशवा (२९ मे १७७४) झाल्यापासून पुढे वीस वर्षे मराठेशाहीत महादजीचे नाव सतत गाजल्याचे दिसते. नाना फडणविसाची अन त्याची चुरस नि स्पर्धा सुप्रसिद्धच आहे. एकमेकांबद्दल दोघांची मने अगदीच साफ नसली तरी देशाच्या अपकर्षास कारण होईल अशी कुठलीही गोष्ट या दोघांच्या हातून घडली नाही असे इतिहास सांगतो. मोरोबादादा फडणिसाचे बंड मोडण्यात नानास

महादजीचेच सहाय्य मिळाले. राघोबाचा नक्षा उतरविण्यातही महादजीचा हातभार लागलेला दिसतो. तळेगावला इंग्रजांचे मराठ्यांशी युद्ध झाले तेव्हा त्याची सूत्रे त्याच्याकडेच होती. वडगाव येथे तहाच्या वाटाघाटी झाल्या त्यातही इंग्रजांना त्याच्यापुढे पड खावी लागली. नानांच्या मेणवली दप्तरातले महादजीने नानांना लिहिलेले एक पत्र वासुदेवशास्त्री खऱ्यांनी आपल्या नाना फडणविसाच्या चरित्रात दिले आहे ते पुढीलप्रमाणे आहे. 'आपणाकडील अर्थ, राजश्री, रामचंद्र, शिवदेव यांनी आपणास सांगितल्यावरी आपण शपथपूर्वक खातरजमा करून श्रीवरील तुळशी देतो. असे निश्चयपूर्वक बोलला आणि सरदारी माझी आणि फडणिशी त्यांची बंधुत्वाप्रमाणे वर्तन करू. ज्यांत सरदारीचे कल्याण ते संधान चालवू. जो अनिष्ट चिंतील त्याचे पारिपत्य करू.' म्हणून बोलला, तो मजकूर मशारनिल्हेनी लिहिला तो सर्व समजोन चित्तास परम संतोष झाला. आम्ही श्रीवरील बेलभंडार पाठविला आहे व शपथपूर्वक लिहिले आहे. आपण बंधुत्वाविषयी संशय न मानावा. मशार-निल्हे बोलतील ते आमचे बोलणे जाणावे. ही सरदारी आपली व फडणिशी आमची असा निश्चय जाहला. जेथे आपण आहा तेथे मी आहे हे शपथपूर्वक जाणावे.' १५ मार्च १७७९ च्या या पत्रात महादजीने आपले अतरंग उघडे केलेले दिसते. अर्थात राजकारणात कित्येक प्रसंगी या दोघांचे मतभेद होणे अपरिहार्य होते, तरी पुढे दोघांचे सौरस्य अखेरपर्यंत टिकले. याविषयी १७८८ चे महादजीचे पत्र पुढीलप्रमाणे आहे. 'संकट-समयी मला कोणी कामास आले नाही. एक नानाचा भाऊपणा कामास आला, उदंड झाले तरी थोर ते थोरच.' या दोघांविषयी रियासत-कारांचा अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे– 'नाना व महादजी यांची योग्यता एकमेकांस पूरक होती. इभ्रत, धिमेपणा, युद्धकला या गोष्टी महादजी-जवळ होत्या तर हिशोबाची व आयव्ययाची चोख व्यवस्था कामाचा

उरक, नियमितपणा व टापटीप हे गुण नानाचे अंगी होते, ते महादजीत नव्हते. या दोघांचा समुच्चय कारभारात होऊन एकमेकांचे गुणावगुण भरून निघतील अशी योजना कारभारात झाली असती तर मराठी राज्याचा नाश इतक्या लवकर झाला नसता असे या इतर प्रकरणांवरून वाटल्याशिवाय राहत नाही.' आपल्या 'नाना आणि महादजी' या ग्रंथात (स. १८९५) प्रा. चिं. ग. भानू यांनी या उभयतांचे मार्मिक वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे— 'नाना आणि महादजी हे समकालीन असून एकमेकांचे प्रतिस्पर्धी होते हे वर सांगितलेच आहे. दोघेही पुरुष पानिपतच्या लढाईतून परत आले. दोघांचाही उदय मनुष्यांची उत्कृष्ट पारख करणाऱ्या थोरल्या माधवरावांच्या हातून झाला. नारायणरावांचा खून झाल्यावर दोघांनीही सवाई माधवरावाचा पक्ष उचलिला, दोघांनीही इंग्लिशांच्या विरुद्ध लढाई करण्यासाठी तयारी केली, दोघांचाही हेतू मराठ्यांचे राज्य चिरायु व्हावे व वृद्धिंगत व्हावे असा होता, दोघेही मराठी राज्याच्या अवसानासमयीचे आधारस्तंभ होते आणि दोघांसही अंथरुणावर शांतपणे मरण आले. येथे उभयतांमधील सादृश्य आटपले. उभयतांमध्ये विशेषात्मक गुण अनेक होते. नाना लेखणीचा धड आणि डोक्याचा खंबीर; महादजी मनगटाचा बळकट आणि छातीचा निधडा; नाना पेशव्यांची सत्ता कायम ठेवण्याविषयी झटणारा आणि महादजी स्वतःचे राज्य स्थापन करण्याविषयी प्रयत्न करणारा; इंग्रजांविषयी नानाच्या मनात सन्मानपूर्वक द्वेष आणि त्यांचा पेशवाईत शिरकाव होऊ न देण्याविषयी पूर्ण आग्रह; इंग्लिशांविषयी महादजीच्या मनात पूर्ण प्रेम आणि त्यांचा प्रवेश झाला तरी हरकत नाही, पण आपल्यास स्वातंत्र्य मिळावे याविषयी त्याचा कटाक्ष! महादजीवर विश्वास ठेवण्याविषयी नानांची पूर्ण तयारी आणि नानाविषयी अनेक कुतर्क उत्पन्न करण्याविषयी महादजीची आतुरता इत्यादी समान व

विरोधात्मक गुण उभयतांमध्ये असल्यामुळे, या दोघाचेही चरित्र मनोरंजक झाले आहे.' नाना – महादजी या दोघांबद्दलचे सरदेसाई— भानू या विद्वानांनी व्यक्त केलेले अभिप्राय असे आहेत. या मुत्सद्यांविषयीची आणखी काही मतेही पुढे द्यावी लागतील. तूर्त दोघांच्या मतांच निर्देश केला आहे.

वडगावच्या तहाचे शल्य इंग्रजांच्या मनात डाचत होते. तेव्हाच गव्हर्नर जनरल हेस्टिंग्जने वडगावचा तह पाळीत नसल्याचे पुणे दरबारास कळविले. राघोबा शिंद्याच्या कैदेतून निसटला असल्याने पुणे दरबाराला महादजीविषयी विश्वास वाटत नव्हता. तेव्हा इंग्रजांशी पुन्हा युद्ध कुणाच्या मदतीने करायचे असा प्रश्न नानापुढे होता. इंग्रजांचा सेनापती गोडार्ड याने अहमदाबाद घेतले अन् तो माळव्यात घुसण्याच्या तयारीस लागला. पुढे इंग्रजांनी कोकणात अन् माळव्यात अशी दुहेरी चढाई सुरू केली. ग्वाल्हेर अखेरीस इंग्रजांनी सर केले. (४ ऑगस्ट १७८०) पुन्हा सिप्री येथे जोराची लढाई होऊन महादजीने इंग्रज सेनापती म्यूर याचा पूर्ण पराभव (१ जुलै १७८१) केला. म्यूरला अर्थातच तह करावा लागला. इकडे कोकणातही इंग्रजांची चांगली फजिती उडाली; कारण परशुरामभाऊ पटवर्धनांनी मोठ्या शर्थीने इंग्रज सेनापती गोडार्ड याचा पराभव केला. अशा रीतीने दोन्ही आघाड्यांवर पराभवाचे चटके सोसावे लागल्याने इंग्रजांना अखेरीस मराठ्यांशी तह करणे भाग पडले. हा तह ग्वाल्हेरपासून वीस मैलांवर असलेल्या सालबाई गांवी १७ मे १७८२ रोजी झाला. तहावर मुख्य सही महादजीचीच होती अन् त्यायोगे इंग्रजांना स्वस्थ बसविण्याचे श्रेय खास त्याचेच म्हणून सांगता येईल. याविषयी इंग्रजांनी महादजीच्या दरबारी नेमलेला रेसिडेन्ट डेव्हीड अंडरसन हेस्टिंगला लिहितो, 'तह ठरत असता कैक वेळा नाना प्रकारचे संशय निघाले. एकमेकांशी तर्ककुतर्क उत्पन्न झाले, भलभलत्याच

मागण्या उभय पक्षी पुढे आल्या, एका मुद्याचा निकाल होतो न होतो तो दुसरा बिकट मुद्दा उपस्थित होई. परंतु या सर्व प्रकरणात शांत व न्यायी वृत्ती कायम ठेवून महादजीने जी कामगिरी केली, तिच्याबद्दल माझे मनात अत्यंत मोठा आदरभाव राहतो. पुण्याच्या शंकाकुशंकांचा निकाल महादजी होता म्हणूनच लागला....माझ्या बोलण्यावर त्याचा पूर्ण विश्वास होता. अशा थोर पुरुषाचा स्नेह आपण कधी मोडू नये... आमच्याशी स्नेहभाव कायम ठेवण्याचीच त्याची इच्छा आहे. युद्धात बाजू अंगावर आली तर त्याचा हुरूप व शांती कधी भंग पावत नाही. तसेच जय मिळाले असता तो हर्षाने फुगून जात नाही.' तेव्हाचा गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग म्हणतो,

'महादजी कपटी पाताळयंत्री आहे. तो इंग्रजांचा व अर्काटकर नबाबाचा अत्यंत द्वेष करतो. असे पुष्कळ लोक मला सांगतात, पण मला हे बिलकूल खरे वाटत नाही. माझा त्याचा इतक्या वर्षांचा संबंध आहे. त्यात लबाडीचे असे एकही उदाहरण त्याचे मला दाखविता येणार नाही...महादजी करतो ते यथायोग्य असेच मला वाटते.' हे अभिप्राय इंग्रजाकडील झाले. आता सालबाईच्या तहाबद्दल महादजीचे अंतरंगही पहाण्यासारखे आहे. तो म्हणतो, 'इंग्रजांचा तह आमचे विद्यमानाचा म्हणून शेवटास जावा असे कोणाचेही मानस नव्हते. म्हणोन हिसके किती बसले !... आम्हांस तोंडघशी द्यावे हा इरादा धाकट्या मोठ्या सर्वांचा....निष्कपट एकनिष्ठेने वर्तलो असल्यास ईश्वर आम्हांस पार पाडील .. हे एक शेवटास जावे म्हणजे सुटलो. पुढे कोणत्याही कर्मांत पुन्हा पडावयाचे नाही. श्रम सायास जीवाभ्य करावे, कर्जभरी व्हावे, त्याचे फळ शाबासी मिळावी, ते उफराटे उपमर्दाची चाल करू लागल्यास परिणाम कसा लागतो ! यास्तव कशातच पडू नये ते बरे.'

सालबाईच्या तहाचे वेळी नाना महादजी एकत्र नव्हते. किंबहुना

पानिपतानंतर नाना फिरून काही उत्तरेत गेलेले दिसत नाहीत. पुढे तहाबद्दल नानांनी महादजीस ठपका देण्यास सोडले नाही तरी त्यापूर्वीचा उभयतांचा पत्रव्यवहार पहाण्यासारखा आहे. नानाचा माणूस सदाशिव दिनकर हा महादजीजवळ होता. त्याला नाना लिहितो— ‘ तुम्ही पाटीलबावास एकांती बोलावे की इंग्रजांचा तह आपले होते हातो ही गोष्ट लहान नाही. यात कस्त करून सरकारची कलमे जितकी अधिक साधतील तितकी साधावी. हा लौकिक मोठा आहे. पाटीलबावा दुरंदेशीही आहेत. याउपर त्यांचे थोरपणास व श्रीमंताचे दौलतीस उचित तेच करतील. ’ त्यावर त्राग्याने महादजी लिहितो– ‘ पुणेकर व होळकर निसूर (झोपत) बसून आम्हावर दगड टाकितात. आम्ही गुदस्तपासून इंग्रजांच्या मसलतीची मेहेनत कशी केली हे मनात आणावे. सारे तमाशा मात्र पहातात. ’ यावर नानाने महादजीला खुबीदारपणे लिहिले– ‘ तमाशा पहावा हे इच्छा येथील नाही. मोठमोठी कामे बावांनी करावी, सरकारचे मातबर उपयोग तेच पडत असावे, सरकारच्या मातबर मसलती होऊन पाटीलबावांस यश असावे, भाऊपणात अंतर पडू नये, हाच आम्हास मोठा संतोष आहे. ’

जवळ जवळ १७८० पासून महादजीचे वास्तव्य उत्तरेतच असल्याचे दिसते. त्याने पुढाकार घेऊन दिल्लीच्या तख्तावर बसविलेला शहाआलाम बादशहा अगदीच नालायक होता. १७८४ च्या १४ नोव्हेंबरात महादजीने त्याची भेट घेतली. ही भेट फत्तेपूर शिक्री जवळच्या छावणीत झाली. महादजीने बादशहापुढे आपले शिर झुकविले अन् १०१ सोन्याच्या मोहोरांचा नजराणा त्याला दिला. त्याच वेळी बादशहाने महादजीस सर्वाधिकार दिले. ‘ वकील-इ-मुत्लक ’ म्हणजे बादशहाचा प्रतिनिधी असा किताब व ‘ मीरबक्षी ’ हा हुद्दाही बादशहाने त्यास दिला. ही बातमी नानास समजल्यावर त्याने शिंद्यांचे दिवाण

अप्पाजीराव दाभोळकर यांस लिहिले— ' बक्षिगिरी व नायबी मुनायबी ही पदे श्रीमंताचे नावे करार करून घेतली. त्यापेक्षा वकील मुत्लकीचे पद थोर तेव्हा श्रीमंतांपेक्षा आधिक पद आपले नावे करार करून कसे घेतले ?........ धन्याचे पदापेक्षा सेवक लोकांनी अधिकपद घ्यावे की काय ? ' पुढे ' वकील –इ– मुत्लक ' पदवी महादजीने बादशहाकडून पेशव्यांच्या नावे करून घेतली तरी नानात अन् त्याच्यात विकल्प राहिला तो काही गेला नाही. बादशहाने महादजीस त्या वेळी वस्त्रे घोडे, हत्ती, नगाऱ्याची एक जोडी वगैरे गोष्टी रीतीस धरून दिल्या. पुढे पेशव्यांच्या वतीने तो दिल्लीचा कारभार पाहू लागला. रजपूत राजे, जाट, रोहिले व पठाण सरदार बादशहाला पूर्वापार ठरलेली खंडणी देण्यास खळखळ करू लागले तेव्हा महादजीला त्यांना वठणीवर आणणे भाग पडले. जयपूरकरांशी लढाई झाली लालसोट येथे. त्या वेळी महादजीच्या सैन्यात डी बॉईनच्या आधिपत्याखालच्या फ्रेंच पलटणी असल्याने अन् रजपुतांना सामील झालेला बादशहाचा सरदार हमदानी हा ठार झाल्याने शिंद्यांचा विजय झाला. ही घटना १७८७ च्या जुलै महिन्यात घडली. या विजयामुळे शिंद्याचे प्रस्थ वाढेल असे लक्षात येताच मराठ्यांच्या सैन्यातली बादशाही फौज त्याच्यावर तुटून पडली. पानिपत-सारखाच प्रसंग उद्भवला पण महादजीने अक्कल हुशारीने माघार घेतल्याने अरिष्ट टळले. याविषयी सरदेसायांचा अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे—' महादजीवरील संकटाचा प्रसंग अगदी पानिपतासारखा असूनही पानिपतासारखी स्फूर्ती मात्र राष्ट्रात उत्पन्न झाली नाही. पानिपताचे प्रसंगात महाराष्ट्रातील लहानमोठ्या व्यक्तीने तनमनधनाने आपली कळकळ दाखविली, पण महादजीच्या संकटसमयी एकाही प्रमुख व्यक्तीला तळमळ उत्पन्न झाली नाही. मुख्य चालक नाना फडणीस याने मोठा

उदारपणा करून पाच लाख रुपये पाठविले आणि अलीबहादर व तुकोजी यांस महादजीचे मदतीस रवाना केले. '

लालसोटच्या लढाईपूर्वी दोन वर्षे आधी (दि. २१-१-१७८५) झावेताखान मृत्यू पावला होता. त्याचा मुलगा गुलाम कादर याने दिल्लीत धुमाकूळ तर घातलाच अन् त्याने शहाआलम बादशहाचेही अतोनात हाल केले. लालसोटच्या युद्धात महादजीची माघार पाहून त्याला चेव आला अन् मग त्याने बादशहा अन् त्याच्या बायकामुलांचा अनन्वित छळ केला. बादशहाचे तर त्याने डोळेच फोडले अन् त्याच्या जनानखान्यातल्या स्त्रियाचीही त्याने बेअब्रू केली. अखेरीस महादजीचा सरदार राणेखान याच्या हातात तो सापडल्यावर त्याने त्याला महादजी-कडे पाठविले. महादजीने त्याचा शिरच्छेद (१-३-१७८९) करून पानिपतच्या सूडाचा अखेरचा बदला घेतला... कादरच्या पारिपत्यानंतर महादजीने बादशहाची व्यवस्था पुन्हा एकदा लावून दिली. तेव्हा बादशहाने त्याचा अपूर्व गौरव केला. ही संधी साधून त्याने बादशहाकडून गोवधबंदीचे फर्मान (दि. ४-९-१७८९) मिळविले. त्या फर्मानातला महत्त्वाचा भाग पुढीलप्रमाणे होता.

'गाईवरच मनुष्यांचे व पशूंचे जीवन अवलंबून आहे. यास्तव आमचे प्रिय पुत्र महाराजाधिराज माधवराव शिंधिया बहादर यांनी आमचेकडे विनंती केली. त्यावरून आम्ही आपल्या उदार अंतःकरणाने व हर्षपूर्ण दृष्टीने आमच्या समस्त राज्यभूमीमध्ये गोकुशाचा म्हणजे गोहत्येचा परिपाठ सर्वथैव मना करीत आहो. ह्या आमच्या फर्मानाचा अंमल इतउत्तर राज्यातील समस्त अधिकाऱ्यांनी सावधगिरीने प्रयत्नपूर्वक करून ही आज्ञा पाळीत जावी की जेणेकरून कोणतेही नगर, कसबा, गाव ह्यात गोहत्येचे नावसुद्धा दिसू नये. इतक्याउपर

जर कोणी इसम या आज्ञेच्या विरुद्ध वागून गोवधाच्या पापात लिप्त होईल, तर तो बादशहाच्या कोपास प्राप्त होऊन दंड पावेल.'

पुण्यास आल्यावर हे फर्मान महादजीने दरबारात वाचले. बादशहाच्या संकटसमयी महादजी उपयोगी पडला म्हणून त्याने त्याला 'अलीजा बहादुर' ही पदवी दिली. आपल्या गुलाम कादरने केलेल्या अत्याचाराच्या दुःखावर कविता लिहिल्याखेरीज या बादशहाला रहावले नाही. त्याच्या कवितेचे इंग्रजी भाषांतर कीनकृत महादजी चरित्रात पहावयास मिळते. त्या कवितेतील दोन ओळी पुढीलप्रमाणे आहेत–

And Madhoji Sindhia—who is even as a son unto mo
He also will surely avenge my cause.

एक औरंगजेब वगळता सर्व मोगल बादशहा हिंदूंच्या धर्मभावनांची जपवणूक करणारे होते. तेव्हा गोवधबंदीचे फर्मान बादशहाकडून मिळवून महादजीने फार मोठी कामगीरी बजावली यात शंका नाही. एक तप उत्तर हिंदुस्थानात घालविल्यानंतर १७९२ साली तो पुण्यास आला. दिल्लीत पेशव्यासाठी बादशहाकडून मिळालेले किताब त्याला पेशव्यांना अर्पण करावयाचे होते. दि.१२ जून १७९२ त तो पुण्यास आला. नंतर २३ जून रोजी गारपीरावर डेरे झाले. मसनद तयार करण्यात येऊन तिथे बादशहाने दिलेली वस्त्रे, पोषाख, जडजवाहीर इत्यादी वस्तू ठेवण्यात आल्या. संध्याकाळी पेशवे सवाई माधवराव आपल्या सरदारांसह तिथे आले. बहुमानाचा बादशाही पोषाख त्यांना देण्यात आला. पेशव्यांनी आपल्या तर्फे बादशहाकडील मुतालीक म्हणून महादजीला मुतालकीची वस्त्रे दिली. अन् 'राजे महाराज माधवराव शिंदे मदारुल महा' हा किताब पेशव्यांनी त्याला दिला. शिरपेच, कंठी, ढाल-तलवार, घोडा वगैरे वस्तू त्याला भेट देऊन पेशव्यांनी त्याचा यथोचित सत्कार केला. या प्रसंगास फर्मानबावडीचा दरबार म्हणतात. तो पुण्यास आला त्या वेळचे शाहीर

रामचंद्र याने आपल्या खर्ड्याच्या लढाईच्या पोवाड्यात पुढीलप्रमाणे त्याचे वर्णन केले आहे :

हिंदुस्थान गुजरात सोडून शिंदा दख्खनेत आला।
हुकूम केला बादशहाने त्याला ॥

महादजी पुण्यास आला त्या वेळी पुणे दरबाराच्या मनःस्थितीचे वर्णन पत्राने कॉर्नवालीसने (हिंदुस्थानचा पुढे झालेला गव्हर्नरजनरल) दि. १०-१२-१७९२ रोजी विलायतेस पाठविले ते असे—

'पुण्याच्या राजकारणाची प्रस्तुत स्थिती आम्हांस फारशी अनुकूल नाही. ब्राह्मणांच्या कपटास महादजीचे सामर्थ्य व अक्कल पुरी पडली. त्याने तरुण पेशव्यावर आपली छाप पूर्णपणे बसविली आहे.... नुकताच त्याने लाखेरीवर होळकराचा पाडाव केला असल्यामुळे नानाची हिंमत खचली.'

एकंदरीत महादजीचे पुण्यातील वास्तव्य नानाच्या पक्षातील मंडळींना आवडले नाहीसे दिसते. आता दोघांच्यातील वाद कुठे होता त्याची चर्चा आवश्यक आहे. हा वाद सरदेसायांनी पुढीलप्रमाणे सांगितला आहे – 'नाना-महादजीचा लढा जितका राष्ट्रप्रेमाचा तितकाच तत्त्वाचाही होता. शाहू व बाळाजी विश्वनाथ यांनी महाराष्ट्राला उत्तराभिमुख बनविले आणि त्याची सांगता शिंदे-होळकरांनी केली. हिंदुस्थानच्या सार्वभौम सत्तेची हाव बाळगणारांनी उत्तरेची किल्ली सांभाळली पाहिजे असे महादजीचे धोरण होते. ही किल्ली पुण्यास नसून दिल्लीस होती. याच कारणासाठी महादजीला उत्तरेला एवढा ओढा वाटे...या वेळच्या घडामोडी नाना फडणिसाने एकदा सुद्धा उत्तरेत जाऊन स्वतः अनुभवून पाहिल्या नाहीत. त्यामुळे मराठी राज्याचे अंती नुकसान झाले.' पेशव्यांचा महादजीवर लोभ जडलेला नानाला पहावत नाही असा अभिप्राय महादजीचे चरित्रकार नातू देतात. खरेशास्त्री नानांचे पक्षपाती

असले तरी नाना-महादजीची त्यांनी केलेली तुलना फार मार्मिक असून ती पुढीलप्रमाणे आहे— ' नाना व शिंदे या दोन राष्ट्रपुरुषांमध्ये एकमेकांविषयी खराखुरा आदरभाव नांदत होता... नानांनी राजकारणाची जी जी धोरणे ठरविली त्यांना शिंद्यांनी मनःपूर्वक पाठिंबा दिला आणि शिंद्यांनी ज्या ज्या मसलती केल्या त्यांना नानांनी प्रामाणिकपणे हातभार लाविला. प्रत्येक महत्त्वाची गोष्ट दोघेही एकमेकांना विचारल्याशिवाय करीत नसत. दोघांमध्ये वारंवार मतभेद उत्पन्न होत – भांडणे होत– दोघेही वर्दळीवर येत... पण इतके होऊनही या यादवीचा शत्रूला मात्र कोणताच फायदा होत नसे.... शिंद्याची हजारो फौज समीप असता नानांस स्वसंरक्षणाची जरूरी बिलकूल भासली नाही. ते एकटे दुकटे निर्भयपणाने कोठेही खुशाल वावरत. पुढे सात वर्षांनी पाटीलबाबांच्या चिरंजीवाशी म्हणजे दौलतराव शिंद्याशी नानांची गाठ पडली, तेव्हा त्यांना स्वसंरक्षणार्थ सहा हजार अरब जवळ बाळगावे लागले आणि इतकेही करून शेवटी त्यांचे धिंडवडे व्हावयाचे ते झालेच ! बंधुत्वाचे भांडण आणि शत्रुत्वाचा द्वेष यामध्ये फरक आहे तो असा !

स्वदेशाभिमान, स्वार्थत्याग आणि मुत्सद्दीपणा या गुणांत दोघेही एकमेकांना हार जाणारे नव्हते. राज्याच्या शत्रूंचे निवारण दोघांनी मिळून एकमताने केले आणि राज्यविस्ताराच्या सर्व मसलती दोघांनी मिळून एकमताने पार पाडल्या. धन्याशी बेइमानी करण्याचा विचार दोघांच्याही मनाला शिवलासुद्धा नाही. शांततेच्या काळी दोघेही सडकून भांडत आणि एकमेकांच्या नुकसानीला प्रवृत्त होत, परंतु शत्रूशी गाठ घालण्याचा प्रसंग पडला तर मात्र दोघेही पूर्वीचे द्वेष विसरून तत्काळ एक होत ! अशी या जोडीची विचित्र तऱ्हा होती. '

महादजीने आपल्या सैन्याची व्यवस्था पाश्चात्य लष्कराप्रमाणे ठेवून डी बॉइन या फ्रेंच इसमाच्या हाताखाली त्याने कवाइती फौज तयार करून

तिचा दरारा त्यांनी सर्वत्र बसविला. डी बॉइनच्या फौजेत मराठ्यांच्या भगव्या झेंड्याऐवजी फ्रेंचांचा शुभ्र क्रूस डौलाने मिरवत असल्याबद्दल सरदेसायांनी महादजीला ठपका दिला आहे, तरी पाश्चिमात्यांच्या सुव्यवस्थित लष्करी फौजेचे महत्त्व महादजीस उमगले होते ही गोष्ट नाकारता येणार नाही. निरनिराळ्या मोहिमेत गुंतलेली त्याची फौज १ लक्ष ५७ हजार एवढी होती. त्याच्या कवायती फौजेत दोनशे युरोपियन अंमलदार होते. त्याचा सगळा वसूल ३-४ कोटींच्या आसपास होता. असा हा थोर महादजी पुण्यास आल्यावर परत काही उत्तरेत गेला नाही.

शिंद्यांची राजधानी उज्जयनीस असून ग्वाल्हेर येथे लष्कर असे. महादजी सकाळीच उठे. नंतर देवपूजा, पुराण, गंध लावणे वगैरे कृत्यात त्याचा वेळ जाई. नंतर भोजन उरकून तो थोडी झोप घेई. नंतर दरबारास जाई. तिथे विनोदी गप्पाटप्पादि चालत. संध्याकाळी भोजन उरकून तो बायका मंडळींच्या सहवासात रमे. वर्णाने तो काळा सावळा होता. उंचीने मध्यम असून उतारवयात तो स्थूल झाला होता. प्रवृत्तीने तो भाविक असून त्याच्या हातात स्मरणी असे अन् कपाळावर गंध लावण्यास तो विसरत नसे. पीर, साधु-संत यांचा तो परामर्श घेई. उताराला लागल्यावर त्याचा बराच वेळ भजन-पूजेत जाई. कविता करण्याचा नाद त्याला होता असे दिसते. ' माधवविलास ' या नावाने ग्वाल्हेरच्या भास्कर रामचंद्र भालेराव यांनी त्याच्या कविता छापल्या (इ. स. १९२१) आहेत. हिंदी मराठी आणि गुजराथी कविताही त्यात आढळतात. त्याचा एक अभंग पुढीलप्रमाणे आहे :

देवा मी नामाचा भाट । वर्णी नामे वरिष्ठ
गाईन बिरुदावली स्पष्ट । करीन वंशावली प्रकट

भगवत् भक्तीची ही वाट
जेणे ' माधव ' हा विकट ॥

लेखनात अन् हिशेबात महादजी पक्का होता. उर्दू व पर्शियन भाषा त्याला कामापुरत्या समजत. संस्कृत त्याला समजे. एकंदरीत तो बहुश्रुत होता. त्याच्या स्वभावाच्या नाना तऱ्हा होत्या. त्याच्या मनाचा थांग सहसा लागत नसे. लोकसंग्रह करण्यात मात्र तो बराच हुशार दिसतो. तो म्हणे—

' आम्ही जे करतो, ते श्रीमंतांनिमित्त करतो.... द्रव्यसंचयाचा हव्यास कोणानिमित्त करावा ? पोटीपाठीही कोणी नाही. जे करणे ती श्रीमंताची सेवा करावी या बुद्धीनेच करतो. श्रीमंतांचे भोक्तृत्व तितके आमचे उर्वरित.... सर्वांनी स्वामीसेवेचे पोटी आपले कल्याण समजून श्रम करावे. आपआपले दोष उघड झाले ते झाकून तमाशबीन होऊ लागतील. तर फलही पुढे पावतील. आम्ही निष्कपट व निष्ठा राखीत असलो तर धन्याचा प्रताप यश देईल. '

महादजीला अन्नपूर्णा, भवानीबाई, पार्वतीबाई, गंगाबाई, राधाबाई, लक्ष्मीबाई, भगीरथीबाई, अन् यमुनाबाई अशा नऊ स्त्रिया होत्या. मुलगा व्हावा या हेतूनेच त्याने नाना फडणवीसाप्रमाणे एवढी लग्ने केली असे दिसते. त्याची बरीच मुले गेली. मुलगे झाले तेही गेले. त्याची एकच मुलगी बाळाबाई तेवढी जिवंत राहिली. अखेरीस त्याचा वंश दत्तक-पुत्रानेच (दौलतराव) चालविला.


अखेरीस १७९२ च्या सुरुवातीस महादजी तापाने आजारी झाला. सवाई माधवराव त्याच्या समाचारास गेले तसे नाना फडवणीसही गेले होते. अखेरीस तापाला उतार न पडून बुधवारी रात्री ८ चे सुमारास दि. १२ फेब्रुवारी १७९२ रोजी वानवडी येथील लष्कारी छावणीतच हा थोर पुरुष महादजी शिंदे निधन पावला. ' दी नेटीव्ह स्टेटस ऑफ इंडिया' च्या

१० मे १७९४ च्या अंकात त्याच्या मृत्यूविषयी कर्नल स्यालेसन याने लिहिले– 'महादजी शिंद्यांच्या मृत्यूने मराठेशाहीतील थोर मुत्सद्दी अन् पराक्रमी पुरुष नाहीसा झाला.' त्याच्या मृत्यूनंतर सुमारे १०० वर्षांनी (१८९१) एच्. जी. कीन याने हंटर मालेत त्याचे चरित्र लिहिले. त्यांत तो महादजीबद्दल म्हणतो—

लंगडेपणाने व्यायाम कमी होऊन उत्तरोत्तर महादजीचे शरीर फार स्थूल होऊन त्याची पहिली ठेवण बिघडली....नजीबउदौला, गाजीउद्दीन, गुलाम कादर, यांच्यासारख्या व्यक्तींचे उपद्व्याप मनात आणले म्हणजे महादजीने हिंदी राजकारणात पंचवीस वर्षे जो राष्ट्रोपयोगी उद्योग केला तो अत्यंत बहुमोलाचा मानावा लागेल. क्रौर्य, कपट, दुष्टावे व स्वार्थ याचे साम्राज्य चहूंकडे बोकाळले असता त्याने आपल्या शहापणाने त्यांचा नायनाट करून शांतता प्रस्थापित केली हे त्याचे महत्कृत्य होय.

अलिजाबहादर महाराज माधवराव ऊर्फ महादजी शिंदे असा होता. त्याचे स्मरण झाले की, शाहीर प्रभाकराच्या खर्ड्याच्या लढाईवरील पोवाड्यातील पुढील ओळी सहज तोंडावाटे निघून जातात :

'मुगुटमणि ते पाटिलबावा
कोठवर त्यांचा प्रताप गावा
दर्शनमात्रे तापच जावा
नवस निवसिता फळास यावा
इमानी चाकर नाहीत असले
धन्य धनी आणि धन्य दास ते ॥'



५. नाना फडणवीस

पेशवाईतील प्रख्यात व धुरंधर मुत्सद्दी नाना फडणवीस ह्यांचे नाव मराठेशाहीच्या इतिहासात अजरामर झालेले आहे. पानिपतच्या घनघोर संग्रामाची चक्षुर्वैसत्यं हकिगत पाहण्याची संधी त्यांना पोरवयातच लाभल्यामुळे लहानपणीच त्यांना पोक्तपणा आला. सोळा वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच फडणविशीची वस्त्रे त्यांना मिळाली होती, ही गोष्ट लक्षात घेतली की त्यांच्या बृहस्पतितुल्य बुद्धीचा अदमास लागतो आणि मन आश्चर्याने थक्क होते.

तो काळ वास्तविक तलवारबहाद्दरांचा आणि सेनानायकांचा. पाठीवर ढाल, मांडीखाली भिमथडी तट्टू आणि हातात विजलीसारखी लखलखती समशेर घेऊन समरांगणावर शौर्य गाजविणाऱ्या शूरांचे ते दिवस! नानांच्या अंगी हे कसब मुळातच नव्हते. त्यांनी कधी घोडा फेकल्याचे अगर तलवार मारल्याचे ऐकवात नाही. परंतु अलोट बुद्धिमत्ता हेच त्यांचे मुख्य भांडवल असल्याने त्याच्या जोरांवर त्यांनी सखारामबापूंसारख्या कारस्थानी मुत्सद्दयांना व महादजी शिंदे व परशुरामभाऊ पटवर्धनादि शूर सरदारांना आपल्या जरबेत ठेवले.

नानांची शरीरप्रकृती यथातथाच होती. स्वारीशिकारीचा सोस त्यांना

पेलण्यासारखा नव्हता. अर्थातच त्या काळच्या युद्धखोर सरदारांनी त्यांच्या राजकीय जीवनाचा मृत्यू केव्हाच घडवून आणला असता. तलवार खेळण्याची कला आणि युद्धाचे डाव टाकण्याचे सामर्थ्य त्यांच्या मनगटात नसल्याने त्यांची जिंदगी खवीस व हावभरू सरदरांनी केव्हाच खलास करून टाकली असती. परंतु तसे घडले नाही. ते सर्वांना पुरून उरले. केवळ बुद्धिसामर्थ्याच्या जोरावर त्यांनी तब्बल पंचवीस-तीस वर्षे सत्तापिपासू सरदारांबरोबर रोमहर्षक झुंज दिली. काळाच्या ओघात इतर समशेरबहाद्दरांची नावे नामशेष झाली, परंतु लेखणीबहाद्दर नानांचे नाव भारतीय इतिहासात अमर झाले आहे. त्यांच्या निधनानंतर कापूर जळावा तेवढ्या निमिषार्धात मराठी साम्राज्याचा ऱ्हास झाला. ते दिवंगत झाले तेव्हा कर्नल पामर या इंग्लिश गृहस्थाने त्यांना वाहिलेली श्रद्धांजली वाचली की त्यांच्या कर्तृत्वाची नि मोठेपणाची महती पटते. कर्नल पामर म्हणतो, ' नाना सर्वांचे छत्र. मराठी राज्याचे शहाणपण, समतोलपणा, नानाबरोबर लयास गेला. सावध पुरुष, मोहरा होता, श्रीमंताचे दौलतीचा आळा गेला. विशाल बुद्धीचा, दीर्घ प्रयत्नी मुत्सद्दी. राज्याची धडगत नाही. दोन वर्षे असते तर इंग्रज नाशच पावते. नाना म्हणजे ब्राह्मण्य. सर्वांच्या उमेदी उदासीन झाल्या. पुण्याची सामोग्री संपली. नानाबरोबर चातुर्य व संयम गेला.'

पेशवाईच्या अखेरच्या आणि पडत्या काळात मराठी साम्राज्याची दौलत सावरून धरण्यासाठी नानांनी जे अपार कष्ट केले त्याला इतिहासात तोड नाही. उतारवयात पोटशूळाची व्यथा जडली तरी त्यांनी प्रकृतीची मुळीच परवा केली नाही. उलटपक्षी राज्यातले बखेडे मोडण्यासाठी, उन्मत्त शत्रूचे पारिपत्य करण्यासाठी व मराठी राज्याच्या रक्षणासाठी त्यांनी पदरचा पैका किती ओतला त्याला गणतीच नाही. घरभेद्यांचा सुळसुळाट झालेला, स्वतःची तुंबडी भरण्यासाठी टपलेले

आप्तस्वकीय, सत्तेचे घबाड मिळविण्यासाठी सरदारात लागलेली अहमहमिका, इंग्रजांसारखा तालेवार आणि प्रबळ शत्रू देशात ठाण मांडून बसलेला, पेशवे-कुटुंबातला गृहकलह आणि स्वतःला असलेला लष्करी ज्ञानाचा अभाव इत्यादी संकटपरंपरेने नानांना वेढा दिला असूनही ते मुळीच डगमगले नाहीत.

मराठी साम्राज्याची बुडती नाव पैलतीराला कशी न्यावी ही एकच विवंचना नानांना लागलेली होती. त्यांचा उरक दांडगा होता. चार घटका झोप घेऊन ते उरला वेळ राज्यकारभारात खर्च करीत. ते स्वतः मोठे मसलतबाज मुत्सद्दी होते. हेरांकरवी व दूतांड्कन शत्रूच्या मसलती व कारस्थानांची बित्तम बातमी मिळवून प्रतिपक्षीयांच्या कारवायांचा मोड करण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यांनी आपले हेरखाते फारच जागरूक ठेवले होते व त्याच्या मार्फत शत्रूच्या डावावर त्यांची चाणक्यासारखी नजर सारखी भिरभिरत असे. त्यांच्या मनाचा थांग लागणे कठीण असे. त्यांचा स्वभाव कसा धूर्त होता त्याचे वर्णन परशुरामभाऊ पटवर्धनांच्या कारकुनाने केले आहे तो लिहितो, ‘ मुख्य गोष्ट श्री. राजश्री नानांचे बोलणे कोणतेसमयी कसे होईल याचा भरवसा धरावयाचा नाही. सारा दिवस बोलत असता दस्तऐवज बोलण्यात कधी सापडायचा नाही. या चाली बोलायच्या आहेत ! काम लागले असता साखरेसारखे गोड बोलावयास उशीर नाही, काम जहाले पेक्षा तर त्या गावचेदेखील नव्हत ! येथील विचार असा आहे. ’ कारकुनाने केलेले नानांचे हे वर्णन मुत्सद्याला शोभून दिसणारे आहे. यात संशय नाही. ते असे अद्वितीय मुत्सद्दी होते म्हणूनच शाहीराने डफावर थाप मारून पोवाडा चढ्या सुरात म्हटला आहे की,

“ खूप शर्थीने राज्य राखिले
यशवन्त फडणीस नाना ॥ ”

समकालीन मुत्सद्दयांत नाना बुद्धीने अग्रेसर होते. अक्कलहुशारीबरोबरच लढाया मारण्याचे हुन्नर त्यांच्या बाहूत असते तर मराठेशाहीचा इतिहास वेगळाच झाला असता. स्वहितापेक्षा त्यांनी राष्ट्रहित महत्त्वाचे मानले, देशाभिमान त्यांच्या ठायी भरपूर होता. राज्याची वृद्धी कशी होईल ह्याचे सम्यक् ज्ञान त्यांना पुरेपूर होते. त्यांच्यासारखी बुद्धिमत्ता तर दसलाखातही सापडायची नाही. शिवाय योजकता, निराश व हताश न होता अविश्रांतपणे श्रम करण्याची तडफ व उमेद, माणसांची पारख करण्याची जबरदस्त हातोटी, वेळ पडेल तेव्हा आर्जवे व विनवण्या करून तर कधी कणखरपणे हुकूम सोडून कार्याची तड लावण्याचे त्यांचे चातुर्य, वगैरे गुणांचे वैपुल्य त्यांच्या अंगी फार मोठ्या प्रमाणात एकवटले असल्याने मराठी मनसबीच्या तमाम मुत्सद्दयांच्या यादीवर नजर टाकली तर पहिला मानाचा मुजरा, रामशास्त्री प्रभुण्यांनी ‘ मंत्र्युत्तम ’ हे समर्पक विशेषण बहाल केलेल्या नाना फडणविसांनाच करावा लागेल याबद्दल दुमत होणार नाही.

नानांच्या घराण्याच्या मूळ पुरुषाचे नाव महादजी कृष्ण भानू होय. भानू घराण्याचे मूळ गाव रत्नागिरी जिल्ह्यातील वेळास. त्यांच्या वडिलांचे नाव जनार्दन बल्लाळ फडणवीस. त्यांची आई रखमाबाई ही पानिपतच्या लढाईत कामास आलेल्या शूर सरदार बळवंतराव मेहेंदळे यांची बहीण. भानू कुटुंबाचा पेशव्यांशी घरोबा आणि संबंध बाळाजी विश्वनाथ पेशव्यांचे वेळेपासून होता. नानांचा जन्म सातार्‍याला दि. १२ फेब्रुवारी १७४२ रोजी शुक्रवारी रात्री १०॥ वाजता झाला. त्यांच्या पूर्वजांना पेशवाईत फडणविशी मिळाल्याने त्यांचे भानू नाव मागे पडून फडणवीस हे नाव सर्वत्र रूढ झाले. नानांचे संपूर्ण नाव बाळाजी जनार्दन फडणवीस.

नाना आपल्या आईचे फार लाडके होते व त्यांचेही तिच्यावर अलोट प्रेम होते. स्वभावाने ते लहानपणापासूनच थोडे घुमे व भिडस्त होते.

त्या काळाला अनुसरून बलसंवर्धनाची अगर शरीर गोटीबंद करण्याची आवड त्यांना मुळीच नव्हती. यासंबंधी कै. खरेशास्त्री नानांच्या चरित्रात लिहितात, ' तात्कालीन स्त्रियासुद्धा लढाऊपणात प्रसंगी पुरुषांपेक्षा जास्त पौरुष दाखवीत असत ! अशा त्या काळात नानांनी युद्धविद्या शिकण्यात आणि शरीरसामर्थ्य कमवण्यात जी अनास्था दाखवली ती मात्र त्यांना जन्मभर भोवली. ' बुद्धीचे देणे मात्र त्यांना लहानपणापासूनच लाभलेले होते. त्यांचे पहिले लग्न दहाव्या वर्षी झाले. त्यांच्या पत्नीचे नाव यशोदा. त्यांनी आपल्या कुशाग्र बुद्धीची छाप बालपणीच नानासाहेब पेशवे आणि सदाशिवरावभाऊ यांच्यावर पाडल्याने त्यांचे शिक्षण विश्वासराव नी थोरले माधवराव यांच्यासमवेतच झाले. त्यांचे वडील वारल्यावर नोव्हेंबरात १७५६ साली पेशव्यांनी त्यांना फडणविसीची वस्त्रे बहाल केली. लागलीच पुढील वर्षी ते पेशव्यांबरोबर श्रीरंगपट्टणच्या स्वारीवर गेले होते. पुढे दि. १९ मार्च १७६० रोजी आपली आई नि पत्नी ह्यांना घेऊन पानपताच्या मोहिमेवर निघाले. ते मोठे ईश्वरभक्त असल्याने उत्तर हिंदुस्थानातील क्षेत्रे पाहावी व गंगामाईचेही दर्शन घ्यावे हा प्रधानहेतू बाळगून त्यांनी आपल्या परिवारासह पानपतावर निघण्याचे योजिले होते. पानिपतावर काय हाहाकार उडाला याची हकीगत सर्वश्रुतच आहे. लढाईच्या या धामधुमीत नानांचे मामा बळवंतराव मेहेंदळे मृत्युमुखी पडले व नानांच्या परमप्रिय मातोश्रीही कोठे बेपत्ता झाल्या. पराक्रमी मामा गेले, आई नाहीशी झाली आणि रणांगणातून पाय काढावा लागला त्यामुळे नाना मनातून फारच कष्टी झाले. आईचा पत्ता काढण्यासाठी त्यांनी जंगजंग पछाडले. परंतु तिचा ठावठिकाणा काही अखेरपर्यंत लागला नाही, पैसा वाटेल तेवढा खर्च झाला तरी बेहेत्तर परंतु तिचा शोध लावा, अशा तऱ्हेची पत्रे त्यांनी त्या वेळच्या प्रांत अधिकाऱ्यांना रवाना केली होती. परंतु सर्व प्रयत्न फोल

ठरले आणि अखेरपर्यंत आई कुठे गायब झाली त्याचा पत्ता त्यांना जन्मभर लागला नाही. त्यांचे छोटे आत्मचरित्र उपलब्ध आहे. त्यात त्यांनी आपली आईसंबंधीची मनोव्यथा फारच उत्कटपणे व्यक्त केली आहे ते लिहितात, 'मातोश्रीचा शोध फार फार केला. परंतु घरचा खिजमतकार बरोबर होता त्याने सांगितले, की घोड्यावरून जखम लागून मेली. हेच ठिकाण लागले.... अंतःकरणापासून होते की श्री काशीस जाऊन नेहमी वास करावा. परंतु देहप्रारब्ध बळवंत.' त्यांच्या ह्या उद्गारावरून त्यांची मातृभक्ती दिसून येते.

आईचा वियोग नानांना फारच जाणवला. लहान वयांतच त्यांच्यावर दुःखाचे मोठमोठे घाव पडल्यामुळे त्यांना अकाली प्रौढत्व प्राप्त झाले आणि तेथेच त्यांचे बालपण संपले. थोरल्या माधवरावांच्या कारकीर्दीपासून त्यांच्या कर्तृत्वास सुरुवात झाली. माधवराव त्यांना फार मानीत असत. काही काळ राघोबादादांनी कारभार हाती घेतला तेव्हा त्याने नानांना कामावरून दूर केले होते. माधवरावांच्या हातात पुन्हा राज्यकारभाराची सूत्रे आल्यावर त्यांनी नानांची फडणविशीपदावर दसऱ्याचे मुहूर्तावर पुनश्च नियुक्ती केली ही हकिगत १७६२ मधली आहे.

नानांसारखा चतुर व चाणाक्ष साहाय्यकर्ता लाभल्याने माधवरावांनी आपली घडी चांगली बसविली. माधवरावांचा त्यांच्या पूर्ण विश्वास असे. माधवराव स्वाऱ्यांवर जात तेव्हा मोहिमेस लागणारी संपत्ती नाना राज्यांतून चोखपणे वसूल करून पेशव्यांना धाडीत असल्याने, बाहेरची माणसेच नव्हेत तर पेशव्यांच्या कुटुंबांतली माणसे त्यांना फार चाहात आणि त्यांना त्यांचा वचकही असे. त्यांच्या शब्दाबाहेर जाण्याची कुणाची प्राज्ञा नसे. ह्यासंबंधी एक मनोरंजक आख्यायिका प्रसिद्ध आहे. माधवराव पेशवे स्वारीवर गेले असताना त्यांच्या पत्नी रमाबाई यांचा कारकून खर्चाची यादी घेऊन नानांकडे आला. त्यांनी यादीवर एकवार नजर टाकली व

त्यांतल्या विड्याच्या पानांवरच्या कलमावर आक्षेप घेऊन पानांना त्यांनी मंजुरी दिली नाही. अर्थातच कारकून चुळबूळ करू लागला. तेव्हा नाना म्हणाले, " श्रीमंत स्वारीवर आहेत तोपर्यंत बाईसाहेबांना विड्याच्या पानाचे प्रयोजन असण्याचे कारण नाही. " ही घटना १७६४ मधली आहे. पुढे रमाबाईंनी ह्या प्रसंगाचा माधवरावांजवळ बोभाटा केला. परंतु माधवरावांनीही नानांचीच बाजू उचलून धरली. त्या प्रसंगावरून एकच गोष्ट मनात ठसते ती ही की नानांच्या शब्दाचा दरारा पेशवे कुटुंबातही होता.

थोरले माधवराव १७७२ साली निवर्तल्यावर पुढे सुमारे पंचवीस वर्षे नानांनी आपली सर्व हयात मराठी राज्यरक्षणासाठी खर्च केली. नारायणरावांच्या मृत्यूनंतर बारभाईचे कारस्थान रचण्यापासून दुसऱ्या बाजीरावाला आपल्या नाकदुऱ्या काढावयास लावण्यापर्यंतची सर्व कारस्थाने आणि हिकमती त्यांना लढवाव्या लागल्या. ज्या रावबाजीने त्यांचे हाल करून शिंद्यांकरवी त्यांना कारागृहात घालण्याची मसलत केली. त्याच रावबाजीला पुढे दाती तृण धरून त्यांना शरण जावे लागले. नानांचे शहाणपण ते हेच होय.

माधवराव अल्पायुषी झाले. नारायणरावांचा खून झाला. सवाई माधवरावांचा मृत्यूही नानांच्या डोळ्यादेखत अकाली घडला. अर्थात त्यामुळे ते एकाकी पडले. पुढे त्यांच्या कर्तृत्वाची किंमत रावबाजी व त्याचे पक्षपाती सरदार यांना न समजल्याने त्यांच्या मुत्सद्दीपणाची त्यांना मातब्बरी वाटेनाशी झाली. आणि अर्थातच १७९५ साली सवाई माधवराव कालवश झाल्यावर नानांचे राजकारण जवळजवळ संपुष्टात आले. तशात थोर सरदार परशुरामभाऊ पटवर्धन यांना पट्टणकुडीच्या छोट्याशा चकमकीत मृत्यू आल्याने त्यांची कंबरच खचली. सवाई माधवराव गेल्यानंतर त्यांच्या संकटपरंपरेला ऊतच आला होता. आपल्या अमदानीत त्यांनी संकटांना कधी जुमानले नाही व बिकट परिस्थितीपुढे

कधीही पड खाल्ली नाही. राघोबाचा घरभेदेपणा, सखारामबापूंची छद्मी व कुटिल नीती; टिपू, निजाम आणि टोपीवाले इंग्रज ह्या शत्रूंची टोळधाड; रावबाजीचे चाळे वगैरे अनेक संकटांना त्यांनी कधी भीक घातली नाही. शेवटी रावबाजीच्या नादानपणामुळे त्यांचा नाइलाज झाला आणि मग त्यांच्या जीवनाची ज्योत मंद होऊ लागली. ढाल-तरवारीच्या त्या युगात केवळ हुषारीच्या, शहाणपणाच्या सामर्थ्यावर त्यांनी राज्यकारभाराची घडी फारच चांगली बसविली आणि म्हणूनच त्यांना 'लोकोत्तर मुत्सद्दी' म्हणण्याचा प्रघात आहे.

नानांच्या कार्याचा व कामगिरीचा आढावा घेतल्यावर नाना ही व्यक्ती कशी होती, त्यांचे गृहजीवन, त्यांच्या संबंधीच्या आख्यायिका अन् त्यांचे टीकाकार वगैरे संबंधी लिहिणे प्राप्तच आहे.

नानांची अंगकाठी सडपातळ होती. वर्णाने ते सावळेच होते, आणि बघणाऱ्यांना त्यांची चेहरेपट्टी नेहमी गंभीर वाटे. प्रकृतीने ते यथातथाच होते. मात्र त्यांचे खाणेपिणे, झोप आणि इतर सर्व व्यवहार आखबंद असल्याने कमजोर शरीरसंपदा असूनही त्यांनी अचाट कर्तृत्व केले. तिखटाचा त्यांना भारी तिटकारा. ही गोष्ट माहीत असल्यामुळे एका सरदाराने त्यांना जेवणाचे निमंत्रण देऊन जेवणात आमटी इतकी तिखट केली की त्यांच्या डोळ्यांतून पाणीच निघाले ! ते तंबाखूचे सेवन करीत अन् तपकीर ही ओढीत.

नानांचा पोषाख पांढरा शुभ्र असे व डोक्यावर ते पागोटे घालीत. त्या वेळच्या सर्व प्रतिष्ठित लोकांचा पागोटे वापरण्याचा प्रघात सर्रास होता. पागोटे ज्याचे त्याने बांधावयाचे असे. पण त्यांना स्वहस्ते पागोटे बांधता येत नसे. तेव्हा त्यांची थोडीशी फजिती करण्याच्या हेतूने पटवर्धन सरदारांनी एका मेजवानीचे वेळी त्यांना पागोटे नजर केले. आहेराचे पागोटे तिथल्या तिथे बांधले पाहिजे असा त्या काळचा शिष्टाचार असे

अर्थात त्यांना पागोटे बांधण्याची कला माहीत नसल्याने त्यांना थोडा कमीपणा आला व थट्टेखोरांना त्यांचे वैगुण्य जोरदारपणे सिद्ध करण्याची संधी मिळाली. ते अंगरखा घालीत. पुणे येथील भारत इतिहास संशोधक मंडळात एक अंगरखा असून तो नानांचा आहे असे सांगतात.

नानांचा स्वभाव अती उद्योगी. आळस हा शब्द त्यांच्या कोशात नव्हता. दिलेला शब्द पाळण्याची ते खबरदारी घेत. उगीच अघळ-पघळ बोलण्याची त्यांना सवय नव्हती. परंतु समयसूचकता व शाब्दिक वार समर्पकपणे परतविण्याच्या कलेत ते चांगलेच पारंगत असावेत.

एकदा पर्वतीवर बोथाट्यांचा खेळ चालू असताना नारायणराव पेशव्यांनी बोथाटीने त्यांचे पागोटे खाली पाडले आणि ते फिदी फिदी हसत त्यांना म्हणाले, " नाना तुमचे पागोटे खाली पडले. " नाना लागलीच उत्तरले, " श्रीमंत, मी तर बोलून चालून कारकूनच. तेव्हा माझे पागोटे पडले तर त्यात नवल ते काय? परंतु श्रीमंतांनी आपले पागोटे बरीक सांभाळावे! " नानांनी दक्षतेचा आणि सावधानतेचा इशारा नारायण-रावांना दिला होता. सांगण्याचा मुद्दा इतकाच की योग्य गोष्ट सुनावण्यास कोणाचीही भीडभाड ठेवत नसत.

नानांचा दिनक्रम जवळजवळ वेळापत्रकाप्रमाणे ठरल्यासारखा असे. त्यांची दिनचर्या खरेशास्त्र्यांनी नानांच्या चरित्रात दिली आहे. ते स्वतःचा शब्द खरा करीतच पण पेशव्यांचा शब्दही खरा करीत. एकदा सोंगट्या खेळत असताना सवाई माधवरावांनी दान अनुकूल पडल्यास कुरुंदवाडकर सरदारांना मोत्यांचा तुरा देण्याचे कबूल केले. पुढे कुरुंदवाडकरांना दान फक्कड पडले. परंतु खेळण्याच्या नादात पेशव्यांना आपल्या आश्वासनाचे विस्मरण झाले. पण नाना तिथे उपस्थित होते. ते लागलीच आत गेले व त्यांनी तुरा आणून सवाई माधवरावांकडून कुरुंदवाडकरांना देवविला!

त्यांची टापटीप व व्यवस्थितपणा वाखाणण्यासारखा होता. सवाई माधवरावांच्या विवाहाच्या वेळी भोजनाचा बेत कसा असावा ह्याची नमुनेदार यादी त्यांच्या देखरेखीखाली झाल्याचे प्रसिद्धच आहे. ती यादी पाहिली की, बारीकसारीक बाबतीतही त्यांचे किती लक्ष असते याची कल्पना येते.

नानांजवळ अपार संपत्ती होती. त्यांना ' नवकोट नारायण ' च म्हणत. त्यांच्यापाशी वडिलार्जित धन तर होतेच व शिवाय फडणविशीबद्दल वर्षाचे सुमारे चारपाच लाख रुपये त्यांना मिळत. खेरीज दरबारखर्च, तहाच्या वेळच्या रकमा, नजराणे वगैरे जमेस धरून त्यांचा द्रव्यसंग्रह फुगत गेला. पण त्यांची आवक मोठी असली तरी त्यांच्या खर्चाचा पसाराही आवाढव्य होता. दानधर्मात त्यांनी लाखो रुपये खर्च केले. शिवाय वाडे बांधणे, देवालये उभारणे व इतर किती तरी बांधकामांत त्यांचे बरेच धन कामी आले. युद्धकलेत ते नेहमीच डावे असल्याने त्यांना सरदारांवर अवलंबून रहावे लागे. त्या वेळी त्यांना द्रव्याच्या गाठी सैल सोडाव्या लागल्या त्याला सीमाच नाही. आणि सांगण्यास खेद वाटतो की, मृत्यूसमयी आर्थिकदृष्ट्या ते निष्कांचनच होते. कै. खरेशास्त्र्यांनी लिहिले आहे— ' कोटयावधींची दौलत सांभाळणारे व कोटयावधींची शिल्लक बाळगणारे नाना फडणवीस अखेर दुष्टांच्या पाशांत सापडून कफल्लक स्थितीतच मरण पावले ! '

नानांनी नऊ लग्ने केली परंतु ते निपुत्रिक म्हणूनच वारले. संततीच्या आशेने इतके विवाह त्यांनी केले.

त्यांच्या स्त्रियांची नावे पुढीलप्रमाणे आहेत :

(१) यशोदाबाई. ही पुण्यातील गद्रे यांची मुलगी.

(२) लक्ष्मीबाई. धारप याची ही मुलगी.

(३) अन्नपूर्णाबाई. वाईच्या गाडगीळांची कन्या.

(४) राधाबाई. पुण्यातल्या बिडार नामक गृहस्थांची ही लेक.

(५) आनंदीबाई. वैद्य नावाच्या कारकुनांची ही कन्या.

(६) यशोदाबाई. पेंडसे नामक कारकुनांची ही मुलगी.

(७) अन्नपूर्णाबाई. विजयदुर्गाच्या परांजपे कारकुनांची ही मुलगी.

(८) बगाबाई. रत्नागिरीच्या सुतार नामक कारकुनांची ही लेक.

(९) जिऊबाई. वैशंपायन नामक गृहस्थांची ही मुलगी.

नानांच्या ३ ऱ्या व ६ व्या पत्नीला मुले झाली होती. परंतु ती लहानपणीच निवर्तली. नानांच्या सात स्त्रिया त्यांच्या हयातीत वारल्या. ८ वी स्त्री नाना गेल्यावर पंधरा दिवसांनी वारली. नाना वारले तेव्हा ९ वी स्त्री जिऊबाई नऊ वर्षांची होती. नानांच्या निधनानंतर ५४ वर्षांनंतर ६३ व्या वर्षी जिऊबाई वारली.

नाना वारले तेव्हा ते अठ्ठावन्न एकूणसाठ वर्षांचे होते, तर त्यांची ही भार्या अवघी नऊ वर्षांचीच होती. परंतु त्या काळी मुलीच्या लग्नाची कमाल वयोमर्यादा नऊ असल्याने प्रौढ बिजवराने लग्न केले तरी त्याला बायको नऊ वर्षांचीच मिळणार. वय कमीच असेल परंतु जास्त नसणार. सांगण्याचा हेतु हा वयातल्या विषमतेबद्दल नानांना फारसा दोष देता येत नाही. त्या काळची सामाजिक पद्धतीच तशी होती तिला ते तरी काय करणार? त्यांची एक पत्नी वारल्यावर त्यांच्या एका वडीलधाऱ्या नातलगाने त्यांना लिहिलेले पत्र उपलब्ध असून, त्या काळच्या तेव्हाच्या लोकांच्या मनोरचनेवर त्या पत्राने चांगला प्रकाश पडतो तो नातलग लिहितो, " अप्रिय वर्तमान ऐकिले. तुमचे जन्मास पन्नास वर्षे झाली. पुढे बायको किंवा मुले काहीच थांग नाही. आता दोन लग्ने करावी. " नानांच्या स्त्रिया मृत्युमुखी पडत व त्या वेळच्या लोकांना वंशवृद्धीचे महत्त्व फार असल्याने त्यांच्यासारख्या सुज्ञांनाही अनेक लग्ने करावी लागली. त्यांच्या गृहजीवनाची कहाणी अशी आहे.

आता नानांच्या टीकाकारांसंबंधी थोडे हितगूज करणे इष्टच आहे. ते स्त्रैण होते असा बऱ्याच टीकाकारांचा आरोप आहे. आपल्या तीव्र विषयवासनेबद्दल त्यांनी आपल्या आत्मचरित्रात प्रांजल कबुली दिली असून त्याची कारणमीमांसाही केली आहे. अलीकडच्यादेखील एका थोर दिवंगत पुढाऱ्याने आपल्या आत्मचरित्रात तशाच प्रकारची कबुली दिलेली असल्याने त्यांच्या स्त्रैणपणाबद्दल टीकाकारांनी फारसा बकवा करण्याचे कारण नाही. शरीरसुखाची लालसा ही ज्याच्या त्याच्या पिंडप्रकृतीप्रमाणे अथवा आनुवंशिक असणार. परंतु येथे एक गोष्ट आवर्जून सांगावयास हवी की तरुणपणी नानांना विषयसुखाची चटक असली तरी त्यांनी नाटकशाळा बाळगल्या होत्या अगर कुठल्याही स्त्रीशी कसलेही गर्हणीय वर्तन केले होते असा पुरावा नाही. त्यांना सर्व अनुकूल होते. मनात आणते तर ते काही करू शकले असते. तरी त्यांनी विवेक कधीही सोडला नाही. ग्रँट डफच्या लिहिण्याचा झोक असा होता की, नानांचे आणि गंगाबाईचे (नारायणरावांची स्त्री) रहस्य असावे. परंतु एक कपोलकल्पित कंडी यापेक्षा त्याच्या लिहिण्याला काडीइतकीही किंमत नाही.

आता चालू काळातल्या नानांच्या वादंगासंबंधी थोडा परमार्श घेऊ या. १९४४ साली 'नारायणराव पेशवे यांचा खून की आत्महत्या' हे एखाद्या मालगाडीसारखे नाव देऊन बेळगावच्या कै. पां. गो. रानड्यांनी नानांच्या निंदेचा नारळ ग्रंथरूपाने फोडला. ह्यावर पुण्या-मुंबईला चांगल्या सभा झाल्या व नामवंत वक्त्यांनी रानड्यांची सर्व विधाने आधारपूर्वक ऐतिहासिक पुराव्यानिशी खोडून काढली. प्रा. न. र. फाटक ह्यांनी 'नवकाळ' पत्रात नानांच्या समर्थनार्थ सणसणीत २१ लेख लिहून रानडयांचे खूळ कांडात काढले. रानडयांचा हा ग्रंथ द्विखंडात्मक असून १४०० पानांचा आहे. या ग्रंथात ग्रंथकाराने नानांना पेशवाई-

तील कलिपुरुष व खलपुरुष ठरविण्यासाठी आपली सर्व अक्कल खर्ची घातली. रानड्यांनी नानांना राजद्रोही, मित्रद्रोही, आणि आप्तद्रोही वगैरे विशेषणे बहाल केलेली आहेत. पण पुण्याच्या म. म. दत्तो वामन पोतदारांनी आपल्या व्याख्यानात रानड्यांची पूजा बांधली ती अशी, ' आत्महत्याकार रानडे हे प्रमाणद्रोही, तर्कद्रोही, शास्त्रद्रोही, सुसंगतीद्रोही आचार्यद्रोही, गुरुद्रोही, पूर्वजद्रोही, एतावता नानाद्रोही आहेत.' साहित्य-सम्राट केळकरांसारख्या सात्त्विक प्रवृत्तीच्या गृहस्थांनी वक्तव्य केले ते असे– ' रानडे हा बेछूट बेदरकार व उलटया काळजाचा मनुष्य आहे ' नानांच्या अधुनिक निंदकांच्या ग्रंथांची वस्तुस्थिती अशी आहे.

नानांच्यात दोष नव्हते असे नाही. परंतु त्यांच्या गुणांपुढे दोष काजव्यासारखे होत. १९०५ साली त्यांच्या उत्सवप्रसंगी लो. टिळकांनी काढलेले उद्‌गार चिंतनीय आहेत. टिळक म्हणतात, " नाना स्वार्थ-परायण नव्हते. असे नाही, पण प्रथम मराठी राज्य चिरस्थायी करण्याचा त्यांचा विचार व नंतर स्वार्थपरायणता." टिळकांच्या मनात नानांबद्दल किती पूज्य बुद्धी होती ते त्यांनी नानांच्या शतसांवत्सरिक श्राद्धाच्या निमित्ताने १९०० साली विस्तृत अग्रलेख लिहिला त्यावरून कळून येईल. हा लेखी फारच बहारीचा असून इतिहासाची आवड असणाऱ्यांनी तो मुळात वाचावा. या लेखाचा थोडा भाग टिळकांनी लिहिला व बराचसा भाग सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक कै. द. ब. पारसनीस ह्यांनी लिहिला. त्या लेखात ' केसरी 'करांनी नानांची योग्यता ग्लॅडस्टन, डिझ्रायली, रोजबरी वगैरे पाश्चिमात्य मुत्सद्द्यांच्या तोडीची ठरविली होती.

पेशवाईच्या उत्तरार्धात मुत्सद्दीपणात नानांच्या तोडीचा आणि योग्य-तेचा पुरुष दुसरा नाही. त्यांच्या जोडीला जर एखादा पहिल्या बाजी-रावासारखा तलवारबहाद्दर पेशवा अगर थोरल्या माधवरावांसारखा राज्यनिपुण पेशवा असता तर त्यांच्या श्रमाचे खरे चीज झाले असते.

त्यांचे मोठे व्यंग व वैगुण्य म्हणजे त्यांना लष्करी ज्ञान नव्हते. म्हणूनच त्यांना अर्धा शहाणा म्हणत. त्यांना युद्धनीतीचे बारकावे समजत नसल्याने त्यांना शिरजोर सरदारांचा नाहक आब राखावा लागला. ह्यासंबंधी खरेशास्त्रांचेच भाष्य सांगणे इष्ट. ते लिहितात, " राजकीयदृष्ट्या नानांमध्ये एक मोठेच व्यंग होते. ते व्यंग म्हणजे त्यांच्या अंगी लष्करी कसबाचा पूर्ण अभाव होता हे होय. त्यांच्या या वैगुण्यामुळे त्यांना दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी प्यावे लागे. त्यांनी नेहमी आपल्या कारकीर्दीत शेकडो युद्धप्रसंग करविले, परंतु एखाद्या लढाईत त्यांनी कोणताही प्रमुख भाग घेतला नाही. नानांच्या या वैगुण्याचा दुसरा एक वाईट परिणाम असा होत असे की उंदराची शिकार करावयाची असली तरी सुद्धा त्यांना नेहमी वाघाच्या शिकारीची तयारी जय्यत ठेवावी लागे. पेशव्यांच्या कारकीर्दीत मराठी फौजांचा जो दरारा असे; तो पुढे नानांच्या काराकीर्दीत कधीच दृष्टीस पडला नाही. याचे कारण पेशव्यांप्रमाणे नानांस लष्करी ज्ञान नव्हते व पेशव्यांप्रमाणे ते जातीने लष्करात हजर नसत हे होय! एतावता ही एक बाब सोडल्यास नाना हे अव्वल दर्जाचे राजकारणी पुरुष होऊन गेले यांत संशय नाही. '

नानांचे अपूर्व चरित्र हे असे आहे. त्यांची पितृभूमी रत्नागिरीतले वेळास गाव. जन्मभूमी सातारा. कर्मभूमी पुणे अन् त्यांचे आवडते विश्रांतिस्थान वाईजवळील मेणवली हे गाव. ह्यासंबंधी माहिती दि. २० मार्च १९०० च्या ' केसरी 'त पहावयास मिळते. ती अशी :--

' नाना बहुतकरून सर्व काळ राज्यकारस्थानामध्ये गुंतल्यामुळे त्यांना पुण्यास रहावे लागे. त्यांचा पुण्यातील ' नानावाडा ' प्रसिद्धच आहे. त्यांना क्वचित फुरसद सापडल्यास ते वाईनजीक मेणवली म्हणून एक लहान खेडेगाव आहे तेथे रहात असत. तेथे कृष्णातीरी त्यांचा सुंदर व टुमदार वाडा असून एकसारखा सुंदर घाट बांधला आहे. ह्या घाटासन्निध्य दोन

रमणीय देवालये बांधिली असून त्यांची रचना फार कुशलतेची केली आहे. ह्यांपैकी एका देवालयासमोर एक घंटामंदिर बांधले आहे. त्यात मराठ्यांनी पोर्तुगीज लोकांकडून काबीज केलेली एक प्रचंड घंटा टांगली आहे. तिच्यावर इ. स. १७०६ हा सन आहे व तिच्या सभोवती ‘ Landate Dominam Cymbilis bene Sanetibus ’ अशी अक्षरे कोरली असून तिच्यावर एका कुमारिकेचे व एका बालकाचे चित्र काढलेले आहे. त्या देवालयाच्या आसमंतातील प्रदेशाचा देखावा फारच मनोहर व सृष्टिसौंदर्यप्रचुर आहे. तेथे धोम-महाबळेश्वराकडून वाहात येणारा कृष्णा नदीचा प्रवाह अर्धचंद्राकृती झाला असून त्याच्या सभोवती घनदाट आम्रवृक्षांची मालिका लागलेली आहे... कृष्णातीरी असलेला नानांचा राजवाडा अद्यापि कायम आहे. ह्या राजवाड्यात नानांच्या संग्रहातील अनेक मूल्यवान व कलाकुसरीच्या वस्तू, बहुविध तसविरी आणि इतर जिन्नस नानांच्या पत्नी जिऊबाई ह्यांनी फार जतन करून ठेवल्या होत्या. येथेच नाना व त्यांचे यजमान सवाई माधवराव ह्यांच्या दोन सुंदर तसविरी होत्या. त्या पुण्याचे रेसिडेन्ट सर चार्लस म्यालेट ह्यांच्या पदरच्या कोणी युरोपियन चित्रकला-कुशलाने काढिल्या असाव्यात अशी माहिती मिळते. सांप्रत ह्या तसबिरी पुणे येथील बेलबाग संस्थानात आणून ठेविल्या आहेत. तात्पर्य, डिझ्रायली किंवा ग्लॅडस्टन ह्या मुत्सद्यांची निवासस्थळे पाहून त्याविषयी इतिहासप्रिय आंग्लजनांस जसा सकौतुक अभिमान वाटतो व त्यांची सचित्र वर्णने आनंदभराने ‘ रिव्ह्यू ऑफ रिव्ह्यू ’ किंवा ‘ ग्राफिक ’ पत्रातून प्रसिद्ध करतात, त्याच तोडीचे, किंबहुना त्याहून अधिक योग्यतेचे हे स्थळ असून ते त्या जगद्विख्यात मराठी मुत्सद्याची कीर्ती सदैव करण्यास कारणीभूत झाले आहे ह्यात शंका नाही. ’

१७९९ सालात फेब्रुवारीपासूनच नानांना ज्वर येऊ लागला व त्यांची

प्रकृती ढासळू लागली. अखेरीस फाल्गुन शु. अष्टमीच्या दिवशी, दि. १३ मार्च १८०० रोजी, गुरुवारी मध्यरात्री, पेशवाईतल्या ह्या पुरुषश्रेष्ठाचे– नाना फडणविसाचे-- निधन झाले. त्यांच्या मृत्युयात्रेला १० हजारांचा समुदाय हजर होता. त्यांच्या मृत्यूसंबंधी कुरुंदवाडकरांचे पत्र फार हृदयस्पर्शी आहे. ते लिहितात–– " नानांसारखा मोहरा गेला ! फारच वाईट गोष्ट जाली. श्रीमंतांच्या दौलतीस मोठा आळा होता. इकडील तो पूर्वऋणानुसंबंधी वर्तमान कळल्यापासून काही सुचत नाही. नाना यांचे योगेकरून हेही दिवस पाहिले. ये विशींचा विस्तार काय काय लिहावा ?" त्यांच्याविषयी इंग्लंडच्या 'एशिॲटिक ॲन्युअल रजिस्टर ' ह्या पत्रात मृत्युलेख प्रसिद्ध झाला होता. त्यावरून त्यांच्या कीर्तीचा डंका इंग्लंडपर्यंत पोहोचला होता असे दिसून येईल. ज्याची तोड भारतात तर सोडाच पण जगातही सहसा मिळणार नाही, असा एक महान राजकारणी म्हणून त्या पत्राने त्यांचा गौरव केला आहे. शत्रूने केलेल्या ह्या गौरवाला विशेषच महत्त्व आहे.

नानांच्या निधनानंतर मराठी साम्राज्याचे सारे शहाणपण लयाला गेले. दिवट्या रावबाजीची राजवट सुरू झाली. अखेरीस १८१८ साली बाळाजीपंत नातूंनी इंग्रजांचा बावटा शनिवारवाड्यावर रोवला. मराठी राज्याचा हा आधारस्तंभ नाहीसा झाल्यावर अल्पकाळात साऱ्या भारतावर परकीयांचा अंमल सुरू झाला.

नानांच्या मृत्यूनंतर तेव्हाचे गव्हर्नर जनरल मार्किस ऑफ वेलस्ली यांनी पेशवा दुसरा बाजीराव याला दुखवटयाचे पत्र पुढीलप्रमाणे लिहिले– ' The loss of persons distinguished for their talents, great qualities and abilities is at all times a subject of regret. '

याविषयी आणखीही काही पत्रे नमुनेदार आहेत. पुण्याहून कर्नल पामरने वेलस्लीला पुढीलप्रमाणे पत्र धाडले– ' काल रात्रौ नाना


फडणवीस मृत्यू पावले हे आपणास कळविणे हे माझे महत्त्वाचे कर्तव्य समजतो. मला वाटते त्याच्या मृत्यूबरोबरच शहाणपण व मुत्सद्दीपण यांनीही पुणे दरबाराचा निरोप घेतला. '

पुण्याहून नाना वारल्यावर दि. १३ मार्च १८०० रोजी पटवर्धनांचे मिरजेस पुढीलप्रमाणे पत्र गेले– ' श्री नाना यांचा काळ वद्य ३ गुरुवारी मध्यरात्रीस जाला. समस्त मुत्सद्दी आले होते. प्राणोत्क्रमणसमयी श्री राजश्री रावसाहेब (अमृत) हेही आले; परंतु भाषण नाही. तसेच वाड्यात गेले. शव माजघरातून जाळीपुढे आणिले. गंगेवर न्यावयाची सिद्धता झाली. तो अरबांनी आपले फडशाकरिता अडथळा घातला. नंतर राजश्री दुल्लभदास यांनी हवाला घेतला. तेव्हा शव बाहेर जाऊ दिले. या खटपटीस सूर्योदय जाला. नदीवर दहा सहस्त्र माणूस मिळाले होते. नानांकरिता ते दिवशी हाहाकार जाला तो काय वर्णावा ! '

नानांची आज आठवण झाली की बाळा बहिरू शाहिराच्या पोवाड्यातील पुढील दोन पंक्ती माझ्या तोंडून नकळत बाहेर पडतात —

" खूप युक्तीने राज्य राखिले यशवंत फडनीस नाना ।
भली बुद्धीचे सागर नाना ऐसे नाही होणार ॥ "

□ □ □



६. आनंदीबाई पेशवे

पेशवे घराण्यातील तीन स्त्रिया प्रसिद्ध आहेत. पहिल्या बाजीरावाची आई राधाबाई, माधवराव पेशव्यांची आई गोपिकाबाई अन् तिसरी रघुनाथराव ऊर्फ राघोबादादांची बायको- दुसऱ्या बाजीरावाची आई आनंदीबाई. पहिल्या दोन कीर्तिवान ठरल्या. तिसरीच्या वाट्याला दुष्कीर्ती आली. कथाकार, कादंबरीकार, नाटककार अन् बखरकार या सर्वांनी आनंदीबाईस कारस्थानी अन् ' ध ' चा ' मा ' करणारी ठरविले. तेव्हापासून कुणाही जहांबाज बाईला ' आनंदीबाई ' म्हणण्याचा प्रघात पडला.

परंतु ' आनंदीबाई ' खरोखरच तशी भयंकर अन् खुनाला प्रोत्साहन देणारी स्त्री होती की काय हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. नारायणराव पेशव्याच्या वधामुळे ती कलंकित ठरली तरी त्या प्रकरणी तिचे अंग असल्याचा प्रत्यक्ष पुरावा ऐतिहासिक कागदपत्रांत आढळत नाही. उपलब्ध पुराव्याची छाननी केल्यास ती निर्दोष ठरते, अन् म्हणूनच तिचे चरित्र हृदयस्पर्शी अन् मनाला चटका लावणारे आहे. बदफैली नवरा अन् कुलक्षणी मुलगा यांच्या तिढ्यात या अश्राप स्त्रीला दुर्दैवाचे दशावतार भोगावे लागले. हिला जोडीदार चांगला लाभता तर ही पेशवे कुळाचे भूषण ठरली असती.

आनंदीबाईचा जन्म १७४७ साली (सुमारास) रत्नागिरी जिल्ह्यातल्या गुहागर गावी झाला. हिच्या वडिलांचे नाव राघो महादेव ओक. रघुनाथराव पेशव्याची प्रथम पत्नी जानकीबाई (बर्वे) निवर्तल्या-वर त्याच्याशी आनंदीबाईचा विवाह दि. १७-१२-१७५५ रोजी झाला. त्या वेळी ती आठ वर्षांची तर राघोबा एकवीस वर्षांचा असा हा जोडा होता. त्या काळी मुलीच्या लग्नाची कमाल मर्यादा नऊ वर्षे असल्याने नवऱ्याचे वय कितीही असो अगर तो बिजवर असो, त्याला मुलगी नऊ वर्षांच्या आतल्या उमरीचीच मिळायची.

आनंदीबाई अत्यंत सुस्वरूप असल्याने राघोबा तिच्या अर्ध्या वचनात असे हा समज बरोबर नाही. तो पक्का स्त्रैण असून त्याच्या पदरी अनेक नाटकशाळा अन् छेलछबेल्या होत्या ही वस्तुस्थिती पाहता आनंदीबाई खरोखरीच जरी अगदी सौंदर्यखनी असती तरी तो तिच्या तंत्राने वागलाच असता असे म्हणवत नाही. उलटपक्षी त्याच्याच तंत्राने तिला वागावे लागले असा खरा इतिहास आहे. या उभयतांच्या लग्नानंतर सहा वर्षांनी पानिपतचे रणकुंड पेटले. सदाशिवरावभाऊ नि विश्वासराव ही दोन " मोत्ये " तिथे गळल्यावर त्या धक्क्याने नानासाहेब पेशव्याने 'भाऊवाचून दुनिया दौलत व्यर्थ आहे' असे म्हणत प्राण सोडला. नंतर माधवरावाला पेशवेपद प्राप्त झाले. राघोबालाही त्या पदाची हाव असल्याने उभयतांमध्ये तंटा सुरू झाला. अखेरीस (१७६८) घोडपेच्या लढाईत माधवरावाने त्याचा पूर्ण पराभव करून त्याला सहा लाखांची वेगळी नेमणूक करून दिली. तेव्हा तो नाशिकजवळ आनंदवल्लीस राहू लागला. या गावचे मूळचे नाव होते चावडस. पण आनंदीबाईला मुलगा झाला त्याच्या स्मरणार्थ या गावाला 'आनंदवल्ली' नाव ठेवण्यात आले. तिथे राघोबा मोठ्या इतमानाने राहू लागला. त्याची दोन्ही मुले अल्पायुषी निघाल्यामुळे उभय पती-पत्नी हळहळत असत.

माधवरावाचा धाकटा भाऊ नारायणराव यांजवर उभयतांचे फार प्रेम होते. त्याला आपल्याजवळ बाळगण्याची त्यांना फार इच्छा होती. पण गोपिकाबाई यास तयार झाली नाही. जर नारायणराव तेव्हा त्यांच्या-पाशी राहता तर पुढील अनर्थ टळून इतिहासाला कलाटणी मिळाली असती. पण विधिलिखित वेगळे होते त्याला कोण काय करणार ?

१७७२ साली माधवराव मरण पावला. निधनापूर्वी त्याने राघोबास बोलावून घेऊन नारायणरावाचा हात त्याच्या हातात देऊन म्हटले, ' आपण हा नारायण आणि राज्य आता सांभाळावे. मागचे सर्व विसरून जाऊन सर्व मंडळींनी एकमताने चालावे. ' पुढे नारायणराव पेशवा झाला तो स्वभावाने तापट असून कारभाऱ्यांना टाकून बोलण्यात अन् त्यांचा उपमर्द करण्यास कचरत नसे. पण राघोबाशी त्याचे बरे होते. उभयता स्नानसंध्या, पूजा वगैरे एकत्र करीत व बऱ्याच वेळा एकत्र असत. आनंदीबाईचीही नारायणरावावर ममता असे. माधवराव तितकासा तिला आवडत नव्हता. पण राघोबाचे त्याच्याशी अनेक तंटे झाले त्या वेळी ती कसल्याही कारस्थानात गुंतल्याचे दिसत नाही. याबद्दल रीयासतकार सरदेसायांनी म्हटले आहे, ' आनंदीबाई नवऱ्याप्रमाणे उच्छृंखल असती तर तिच्या हलचालीवर नजर ठेवण्याची ताकीद माधवरावाने दिली असती. परंतु दादावर सक्त नजर असता अनंदीबाई-बद्दल यत्किंचित तपास ठेविलेला उल्लेख नाही. यावरून तिच्याबद्दल विशिष्ट प्रकारचे वाईट मत माधवरावाचे नव्हते. आणि माधवरावाच्या हयातीत ती कारस्थाने करीत नसावी, असे अनुमान होते. ' एकूण काय तर माधवरावाच्या मृत्यूपर्यंत आनंदीबाईच्या वयाच्या पंचविशी-पर्यंत तिच्याबद्दल कसलाही प्रवाद नव्हता. नारायणरावाच्या वधानंतर सर्व मामला पालटला अन् मग तिचा न भूतो न भविष्यति असा दुर्लौकिक झाला.

दि. ७-२-१७७३ रोजी राघोबाची मुलगी दुर्गाबाई हिचे लग्न झाले. त्या वेळी नारायणरावाने स्वतः हिंडून निमंत्रणे दिली. नंतर आईस-गोपिकाबाईला- भेटण्यास तो गंगापूरला गेला. ही संधी साधून राघोबाने हैदरअल्लीशी कारस्थान आरंभिले. नारायणराव परत आल्यावर त्याला हे वर्तमान समजले. त्याने दादास लागलीच अटक केली. (दि. ११-४-१७७३) अटकेत त्याचे हाल झाले. त्यामुळे कटवाल्यांशी-गारद्यांशी-संगनमत करून नारायणरावाला धरण्याचा हुकूम त्यांनी दिला. हुकुमात ' धरावे ' असे होते. पण कुणी तरी ' ध ' चा ' मा ' केला आणि त्यामुळे दि. ३०-८-१७७३ रोजी नारायणरावाचा वध झाला. शब्दांची ही फिरवाफिरव आनंदीबाईनें केली असा, समज सर्वत्र झाला. अर्थात आनंदीबाई कृत्या ठरली. यासंबंधी तिची जबानी आहे ती अशी : " नारायणराव यास दगा झाला हेही आम्हांस ठाऊक नाही. याविषयी आमचे अंगी लावणाराने लावावे. आमचा विश्वास काय गेला आसे किमर्थ बोलत नाही. उगीच हाल करावे हे काय ?.... माझी ममता विशेष म्हणोन नारायणरावाची गर्दीचा मार मला सांगत नव्हते. यांणीं चौकसी किमर्थ केली नाहीं. ? यादीचीं अक्षरें " ध " चा " मा " कोणी केला याची चौकसी किमर्थ न केली ? माझा दस्ताऐवज किंवा निरोप काही तरी निवडावयाचें होतें. कांहींच न करितां उगेच पेचात ठेवले. दैवास उपाय नाहीं. "

हरिवंशाच्या बखरीत (पटवर्धनकृत) मात्र हा ' ध ' चा ' मा ' आनंदीबाईने केला असे म्हटले असून तोच प्रवाद सर्वजण खरा मानू लागले. नाना फडणविसाने कटाची कसून चौकशी केली तेव्हा तिच्या विरुद्ध कसलाही पुरावा त्याला आढळला नाही. तरीही नारायणराव पेशव्यांची बखर, मराठी साम्राज्याची छोटी बखर, शेडगावकर बखर व ग्रँट डफकृत इतिहास वगैरे ग्रंथांत खुनाचे सर्व खापर आनंदीबाईच्या

माथी मारले आहे. सोहोनीकृत पेशवे बखरीत याविषयी पुढीलप्रमाणे मजकूर आहे : ' नंतर दादासाहेब यांणी गारदी यांजकडे फितूर मांडला. नऊ लाख रुपये गारद्यांस देऊ म्हणून कागद लिहून दिला आणि नारायणराव यास कैद करावे... आणखी एक दोन असामी यांचा सल्ला त्यात होता. हा मजकूर सारा आनंदीबाई यांनी केला. तेव्हा जे कागदपत्र केले, ते आनंदीबाई यांनी पाहून, ' धरावे, - असे जे होते त्या ' ध ' चा ' मा ' केला. बखरीत दंतकथा व आख्यायिकांचा भरणा असल्यामुळे त्यातील मजकुराला द्यावे तसे प्रामाण्य देता येत नाही. ग्रँट डफने आपल्या ग्रंथात नाना फडणविसाबद्दलही वाईटसाईट लिहून ठेविले आहे; आनंदीबाईची कथाही त्याने तिखटमीठ लावून वर्णिली असल्यास नवल नाही. परंतु या सर्व कथांना अधार नसल्यामुळे आनंदीबाईसंबंधीची विधाने ग्राह्य नाहीत. गारद्यांच्या अगर कटवाल्यांच्या-साहाय्याने राघोबाने नारायणरावाला धरण्याचा प्रयत्न केला असेल व धरण्याच्या त्या भाऊगर्दीत माथेफिरू गारद्यांच्या तरवारीला नारायणराव बळी पडला असेल असे, फार तर म्हणता येईल. ' ध ' चा ' मा ' अन्य व्यक्तीने केल्याचा संभवही काही कमी नाही. मात्र नारायणरावाचा वध झाल्याने त्याविषयीचा लोकापवाद आनंदीबाईला चिकटला नि तो अनेक वर्षे कायम टिकला. त्यामुळे नाटककार, कादंबरीकार अन् बखरकारांना खमंग विषयांचे खाद्य आयते मिळाले. यासंबंधी सरदेसायांनी समारोप केला आहे तो असा : ' तथापि आनंदीबाईच्या कृष्णकारस्थानाचा किंवा दुष्ट स्वभावाचा प्रत्यक्ष पुरावा मला यत्किंचित आढळत नाही. ती सुस्वरूप असून नवऱ्यास भुरळ पाडून त्याजकडून वाटेल ते कृत्य करवी, असा सामान्य समज त्या वेळी होता त्याचाच अनुवाद पूर्वी डफने व व अलीकडे इतिहाससंग्रहाचे संपादक रा. ब. पारसनीस व त्यांच्या साहाय्याने इतिहास लिहिणारे ना. किंकेड यांनी ठिकठिकाणी केलेला

आढळतो, पण त्याचा पुरावा मात्र कोणत्याही प्रकारच्या एवढ्या मोठ्या वाङ्मयात ते देत नाहीत.' सारांश 'ध' चा 'मा' आनंदीबाईने केला याला काडीमात्रही पुरावा सापडत नाही. पण या प्रवादामुळे तिचे जीवन मात्र होरपळून निघाले.

नारायणरावाच्या वधानंतर आनंदीबाई एकवीस वर्षे हयात होती. पुढचा तिचा इतिहास करुण असला तरी उपलब्ध असलेल्या कागद-पत्रांवरून ती थोर स्त्री होती याबद्दल तिळमात्र संशय मनात उरत नाही. नाराणरावाच्या निधनोत्तर राघोबा पेशवा झाला. (ऑक्टोबर १७७३) पण त्याचे हे पद औट घटकेचे ठरले. कारण त्याच वेळी बार-भाई कारभारास रंग चढला अन् त्यामुळे राघोबाला रानोमाळ भटकावे लागले. नारायणरावाची पत्नी गंगाबाई ही त्या वेळी गरोदर होती. आनंदी-बाईने तिलाही मारण्याचे प्रयत्न केले असा उल्लेख परशुरामभाऊ पटवर्धनांच्या पत्रात आहे. पण या बाबतीतही राघोबाची टोचणी तिच्यामागे असावी. १८ एप्रिल १७७४ रोजी गंगाबाईला पुरंदरावर मुलगा झाला. त्याचे नाव सवाई माधवराव. याच्या नावे २९ मे १७७४ रोजी पेशवाईची वस्त्रे बारभाई कारभाऱ्यांनी आणल्यामुळे राघोबाचे पेशवाई उपटण्याचे प्रयत्न वाया गेले. सवाई माधव-रावाच्या जन्माची हकीकत आनंदीबाईला समजली. तेव्हा तिने बुऱ्हाणपुराहून सखारामबापूंना पुढीलप्रमाणे पत्र लिहिले, 'चि. नारायण-रावास पुत्र झाला म्हणून तिकडे हुजुर पत्र लिहावे आणि आम्हास न लिहावे ऐसा तुमचा आमचा ऋणानुबंध चालत आला की काय! आता या पत्राचे उत्तर जलद पाठवावे. आम्हांस नातू झाला म्हणून पत्र घेऊन खिजमतगार आले. त्यास देण्यास सोन्याची कडी तयार नाहीत तरी तुम्ही तेथे दोघांस दोन कडी सोन्याची आमचेवरची द्यावी. बाळाचा समाचार नित्य पाठवीत जावा. तुमच्या नावास व वयास योग्य

दिसेल ते याउपरी तरी करावे. तुम्ही आमचे थोडे बहुत ऐकत असता म्हणून लिहिले आहे. तुम्हाकडेच वडीलपण आहे. दुर्लौकीक न होता काय करणे ते समजून करावे. ' त्याच दिवशी तिने नाना फडणविसासही पुढीलप्रमाणे पत्र लिहिले. ' किल्ल्याची हवा बहुत सर्द आहे. लेकरू लहान, यास्तव ज्या जाग्यास लेकरास सुख पडे तेथे न्यावे. थोरपणाची रीत हीच की, कोणी कोणास बहुत छेडू नये. चुणूक दाखविण्यात मौज आहे. परंपरा पाहोन योग्य असेल तो अर्थ समजून घ्यावा. ' या दोन पत्रांवरून तिच्या मनातले वात्सल्य अन् तिचे शहाणपण दिसून येते. अशी खुबीदार पत्रे लिहिणारी ती, गंगाबाईस मारण्यास प्रवृत्त होते ही गोष्ट मनाला पटत नाही. तसा प्रयत्न तिने केला असला तर त्याचा करविता धनी राघोबा अगर त्याच्या पक्षाची मंडळी हीच असावीत.

सवाई माधवरावाचा कारभार सुरू होताच राघोबाने इंग्रजांशी सूत जमविले व त्यांच्याकडे फौज मागितली. पण पेशव्यांचे सरदार हरिपंत फडके त्याच्या हात धुऊन पाठीस लागले होते. त्यांना झुकांडी देत तो सारखा पळत होता. त्या वेळी आनंदीबाई गरोदर होती. तेव्हा त्याने तिला धार येथे ठेविले. तिथे १०–१–१७७५ रोजी तिला मुलगा झाला. तो दुसरा बाजीराव या नावाने इतिहासात प्रख्याती पावला. या पुत्रजन्माबद्दल सरदेसायांनी पुढीलप्रमाणे मार्मिक उद्‌गार काढले आहेत : ' मातेच्या गर्भारपणचे संस्कार संततीवर होत असतील तर अकबर, शिवाजी व बाजीराव यांची उदाहरणे तुलनेकरिता ठळकपणे मनात भरतात. शिवाजी-बाजीरावांनी राज्याच्या प्रचंड घडामोडी केल्या. एकाने राज्य स्थापिले, दुसऱ्याने घालविले. ' शत्रू पाठीवर असताना शहाजीने जिजाईस शिवनेरीस ठेविले. तिथेच शिवाजीचा जन्म झाला. आनंदीबाईच्या प्रसूतीसमयी थोड्याफार फरकाने परिस्थिती अशीच होती. पण एकीच्या मुलाने राज्य स्थापिले तर दुसरीच्या पुत्राने ते घालविले. हाच काय तो

फरक. जिजाबाईचे नाव इतिहासात सुवर्णाक्षरानी लिहिले गेले. बुद्धिमत्ता, कर्तृत्व अन् ग्रंथादिकांचे वाचन यात आनंदीबाई तिच्या तोडीची. पण नादान नवरा, नारायणरावाचा वध नि कुलक्षणी चिरंजीव या त्रिदोषांमुळे तिचे नाव इतिहासात कुविख्यात ठरले.

आपला मुलगा तरी आपले पांग फेडील अशी आशा आनंदीबाईला असावी. पण तिचा फार मोठा अपेक्षाभंग झाला. ती हकीकत यथाक्रम येईलच. आपल्या मुलांच्या चौथ्या वर्षी तिळगूळ धाडताना तिने बाजीरावाकडून कारभाऱ्यास लिहिलेले पत्रही खुबीदार आहे. ते पत्र असे : ' तुम्हांस रविशंकरमणाचे तीळ शर्करा पाठविले आहेत हे घेणे.... उगेच इंग्रजांचे घरी पोटास मात्र खाऊन कितीक दिवस पडोन रहावे ! यात पूर्वीपासून तेज मिळविले आहे. या प्रांतात पराक्रमाच्या गोष्टी तीर्थरूपांच्या फार ऐकतो, त्या अशा की ज्या तऱ्हेने पुराणातील गोष्टी ऐकाव्या त्या तऱ्हेच्या असे असोन हे तेथे राहणे आणि उद्योग न करणे, हे काय समजून वडिलांचे मर्जीस येत असेल ? वरकड जातीने तो बहुत मानी आहेत. परंतु कालापुढे इलाज नाही. आम्ही लेकरे, विशेष लिहिले तर तीर्थरूप म्हणतील की, ' बाईको सारा वेळ आम्हास गांजीत असते. तिला लेक झाला तोही तसाच खोटा निघाला ! ' यास्तव जुम्ही मर्जी पाहून पत्र वाचून दाखविणे आणि आज्ञा जे होईल ते लिहिणे. आम्ही वडिलांस तीळ शर्करा पाठविले आहेत ते प्रविष्ट करून उत्तर पाठवावयाची विनंती करणे. ' वरील पत्रात राघोबासारख्या पराक्रमी पुरुषाने इंग्रजांच्या ओंजळीने पाणी पिऊ नये असे तिने सूचित केले असून नवऱ्याला शालजोडीतले टोमणे हाणले आहेत.

अखेरीस सर्व आघाड्यांवर राघोबाचा पराभव झाल्यामुळे त्याला फजितीचे मानकरी बनावे लागले. त्या वेळी आनंदीबाईच्या मनात दुःखाचे कढ कसे रटरटले असतील त्याची कल्पना करणे कठीण आहे.

काळ तर मोठा कठीण आला ! हे उमगल्यावर सर्व जण कोपरगावास राहू लागली. कृतकर्माचा राघोबाला आता पश्चात्ताप होऊ लागला. माधवरावाची आई गोपिकाबाई गंगापुरास रहात होती, तिला भेटावे असे त्याच्या मनाने घेतले. विश्वासराव माधवराव अन् नारायणराव असे तीन कर्ते पुत्र अल्पवयातच मृत्युमुखी पडल्याने ही बाई मनात फार कष्टी होती तशात नारायणरावाचा वध राघोबाने केला-करविला हा दंश तिच्या मनात होताच. तिला जेव्हा त्याच्या भेटीची इच्छा समजली तेव्हा ती मानी गोपिकाबाई मोठ्या कुर्रेबाजपणे बोलली : ' यास अनुताप झाला नाही. मी दर्शन घेत नाही. आहे त्याप्रमाणे प्रायश्चित्त घेऊन एकटा येईल तर दर्शन होईल. ' तिला भेटण्याचा सल्ला त्याला आनंदीबाईनेच दिला असावा असे दिसते. होता होता राघोबा प्रायश्चित्तास कबूल झाला. ४-८-१७८३ रोजी क्षौर करून ब्रह्मवृंदांच्या मेळाव्यात याने प्रायश्चित्त घेतले तेव्हा मग गोपिकाबाईने याची भेट घेतली. त्याचे आयुष्य आता संपत आले होते. वय तसे फार नव्हते. पण त्याचे मन त्याला खात होते. शरीर पोखरले होते. तरी नाटकशाळांचा नाद सुटत नव्हता. याच सुमारास त्याची तिसरी बायको मथुराबाई ही निवर्तली. आनंदीबाईशी याची भांडणे नेहमी घडू लागली. रिकामपणात भांडणाशिवाय त्याने तरी काय करावे ? अन् मग आठ-दहा दिवस हा तिचे दर्शन घेत नसे. असा हा पेशवाईतील कलिपुरुष राघोबादादा कचेश्वर येथे दि. ११-१२-१७८३ रोजी निधन पावला. दुर्दैव असे की त्या वेळीही आनंदीबाई गरोदर होती. राघोबा निवर्तल्याचे समजल्यावर तिच्या अंगावरील दागदागिने अन् जडजवाहीर घेऊन येण्याचा हुकूम नानाने सोडला. तेव्हा बाई हृदय पिळवटून बोलली, ' अंगावर आहेत ते काढोन घेणे ' तेव्हा नानांच्या कारभाऱ्यांचा नाइलाज झाला. पुढील दहा वर्षांचा उर्वरित काळ तिने कोपरगावी घालविला. त्या काळात तिचे

वर्तन, तिची दिनचर्या, तिचा मुत्सद्दीपणा अन् ग्रंथाबद्दलचे तिचे प्रेम पहाता ती शहाणी बाई होती असाच इतिहासाचा अभिप्राय आहे. आयुष्यभर दुर्दैवाने तिचा पाठपुरावा केल्यामुळे तिचे सारे शहाणपण वाया गेले. यालाच भवितव्यतेची लीला म्हणतात. तिचे अखेरचे दिवस नजरकैदेत गेले. नवरा कलिपुरुष असल्याने ही कृत्या ठरली. आणि मग कोपरगावी ही अपमानास्पद जिणे कंठू लागली.

आनंदीबाईला सहा मुले झाली. चार मुलगे व दोन मुली. सहा मुलांत गाजला बाजीराव, नव्हे रावबाजी. लहानपणापासून ह्याच्या काळजीचा भुंगा आनंदीबाईचे शरीर अन् मन पोखरीत होता. याच्या द्वाडपणाला तोड नव्हती. स्त्रैणपणातही हा चांगला मुरलेला. बाप से बेटा सवाई जणु ! तेराव्या वर्षीच आपली बायको भागिरथीबाई हिला याने एकांतात बोलाविले. त्या वेळी ती अवघी नऊ वर्षांची पोर होती. पण या लंपटाला त्याचे काय होय ! पण याची वासना याला स्वस्थ बसू देईना. असा प्रकार दोन तीनदा झाल्यावर ही गोष्ट आनंदीबाईला समजली. तेव्हा तिने त्याची खरडपट्टी काढली.

तेव्हा हे दिवटे चिरंजीव तिला म्हणाले, 'ती तुमची सवत आहे ?' मग मात्र या वासनामूर्तीला तिने लाथाबुक्क्यांचा चांगलाच प्रसाद दिला. अशा परिस्थितीत त्याला झाली गरमी. तेव्हा ही म्हणते : 'बाजीराव यास गर्मी जाली आहे; बायको थोर नाही हेच बाधा फार आहे.' मुलाचे हे थेर पाहिल्यावर तिचे हृदय कसे पिळवटून निघाले असेल त्याची कल्पना करावी. बाजीराव विद्याभ्यास मुळीच करीत नसे. स्नानास गेला तर पोहतच बसे. हिने काही सांगितले तर तो तिला मुळीच जुमानीत नसे. मग अशा वेळी ती टाहो फोडते की 'बाजीराव थोर जाले असता अद्यापि मर्यादेची तऱ्हा नाही. कालचर्येस काय म्हणावे ? आम्ही पेचात आणि मुले अशी. तशात हा मुख्य. याची तऱ्हा अशी नसावी. याचे

दैवाने चालते आणि यांनी असे असणे हा दैवयोग आहे. ' पुढे ती म्हणते, ' बाजीराव फार खेळतात. यास कोणी जपत नाही. येथे कारभारी आहेत, यांतून कोणी जवळ असावे ते नाही.... मूल, शाहाणे होऊ नये, असे साऱ्यांस वाटते; ' आपल्या मुलाबद्दल ती कशी वैतागली होती याची साक्ष म्हणजे हे उद्‌गार !

पण अशा दुःखातही आनंबाई मोठी धीराची अन् कर्तव्याला जागणारी बाई दिसते. गोपिकाबाई दि. ३-८-१७८८ रोजी निवर्तली. तेव्हा तिने सवाई माधवरावाला पुढीलप्रमाणे दुखवटयाचे पत्र धाडले : ' बाई-साहेबांस पंचवटीस रविवारी कैलासवास झाल्याचे वर्तमान सोमवारी सायंकाळी येथे आफवा आली ...चिरंजिवास आई बाप भाऊ कोणीच नाही. आम्ही दूरच आहोत. एक आजी तेही दूरच होती. परंतु ममतेचे तेवढेच माणूस होते. त्यांचाही कालच जाला होता. सृष्टीची वाट हीच आहे. ' नानांच्या ही कैदेत असूनही तिला घराण्याची – कुटुंबाची माया कशी होती ते समजते.

राघोबाच्या मृत्यूनंतर आनंदीबाई कोपरगावी राहू लागली. तिथे तिला कडेकोट बंदोबस्तात ठेवण्यात आले होते. नानांच्या लेखी परवानगी-शिवाय तिला भेटण्याची परवानगी कुणालाही नव्हती. बाजीरावाचे पहिले लग्न (१७८६) इथेच झाले. ती सुनांना प्रेमाने वागवी. व्रतवैकल्ये, गोप्रदाने व उपोषणे यांत ती नेहमी चूर असे. तिला आपल्या परवशतेची चीड येई व मग ती म्हणे, ' पूर्वी सुरतेमधे इंग्रजाने आम्हास बहुत सुख दिले. पूर्वद्वेष होते, परंतु त्या द्वेषाने हल्ली आम्हास कैदेत ठेवावे ते काहीच न केले. तस्मात राज्याची अशी तऱ्हा असते की दुसऱ्या राज्यासी वाईटपणा असल्यास त्यास युद्धामधे धरावे आणि परागंदा होऊन आल्यास त्याचे संरक्षण करावे असा धर्म आहे. असे इंग्रजाने केले. आणि ब्राह्मणी राज्यामध्ये न्यायच नाही. ' तिच्या कैदेला जबाबदार नाना फडणवीस.

तेव्हा ती काहीसे कळवळून व थोडया उपहासाने म्हणते, ' नानास या दौलतीचे सुख काय आहे ? घरात मूलबाळ संसारिकाचे, सुख ते नाही. दौलत तरी काय करावी ? ' नाना निपुत्रिक असल्यामुळे तिने त्याच्या मर्मावर अचूक बोट ठेवले आहे. आपल्यावर नारायणरावाच्या वधाचे किटाळ आले याबद्दल तिला दुःख होई–राग येई. तेव्हा मागील गोष्टी आठवून ती म्हणते, ' भाऊसाहेबास हिंदुस्थानात जावयास कारण व सर्व बराबर व्हावयास कारण थोरली बाई. ' सदाशिवराव भाऊवर मारेकरी घालण्यात आले होते व पुढे त्याला जे पानिपतावर जावे लागले त्याला कारण गोपिकाबाई असा एक प्रवाद आहे. त्याला अनुकूल तिचे हे उद्गार आहेत. पण तरीही तिला गोपिकाबाईबद्दल सहानभूतीच वाटते ती. म्हणते, ' बाईची धन्य आहे. दोन मूल हत्तीप्रमाणे गेले. आम्हांस किती वाईट वाटते मग त्यांचे काय पुसावे ! ' हिला आपल्या सद्यःस्थितीबद्दल फार वाईट वाटत असे. ती म्हणते, ' आम्ही केवढी माणसे होतो आणि कोणत्या योग्यतेस आलो. अन्याय कोणी पहात नाही. उगेच निष्कारण कैदेत ठेविले आहे. धनी असते म्हणजे ताकत नवती. आम्ही निर्बल जालो. ते समई गांजितात. '

कैदेत असताना आनंदीबाईची दिनचर्या ती काय असणार ? पेशवाई मिळाली नाही. नवरा गेला. मुलगा दुर्वर्तनी निघाला. एक लग्न झालेली मुलगीही मृत्यू पावली. तेव्हा अशा दुःखद परिस्थितीत ही बागेत जाऊन बसे. हरतालिकेचे व्रत कडकपणे करी. सप्तशतीचा पाठ न चुकता म्हणे. गणपतीत ब्राह्मणभोजने घाली. कचेश्वरी चांगली बाग करावी असे तिला वाटे. पण सत्ता व अधिकार नसल्यामुळे ही साधी गोष्टही तिला करता येत नाही म्हणून ती हळहळे. श्रावणात ब्राह्मणांना दक्षणा देण्यात ती दक्ष असे. वाड्यात हळदीकुंकू–समारंभ करी. गावातल्या बायकांना अगत्याने बोलवी. वाचनाची तिला आवड होती असे दिसते. तिच्यापाशी

राघोबाने जमविलेले ग्रंथ होते. मोक्षधर्माचे एक पुस्तक परत-बोलीच्या कराराने त्याने आणले होते. तिने ते ज्याचे त्यास परत केले. भागवताचे पारायण करण्यासाठी पेशव्यांचे उपाध्याय कर्वे (पुणे) यांजकडून तिने पोथी आणविली. कर्मविपाकाचे व सूर्यअरुण ही पुस्तकेही तिने मागविली होती. महाभारत ग्रंथही ती पुण्याहून मागविताना आढळते. पहिल्या बाजीरावाचा धाकटा मुलगा जनार्दनपंत याची मुलगी सगुणाबाई हिच्याएवढा ग्रंथसंग्रह तिच्यापाशी नसला तरी एकंदरीत ती ग्रंथप्रेमी दिसते. वाचनात जशी ही प्रवीण तशी लिहिण्यातही ही मोठी चतुर होती. महत्त्वाची पत्रे ही स्वतः लिही. नानाला तिने लिहिलेले हे पत्र पहा. ती लिहिते, ' आम्ही होऊन (पत्र) पाठवावे, तर कारणाखेरीज आम्हास पत्रे पाठवितात म्हणोन तुम्हीच हसाल. हा काळ समजोन पत्रे न पाठविली. हल्ली पत्राचे कारण की तुम्ही तीन पिढ्यांचे दौलतीतील फडणीस असोन दौलतेची तो गती झाली ती झाली. हल्ली यवनाक्रांत ब्राह्मणी दौलत फितुरांनी होऊ पाहाते. तुमच्या चित्तातील उगीच आढी जात नाही, आणि ब्राह्मणी तो बुडत चालली ! या दौलतेत पूर्वी कारभारी झाले. त्यांनी ब्राह्मणी स्थापली व दौलतची वृद्धी केली हा काळ प्रस्तुत श्रीसत्तेने आला ! इंग्रेज बुंदेलखंडापर्यंत दोन कंपू आले, आणिकही मागून येणार. याचा बारीक मोठा विचार जो करणे तो तुम्हीच करणे.... त्या पक्षी दोन्ही गोष्टींचा आंदेशा करून ब्राह्मणपण राहे ते करणे. ' तत्कालीन परिस्थितीचे ठसठशीत चित्र रंगवून तिने नानांची कशी कानउघाडणी केली आहे ते दिसून, तिच्या हुशारीचे अन् धूर्त-पणाचे कौतुक वाटते.

पतीवरील निष्ठेने आनंदीबाईने राघोबाला आयुष्यभर साथ दिली. पुढे तो निवर्तला तेव्हा हिला एकाकी वाटणे साहजिक होते. नारायण-रावाचा हिला लळा फार, नारायणराव बहुत मर्यादशील होता. असे ती

म्हणते. पण त्याच्या वधाचे पाप हिच्या कपाळी कायमचे बसले. नशिब म्हणतात ते असे. नवरा व दौलत ही तिची आराध्यदैवते. प्रसंगावधान, महत्त्वाकांक्षा, घराण्याचा प्रखर अभिमान, नातलगांबद्दल कळवळा अन् प्रेम वगैरे हिचे गुण प्रशंसनीय म्हटले पाहिजेत.

मन थकत चालले तसे आनंदीबाईचे शरीरही थकत चालले. तिच्य पतीच्या अस्थी गंगेत टाकाव्यात ही तिची साधी इच्छाही कुणी पुरी करीना. मेल्यावर राग धरणे बरे नव्हे असे तिला वाटे. उपेक्षेमुळे ही अगदी कंटाळली. कोपरगावला तिचे मन मुळीच रमेना. १७९२ सालच्या अखेरीस ती आनंद-वल्लीस येऊन राहिली. नाव ' आनंदीबाई ' पण ' आनंद ' हिच्या वाट्याला फारच थोडा आला. तरी ती अखेरपर्यंत आनंदी राहिली. नवऱ्याच्या नाटकशाळांचा व त्याच्या मुलांचा परामर्शही हिने चांगला घेतला. हिच्या दिमतीला जे कारभारी, नव्हे पहारेकरी ठेवले होते त्यांना सारखा तिच्याबद्दल संशय वाटे. त्यामुळे तिला जीवन नकोसे झाले होते. तिची जीवनज्योत मंदावत चालली तरी देवपूजा अन् जपजाप्य सुटले नव्हते. दि. २६ मार्च १७९४ रोजी ती अंमळ घाबरीघुबरी झाली. म्हणून गंगोदक तिच्या मुखात घालण्यात आले. हेमगर्भाची मात्राही देण्यात आली. तिचे मुलगे तिच्याजवळ बसून होते. पण सर्व उपाय थकून ही दुर्दैवी स्त्री २७ मार्च १७९४ रोजी निधन पावली. तिची योग्यता सरदेसायांनी पुढीलप्रमाणे वर्णिली आहे :

' ती मोठी शहाणी अन् धूर्त होती. स्पष्टवक्तेपण हा तिचा आणखी एक गुण. पेशव्यांचा दर्जा आणि लौकिक सांभाळण्यात ती सदैव दक्ष असे. तिला जोडीदार चांगला लाभता तर पेशव्यांच्या घराण्यातील सर्वश्रेष्ठ देशाभिमानी स्त्री म्हणून तिची गणना झाली असती. '

□ □ □



' ईश्वराने राज्य घालविण्यास मला उत्पन्न केले, माझा काय इलाज आहे. राज्य गेले त्यात लोकांचे मी काय नुकसान केले ?' असे बिनदिक्कतपणे म्हणणारा...

७. दुसरा बाजीराव

पेशवाईचा इतिहास पाहिल्यास एक गोष्ट दिसून येते ती ही की, बहुतेक पेशवे अल्पायुषी निघाले. थोरले बाजीराव अन् नानासाहेब पेशवे चाळिशीच्या घरातच निवर्तले. माधवराव, नारायणराव (याचा तर खूनच झाला) नि सवाई माधवराव या त्रिवर्गाचा अंतही तरुणपणीच झाला. राघोबादादांचे चिरंजीव अन् थोरल्या बाजीरावाचे नातू (यांना उपहासाने रावबाजी म्हणतात) दुसरे बाजीराव यांनी इंग्रजांच्या हातावर मराठेशाहीचे उदक सोडले, त्यांना मात्र दीर्घायुष्य लाभावे ही नियतीने केलेली एक क्रूर थट्टाच होय.

दुसऱ्या बाजीरावाला स्वतःचा अमृतोत्सव करण्यापर्यंत आयुष्य लाभले अन् ते त्याने मोठ्या मिजाशीने, रसिकतेने अन् राज्य गेल्याबद्दल कसलाही मनात विषाद न बाळगता भोगले. ब्रह्मावर्तास उर्वरित आयुष्य त्याने चैनीत अन् स्वास्थ्यप्रियतेत घालविले. त्याच्या बापाला – राघोबाला मिळालेले पेशवेपद औट घटकेचे ठरले. याची आई आनंदीबाई नारायणरावाच्या वधामुळे बदनाम झाल्याने दुःखाने होरपळून निघाली, पण याला कशाचेच सोयरसुतक नव्हते. याचे आजोबा, थोरले बाजीराव योद्धे अन् पराक्रमी म्हणून गाजले तर हा पळपुटा अन् प्रणयाराधनेत सदा

मशगुल होणारा वीर म्हणून गाजला. वयाची वीस वर्षे याने उनाडकीत घालविली. पण याचे नशीब थोर म्हणून एकविशीत याला पेशवेपद लाभले. वयाच्या त्रेचाळिसाव्या वर्षी मराठी राज्य इंग्रजांच्या स्वाधीन करून हा ब्रह्मावर्तास चालता झाला. बत्तीस–तेहेत्तीस वर्षे तिथे त्याच्या जीवनाला कसलाच धरबंद नव्हता. अन् मग १८५७ च्या स्वातंत्र्य-युद्धाच्या सहा वर्षे अगोदर याने इहलोकचा निरोप घेतला. पंतप्रधान कसा नसावा याचे उत्तम उदाहरण म्हणजे याचे चरित्र. स्वतःच्या जबाब-दारीची यत्किंचितही फिकीर न करता याने सारे आयुष्य सुखोपभोगात घालविले, म्हणून याची कुणालाही चीड येईल. पण पेशवाईची धुरा पेलण्यास तो किती नालायक होता, याचे पुरावे त्याच्या चरित्रात जागो-जागी दिसून येतात. अन् म्हणून त्याचे सारे जीवन चीड आणणारे असले तरी अत्यन्त चटकदार अन् मनोरंजक आहे यात शंका नाही.

सवाई माधवरावाच्या कारकीर्दीत (स. १७७४–१७९५) पेशव्यांचे सरदार हरिपंत फडके राघोबाच्या हात धुऊन पाठीस लागले. त्या वेळी त्याची आवडती बायको आनंदीबाई गरोदर होती. म्हणून त्याने तिला धार येथे ठेवले. तिथे १७ जानेवारी १७७५ रोजी तिला जो मुलगा झाला तो दुसरा बाजीराव या नावाने प्रख्याती पावला. शिवाजीचा जन्म अशाच परिस्थितीत शिवनेरीवर (स. १६३०) झाला होता. त्याने स्वराज्य स्थापन केले. धारला जन्म पावलेल्या या बाजीरावाने–– नव्हे रावबाजीने — या पेशवेकुलोत्पन्नाने, मात्र स्वराज्याला चूड लावली. याच्या जन्मासंबंधी खरेशास्त्र्यांनी आपल्या नाना फडणवीस चरित्रात पुढीलप्रमाणे उद्गार काढलेले आहेत ते पाहण्यासारखे आहेत : ' बाई.... तिथे प्रसूत होऊन मराठी राज्य बुडविणारे दिवटे बाजीराव-साहेब जन्मास आले. बाईने नाना फडणविसाकडे साखर पाठविली होती. ती साखर नानास परिणामी कडू लागली. '

बाजीरावाच्या जन्मानंतर आठ वर्षांनी राघोबादादा निवर्तले. (स. १७८३) त्याचे वास्तव्य तेव्हा कोपरगावी आनंदीबाईजवळ होते. लहानपणापासून हा उनाडक्या करी. शिक्षणाची याला अजिबात आवड नव्हती. राघोपंत ठोसर याचे शिक्षक. हा त्यांना मुळीच जुमानीत नसे. त्यामुळे याच्या द्वाडपणाचा घोर आनंदीबाईला सतत लागलेला दिसून येतो. याच्या चौथ्या वर्षी याच्याकडून राघोबाच्या कारभाऱ्याला आनंदीबाईने पत्र लिहिले. ' त्यात तिला लेक झाला तोही असाच खोटा निघाला ' असे निराशेचे उद्‌गार आढळतात. बाराव्या–तेराव्या वर्षी याला कावीळ झाली होती. त्या वयातही त्याची वर्तणूक चांगली नव्हती. याच सुमारास, ' बाजीराव आरवाचगिरी फार करतात. ऐकत नाही, हे काय जाले ' व ' बाजीराव थोर जाले असता, अद्यापि मर्यादेची तऱ्हा नाही. कालचर्येस काय म्हणावे. ' असे उद्‌गार आनंदीबाईने काढल्याचे पेशवे दप्तरात (खंड ४) पाहावयास सापडतात. याचे लक्ष सदा खेळण्यात. एकदा चातुर्मासात याने मौन धरले. अर्थात आई फार रागावली. पण याने तिला मुळीच दाद दिली नाही. पेशवे दप्तरात चवथ्या खंडात ' बाजीराव यांच्या पत्रिकेत आहे की, याजवळ वडिलांचे वेळचे काही राहू नये. ' असा उल्लेख एका पत्रात आहे. दुर्दैवाने या पत्रातील भावार्थ बाजीरावाने आपल्या कृत्यांनी अखेरीस खरा केल्याने त्याची पत्रिका करणाऱ्या जोतिष्याची कुणीही पाठ थोपटील.

आनंदीबाई लेकाचे (बाजीरावाचे) थेर पाहून नेहमी तळतळते अन् मग ती उद्वेगाने म्हणते : ' बाजीराव फार खेळतात. यास कोणी जपत नाही. येथे कारभारी आहेत, यातून कोणी जवळ असावे ते नाही.... मूल, शाहाणे होऊ नये, असे साऱ्यांस वाटते. ' या तिच्या तळतळाटावरून लहानपणीच बाजीरावाच्या मनाचा वारा कसा वहात होता त्याची स्पष्ट कल्पना येते.

लहानपणच्या खोड्या एक वेळ क्षम्य मानता येतील अगर त्याच्याकडे कानाडोळाही करता येईल. पण लहान वयातच बाजीरावाची वासना फार तीव्र होती. तो पक्का स्त्रैण होता. त्याचे पहिले लग्न अवघ्या अकराव्या वर्षी (स. १७८६) झाले.

बाजीराव पक्का निर्लज्ज होता. लहान वयातल्या बायकोशी समागम करण्याचा त्याचा हिय्या असे. मग बाहेर त्याने किती पोरी खराब केल्या असतील अन् त्याचा बाहेरख्यालीपणा किती ऊतू गेला असेल त्याची कल्पना करणे कठीण आहे. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस राज-घराण्यातील मुले कशी बहकलेली असत, त्यांची विषयवासना किती घाणेरडी असे अन् त्यांच्या छोकरेबाजीला किती बहर आलेला असे त्याचे यथातथ्य वर्णन औंधकरांनी आपल्या आत्मचरित्रात केले असल्याने बालपणी बाजीरावाने लहानपणी अनेक चाळे अन् ढंग केले असतील याबद्दल मुळीच आश्चर्य वाटावयास नको. अखेर व्हायचे तेच झाले. अन् बालपणीच बाजीरावाला गरमीसारखा घाणेरडा रोग झाला. तेव्हाचे अनंदीबाईचे दुःख पाहून कुणासही हळहळ वाटेल. परंतु तिच्या या अरण्यरुदनाला बाजीरावाने मुळीच भीक घातली नाही. शेवटी परिणाम असा झाला की त्याची पहिली बायको अवघ्या चवदाव्या वर्षी (स. १७९३) निधन पावली. बाजीरावाच्या पहिल्या पत्नीचा त्याच्या जबर कामवासनेमुळेच मृत्यू ओढवला, असे अनुमान निघते. बायको गेली अन् मग वर्षभरातच त्याला जरबेत ठेवू पाहणारी त्याची आई आनंदीबाईही निवर्तली (स. १७९४). तेव्हा मग त्याचे सारे जीवन निरंकुश झाले. त्या वेळी त्याची उमर होती एकोणीस. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात या म्हणीप्रमाणे त्याच्या चारित्र्याची पारख जाणत्यांना त्याच्या विशीतच झाली. आई–बाप निवर्तले, आणि मातृनिधनानंतर वर्षानेच सवाई माधवराव मृत्युमुखी पडला. अर्थात पेशवेपदाची हाव

बाजीरावाच्या मनात उत्पन्न झाली. येथेच त्याचे बालपण संपले नि मग त्याच्या जीवनाच्या दुसऱ्या पर्वाचा प्रारंभ झाला.

दुसऱ्या बाजीरावाचे वर्णन खरेशास्त्र्यांनी आपल्या नाना फडणवीस चरित्रात पुढीलप्रमाणे केले आहे : 'बाजीराव हा रूपाने बहुत सुंदर असून त्याचे भाषण तर असे मोहक असे की, जेणेकरून मनुष्य कितीही शहाणा व सावध असला तरी त्यास भूल पडावी! याखेरीज त्याच्या अंगात नाव घेण्यासारखा एकही सद्गुण नव्हता. दुर्गुण मात्र इतके होते की, त्याचे वर्णन करायचे तर त्याचा एक स्वतंत्र मोठाच ग्रंथ होईल.' पुढे नानांसारख्या मुत्सद्दयालाही बगलेत मारून बाजीरावाने पेशवे पद कसे मिळविले ते पहाता शास्त्रीबुवांनी केलेले त्याचे वर्णन अगदी खरे वाटते. त्याचे चरित्र सांगण्यास खऱ्यांच्या वरील उद्गारांची चांगली मदत होते. खरेशास्त्र्यांच्या ऐतिहासिक लेखसंग्रहाच्या खंडातल्या (खंड नववा) एका पत्रात बाजीरावाचे वर्णन पुढीलप्रमाणे आढळते : 'श्रीमंतांचे शरीरसामर्थ्य चांगले आहे. गोरे फार नाहीत परंतु नाकडोळे चांगले आहेत. वित्पन्न आहेत. बोलणे फार पाहिजे....धर्माविषयी वासना बहुत आहे, कृपणपणा अगदी नाही.' बाजीराव पेशवेपदावर येण्यापूर्वी त्याच्या रूपाची अन् गुणांची दवंडी त्याच्या भक्तांनी वरीलप्रमाणे पिटून ठेवली होती. अन् म्हणूनच होनाजी बाळा शाहीराने त्याच्यासंबंधी पुढील थाप डफावर मारून ठेवलेली आढळते :

'बालार्क तेज पसरले। सवाई बाजीराव धर्मरूप गादीवर बैसले।
ऐश्वर गळा साजती। पाहून शत्रू लाजती। जयवाद्य नित्य वाजती।
धार्मिक नीती गर्जती। किर्ती या मंडळात विलसे जिवनी॥'

मराठेशाहीचा एक बुरूज महादजी शिंदे दि. १२ फेब्रुवारी १७९४ रोजी मृत्यू पावला. सवाई माधवरावाचा एक हातच जणू तुटून पडला. पुढील वर्षी २५ डिसेंबर १७९५ रोजी रविवारी सवाई माधवरावाने दिवाण-

खान्यातून खाली उडी घेतली अन् त्यामुळे त्याचा मृत्यू ओढवला. या प्रसंगाचे प्रभाकर शाहीरकृत हृदयस्पर्शी वर्णन पाहण्यासारखे आहे ते असे : ‘ उजाडता द्वादशीस कुणीकुन कुबुद्धि संचरली ! तिसरे मजल्या-वरुनि घातली उडी कारंज्यावरी ! एकाकी, हालचाल न होता वार्ता दुखरी !........ रवि मावळता वरी मरण झडकरी आले सखयाला ! इथून आता प्रारंभ दिसंदिस अद्भुत प्रलयाला ! ! ’

सवाई माधवरावाच्या मृत्यूनंतर प्रलय सुरू झाला ही प्रभाकर शाहिराची वाणी अगदी खरी ठरली. कारण तिथपासूनच बाजीरावाचे पेशवाई बळकाविण्याचे प्रयत्न सुरू झाले. या सुमारास बाजीराव जुन्नरास नजरकैदेत होता. आनंदीबाईच्या निधनानंतर त्याला बंदोबस्तात ठेवणे भाग आहे असे वाटल्यावरून नाना फडणविसाने त्याला जुन्नरास नजरकैदेत ठेविले. खर्ड्याची लढाई तेव्हा चालू होती (११-३-१७९५). त्या वेळी नानाने त्यांस पत्र लिहिले ते असे : ‘ तुमची पुढील व्यवस्था स्वारी आटोपल्यावर लावून देऊ. ’ पण बाजीरावाच्या मनाप्रमाणे व्यवस्था नानाकडून न लागल्याने त्याने सवाई माधवरावाशी गुप्त पत्रव्यवहार सुरू केला. पण पुढे अनेक कारस्थाने करून त्याने नानांना पेचात आणण्यास कमी केले नाही. तरीही नानांच्या मसलतीस अखेरीस यश येऊन त्यांनी बाजीरावाचा धाकटा भाऊ चिमाजी आप्पा यास २ जून १७९६ रोजी पेशवाईची वस्त्रे दिली. तेव्हा दौलतराव शिंद्याच्या मदतीने बाजीरावाने पेशवाई मिळविण्याची खटपट चालू केली. नंतर नाना व बाजीराव यांच्यात दिलजमाई झाली. अन् त्याचे पर्यवसान साताराच्या छत्रपतींकडून ५ डिसेंबर १७९६ रोजी बाजीरावास पेशवेपद देण्यात झाले. अखेरीस गंगेत घोडे न्हाले. अन् राघोबाचा बदफैली मुलगा बाजीराव पेशवा झाला अन् तेव्हापासून मराठ्यांच्या साम्राज्याचा अस्त होण्यास सुरुवात झाली.

नानाने बाजीरावाला पेशवेपदाची वस्त्रे दिली त्या वेळी ३१ डिसेंबर १७९६ रोजी त्याने त्यास पत्राने काही सूचना दिल्या होत्या. पारसनिसांच्या ' इतिहाससंग्रह ' मासिकात हे पत्र छापले आहे. त्यातली महत्त्वाची कलमे – सूचना पुढीलप्रमाणे आहेत :

(१) कैलासवासी नानासाहेब व रावसाहेबपण आंगी आणून त्या दृष्टीने दौलतीतील लहानमोठ्यांकडे पाहून, ज्याचे त्यावरी योग्यतेनुरूप लोभाने चालावे.

(२) सांप्रदायाशिवाय जास्त खर्च व खाजगत खर्च निराळा असे होऊ नये.

(३) कोणतेही गोष्टीचा संशय येऊ नये. कोणी सांगितल्यास ऐकू नये.... घरातील गोष्ट बाहेर जाऊ नये. गेल्याने दौलतीचे कामात व दाबात कमी पडून उपहास होतो. खावंदाचे दाबावर दौलतीचे काम करावे लागते. यास्तव कोणतेही कामास आतून फूस व गुढघा नसावा येणेकरून कारभारी यांचा दाब राहात नाही. सरकारकामास उणे पडते.

(४) हरकोणावर कारणानुरूप रोष व कृपा करणे त्याचा विचार आधी कारभारी यांशी होऊन ठरेल तसे होत असावे. राजकारण व कागदपत्र व निरोप परभारे कोणास जाऊ नये. लौकिकात फूट दिसते. हलक्या माणसाचा सहवास नसावा. येणेकडून मनात विपर्यास येणार नाही. योग्यता पाहून ज्यासी जितके काम तितकेच बोलावे. कोणतेही कामाची जलदी नसावी. समजोन उमजोन होत असावे. गैरवांका होऊ नये... सदरहूप्रमाणे धन्यांनी व कारभारी यांनी वैवाट करावी. येणेकरून दौलतीचा दाब व बंदोबस्त राहून काम चांगले चालेल.

यातील विचार व सूचना विवेक राखून बाजीरावाने अंमलात आणल्या असत्या तर राज्य घालविण्याचा प्रसंग त्याच्यावर येता ना !

चार वर्षांनी १३ मार्च १८०० रोजी नाना फडणविसाच्या निधना-

नंतर बाजीरावाच्या मनःपूत कारभारास ऊत आला. अन् मग शेवटी आपल्या नादानपणाने मराठी राज्यास ३ जून १८१८ रोजी भडाग्नी देऊन त्याने ब्रह्मावर्ताचा रस्ता धरला. बावीस वर्षातल्या त्याच्या पेशवेपदाच्या कारकीर्दीची हकिगत सांगण्यात स्वारस्य नाही. कारण तो इतिहास त्याच्या दुर्लौकिकाने भरलेला आहे तेव्हा त्याच्या व्यक्ति-रेखेत त्याची गरज नाही अन् तो सारा इतिहास सांगायचा तर तो स्वतंत्र ग्रंथच होईल. त्याच्या समकालीन व्यक्तींनी त्याच्यासंबंधी व्यक्त केलेले अभिप्राय अन् सांगितलेली त्याची दिनचर्या पाहिली की, त्याच्या कारभाराची स्पष्ट कल्पना येते. म्हणून त्यासंबंधी आवश्यक अन् उपलब्ध माहिती सांगणे उचित होय.

लोकहितवादींनी (गोपाळ हरी देशमुख) आपल्या ऐतिहासिक गोष्टीत (भाग १ ला, १८९२) बाजीरावाची दिनचर्या पुढीलप्रमाणे सांगितली आहे : " तो शनिवारवाड्यात कधी रहात नसे. कारण, काही लोकांनी त्याचे मनात अशी जबरदस्त भीती भरविली होती की, ' नारायणराव मारले ते तेथे समंध होऊन फिरत असतात ' व याजकरिता त्याने तो वाडा अगदी वर्ज्य केला होता...... वाड्यात दोन तीनशे बायका नित्य न्हावयास येत. त्यांनी सकाळी न्हावयाचा समारंभ करावा, तो प्रहर दिवसपर्यंत चाले! नंतर जेवायची तयारी झाल्यावर इच्छेस येईल त्या वाड्यात बाजीरावाची स्वारी जात असे. पंक्तिभोजनाचे समयी सर्वकाळ बायका जवळ बसलेल्या असावयाच्या. आश्रित लोकांनी चार - चार पाच - पाच लग्ने करून घरी एक बायको ठेवावी आणि सरकारवाड्यात बाकीच्या बायका पाठवाव्या! आणि याजकरिताच अन्याबा राहतेकर वगैरे यांनी जास्त लग्ने केली! जो गृहस्थ वाड्यात बायको पाठविणार नाही त्याजवर श्रीमंताची इतराजी व्हावयाची! यामुळे अब्रूदार गृहस्थांनी वाड्यात जाण्याचे सोडिले... बयाताई दातारीण,

शिता शेंडी, काशी दीक्षितीण, उमा फडकीण, ताई पेठीण या प्रकारच्या सुमारे दोनचारशे उनाड बायकांचा थवा नेहमी वाड्यात भरलेला असे. तितक्यांचे शृंगार, दागिने आणि सोंगट्या वगैरे गोंधळ घालून त्यात श्रीमंतांनी काळ काढावा. शिष्ये, पाणक्ये, वगैरेशी व्यभिचाराची त्यांस परवानगी असे. ....याप्रमाणे रावबाजींच्या कारकीर्दीत सर्व गृहस्थांची घरे खराब झाली.... एकंदर राज्यकारभाराच्या नावाने शून्य! फार तर काय? पण दौतलेखणीही वाड्यात मिळावयाची नाही. बायकांचे हातून सर्व कारभार चालावयाचा...... बाजीरावाची तारीफ करणारे व त्यास कृष्णावतार म्हणणारेही बहुत होते....... 'असा प्रभू होणार नाही, त्याची गोष्ट काय सांगावी? तो केवळ कृष्णावतार होता; तो पुन्हा लौकरच येईल' या भ्रांतीत काळ काढीत होते. या वर्णनावरून बाजीरावाच्या कारकीर्दीची अन् त्याच्या अनाचाराची चांगली कल्पना येते.

लोकहितवादींनी केलेले वरील वर्णन बऱ्याच वर्षांनंतरचे आहे, पण गोडबोलेकृत एल्फिन्स्टन चरित्रात (स. १९११, पूर्वार्ध) पुण्याचा रेसिडेन्ट माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन (स. १८११-१८१७) याने केलेले बाजीरावाचे यथातथ्य वर्णन पुढीलप्रमाणे आहे: 'स्नान संध्यादिक कर्मात त्यांचा जेवढा वेळ जातो तेवढा शिवाय करून, बाकीचा सारा अनाचाराच्या, लाजिरवाण्या गोष्टी करण्यात जातो. ते बाहेर मोठा सोवळेपणा दाखवितात परंतु खुषमस्करी मंडळ आणि निर्लज्ज बायका ह्यात बसून प्रहर सहा घटिका घालविल्यावाचून त्यांचा दिवस जात नाही. ज्या मंडळींत जो बीभत्सपणा आणि व्यभिचाराचा अत्यंत निंद्य प्रकार चालतो तो उच्चारू सुद्धा नये इतका घाणेरडा असतो. हे राजश्री तो पाहून आनंदात निमग्न होत असतात. ह्या मंडळीत येणाऱ्या बायका पुष्कळ आणि बहुधा थोरथोरांच्या असतात. जे सरदार आपल्या बायका वाड्यात पाठवीत नाहीत त्यांवर श्रीमंतांची अवकृपा होते.' एल्फिन्स्टन-

सारख्या समकालीन व्यक्तीने केलेल्या रावबाजीच्या वर्णनावरून त्याचे चारित्र्य समजून येते. पण हे काहीच नाही. तात्यासाहेब केळकरांच्या 'मराठे व इंग्रज' ग्रंथात बाजीरावाचे मनोरंजक वर्णन पुढीलप्रमाणे आले आहे : 'माहुलीच्या वाड्यात एका आवडत्या स्त्रीस पुरुषाचा पोशाख व जवाहीर घालून गादीवर बसवून स्वतः खिजमतगार होऊन तिच्यावर चवरी वारण्याचा आंबटशोकी खेळ श्रीमंत खेळले.' या वर्णनावरून रावबाजीचा अधःपात समजून येतो.

ऑर्थर वेलस्लीने (नेपोलियनचा पराभव करणारा, ड्यूक ऑफ वेलिंग्टन या नावाने प्रख्याती पावलेला वीर) बाजीरावाबद्दल मार्मिक अभिप्राय प्रकट केला आहे तो असा : 'बाजीरावाला कशाची चाड नाही. खासगी संबंधात तर त्याच्याकडून लोकांचा भयंकर छळ होतो. त्याच्या रक्षणास असलेले ब्रिटिश लष्कर काढून घ्या म्हणजे त्यास राज्य नाही की प्रजा नाही. त्याची हाव काय ती एकच. विषयवासना भागविण्यास भरपूर पैसा जवळ असावा आणि ज्यांना तो बंडखोर समजतो त्यांस इंग्रजांनी पकडून आपले हवाली करावे, म्हणजे मग हे, राजश्री त्यांजवर आपला सूड उगविणार' या सर्व वर्णनांवरून रावबाजीची मूर्ती आपल्यापुढे ठसठशीत उभी राहते अन् मग त्याच्या हातून राज्य का गेले त्याचा अदमास लागतो.

बाजीरावाच्या बरोबर आणखी एका इसमाचे नाव पुढे येते. त्याचे नाव त्रिंबकजी डेंगळे. अलीकडे 'झेप' कादंबरीत कादंबरीकारांनी त्याच्या कर्तृत्वाचे पोवाडे गायल्यामुळे तो एखादा जबरदस्त सरदार अगर मुत्सद्दी होता अशी कल्पना रूढ होऊ लागलेली दिसते. कादंबरीत त्याची व्यक्तिरेखा ठीक असली तरी तो नाना फडणविसाप्रमाणे मुत्सद्दी अगर महादजी शिंद्यांप्रमाणे खरा शिपाईगडीही नव्हता तसा तो असता तरी

बाजीराव एवढा घसरता ना! असो. राजनाशास बाजीरावाप्रमाणे तोही कारणीभूत असल्याने त्याच्यासंबंधीची मते सांगणेही इष्ट वाटते.

एल्फिन्स्टन त्रिंबकजीबद्दल म्हणतो : 'येवढ्या थोरल्यापदावर विराजमान होण्याला तो खरोखर अगदी अयोग्य मनुष्य आहे. तो आधीअक्षरशत्रू आहे, वाचावयाला सुद्धा शिकलेला नाही. त्याची रीतभात, समज, अक्कल वगैरे तो ज्या वर्गातला आहे त्यातल्या इतर माणसांप्रमाणे आहे. हिंदुस्थान देशाची स्थिती काय, त्याचे राज्य केवढे, त्यांचा आणि इंग्रज सरकारचा जो तहनामा झालेला आहे. वगैरे गोष्टीची त्याला काही एक माहिती नाही.' त्र्यंबकजी डेंगळे अक्षरशत्रू होता असे एल्फिन्स्टन म्हणतो. हे तेवढे विधान वादग्रस्त असून त्याचा बाकीचा अभिप्राय बरोबर वाटतो. त्र्यंबकजीचे हे वर्णन इंग्लिश माणसाने म्हणजे पर्यायाने शत्रुपक्षाचे, म्हणून हवे तर बाजूस ठेवू. तात्यासाहेब केळकरांनी आपल्या 'मराठे व इंग्रज' ग्रंथात त्र्यंबकजी डेंगळ्याबद्दल पुढील उद्‌गार काढले आहेत : 'बाजीरावास पुष्कळ कुटिल मंत्री होते; पण त्या सर्वांत त्रिंबकजी डेंगळा हा श्रेष्ठ होता. वास्तविक त्र्यंबकजी हा अत्यंत शूर, धाडसी, हजरजबाबी, कल्पक व कर्ता असा पुरुष होता. इंग्रजांचा वैराचा स्पर्श त्याला लागला नसता किंवा नाना फडणविसासारख्या मुत्सद्दयाच्या पदरी तो असता तर इतिहासात त्याचे नाव झाले असते....... पण त्याची मिजास जरी पातशहाची होती तरी नांदणूक कैकाड्याची होती! आधी कुळ थोर नाही, त्यांतून स्वभाव तापट, कडक; न्यायान्यायाची क्षिती नाही; काय करावे काय न करावे याचा विवेक नाही; दरबारी हलकटपणाचे पुट अंगावर चढलेले, त्यामुळे ब्राह्मण किंवा मराठे सरदार लोकांत मान नाही; असा प्रकार त्र्यंबकजीचा असल्यामुळे त्याच्या महत्त्वाकांक्षेस ऐश्वर्य मुळीच नव्हते. खुषमस्कऱ्या किंवा अंतरंगातला सल्लागार म्हणजे नर्मसचिव या नात्याने बाजीरावाच्या मनावर त्याने चांगलाच पगडा बसविला होता.

तथापि, त्र्यंबकजीच्याही धाडसाला, ‘ डाक ’ घालील असा बाजीरावाचा नादानपणा असल्यामुळे त्या दोघांच्या जोडीपासून परस्परांचा नाश तर झालाच, पण शिवाजीमहाराजांनी स्थापन केलेल्या मराठेशाहीचाही झाला. ’ बाजीरावाचा सर्वश्रेष्ठ कुटिल मंत्री अशी संभावना केळकरांनी त्र्यंबकजी डेंगळ्याची केली आहे. ती खोटी कशी मानावी ?

आता रियासतकार सरदेसायांचा त्र्यंबकजीबद्दलचा अभिप्राय पाहू या. ते म्हणतात : ‘ विद्येचा किंवा राजकारणाचा उच्च संस्कार त्याला नव्हता तरी खटपटी व तरतरीत वृत्तीमुळे बाजीरावाचे बरेवाईट हुकूम न्यायान्याय न पहाता अंमलात आणण्यास तो कचरणारा नव्हता. हजरजबाब, हिकमत, साहस व धोरण इत्यादी गुणांनी बाजीरावाचा त्याजवर अत्यंत लोभ जडला, आणि त्याच्याच पायी बाजीरावास आपल्या पदास मुकावे लागले. ’ अशा रीतीने सरदेसायांनीही मराठेशाहीच्या नाशास त्र्यंबकजीही कारणीभूत होता असे म्हटले आहे. त्र्यंबकजीत थोडे गुण होते तथापि त्याचे दोषही अव्वल दर्जाचे असल्याने बाजीरावाचे अन् राज्याचे तो रक्षण तर करू शकला नाहीच, पण त्याच्या राजकारणामुळे बाजीरावाचा अन् मराठी राज्याचा शेवट मात्र जवळ आला. त्र्यंबकजी मराठेशाहीच्या अखेरच्या अन् पडत्या काळात बाजीरावाचा एकनिष्ठ अन् इमानी सेवक होता ही गोष्ट खरी, पण त्याची खरी लायकी अन् स्वरूप कशा प्रकारचे होते ते सांगण्यासाठी एवढे उपलब्ध अन् अधिकारी व्यक्तींनी त्याच्याबद्दलचे दिलेले अभिप्राय सांगणे जरुरीचे होते.

३ जून १८१८ रोजी बाजीरावाने माल्कमला शरणचिठ्ठी लिहून दिल्यावर इंग्रजांनी त्याला आठ लाखांचे वर्षासन नेमून दिले. नंतर त्याने बनारसला रहावे अशी अटही त्याच्यावर घालण्यात आली; पण त्याने कानपूरनजिक असलेले विठूर हे गाव आपल्या वास्तव्यासाठी पसंत केले. या गावास ब्रह्मावर्त असेही म्हणतात. फेब्रुवारी १८१९ मध्ये बाजीराव

बिठूर येथे रहावयास गेला. इथेच त्याच्या जीवनाचे मध्य पर्व संपून उत्तर पर्वास प्रारंभ झाला.

बाजीराव ब्रह्मावर्तास गेला तेव्हा त्याच्याबरोबर १४ हत्ती मोहरांनी भरलेले अन् १४ हत्ती जवाहीर पुतळ्या अन् सुर्ती रुपयांनी भरलेले होते. असे एकूण २८ हत्ती त्याच्याबरोबर होते. थोडेबहुत लष्करही त्याच्याबरोबर होते. तेथे त्याच्यावर नेमलेल्या रेसिडेंटाचे नाव होते कॅप्टन लो. हा सुमारे तीन-चार वर्षे तिथे रेसिडेन्ट होता. बाजीरावाच्या मृत्यूपर्यंत आणखी काही रेसिडेन्ट त्याच्या दिमतीस होते. ते पुढीलप्रमाणे :

कॅ. बेकन — स. १८२५ ते १८२९
मे. मॅनसन—स. १८३१ ते १८५१
कॅ. मोर्लंड —स. १८५१

बाजीरावाच्या तेथील तेहत्तीस वर्षांच्या कारकीर्दीची अधिकृत हकिगत सापडणे कठीण आहे. डॉ. प्रतुलकुमार गुप्तांच्या 'दी लास्ट पेशवा' (१९४४) या ग्रंथातही अगदी थोडी माहिती पहावयास मिळते. तथापि भारत इतिहास संशोधक मंडळाच्या १८ व्या वर्षाच्या त्रैमासिकाच्या चौथ्या अंकात त्यासंबंधी आठवणी प्रसिद्ध झाल्या आहेत (स. १९३८ एप्रिल) त्याच्या आधारे बरीच मनोरंजक माहिती सांगता येणे शक्य आहे.

बाजीरावाला ऐश्वर्याची अन् डामडौलाची मोठी आवड. ती त्याने ब्रह्मावर्तास पुरी पुरवून घेतली. तिथे त्याने एक उत्तम अन् भव्य राजवाडा उठविला. त्यातील दिवाणखाने त्याने आरशांनी व झुंबरांनी सजविले होते. पडदे काय, रेशमी गालीचे काय, चांदीसोन्याची भांडी काय, हरतऱ्हेचे अलंकार, अंबाऱ्या, मेणे, रथ, पालख्या, कुत्री, हरणे, काळविटे वगैरे तऱ्हेच्या सर्व चिजा त्याने येथे आणविल्या होत्या. पेशवाईत भोगलेली

सर्व ऐश्वर्य त्याने इथेही भोगण्यास कमी केले नाही. त्यामुळे ब्रह्मावर्त म्हणजे जणू काय एखादी नवीन राजधानीच वसली होती. ब्राह्मणांचा रमणा त्याने तिथेही चालू ठेविला. सुग्रास भोजने अन् दक्षिणेची वाण तिथेही त्याने ब्राह्मणांना भासू दिली नाही. त्याबरोबरच गवई, बीनकार, पहिलवान, वगैरे गुणी लोकांचा परामर्शही तो तिथे उदारपणे घेई. बाळंभटदादा देवधर (१७८०-१८५२) हे प्रख्यात मल्लविद्याविशारदही त्याच्या पदरी तिथे होते. एकंदरीत काय पुण्यासारखीच यक्षनगरी त्याने ब्रह्मावर्तास स्थापन केली अन् तिथे तो मोठ्या डामडौलात राहू लागला. राज्य गेल्याची त्याला ना खंत ना खेद !

बाजीरावाला मिळणाऱ्या आठ लाखांपैकी तीन-चतुर्थांश पैसा पदरच्या मंडळीचा पगार चुकता करण्यात खर्च होई. उरलेला भोजन-खर्चासाठी अन् स्वतःसाठी तो ठेवी. त्याला तीन खून माफ असत अन् पत्रही त्याला फुकट धाडता येई. येथील इंग्रज अधिकारी त्याला वचकून असत. एकदा तो पूजे-अर्चेत दंग असताना त्याचा तनखा आला. पण ब्रह्मकर्माच्या वेळी इंग्रजाचे दर्शन नको म्हणून रागाने तो सर्व पैसा त्याने नदीत टाकण्याचा हुकूम केला. ही हकीगत कलकत्त्यास समजली तेव्हा त्या वेळी तनखा घेऊन जाणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यास दंड होऊन तनखा बाजीरावाला पुन्हा मिळाला. धर्मादायाचे वेळी तो सुर्ती रुपये वापरी. राज्य गेले-घालविले तरी त्याचे दातृत्व गेले नाही. पण त्याची भेट होणे मुष्कील असे. स्त्रियांच्या घोळक्यात हा असला तर मग भेटीचे नावच नको. पुण्याकडच्या कोणाही माणसाची भेट झाली की, याचा पहिला प्रश्न असे तो हा :-' शनिवारवाडा चांगला आहे ना?' 'वाडा चांगला सारवून ठेवला नि श्रीमंत येण्याची बातमी आहे' असे उत्तर एखादा चतुर इसम देई अन् मग बाजीरावाच्या सढळपणाला मर्यादा रहात नसे. एकदा गव्हर्नर जनरलने त्याला भेटीस बोलाविले. 'आमच्या

कचेरीत ठरलेल्या बंगल्यातच भेटीस यावे ' असा निरोप त्याने लाट-साहेबास धाडला. वाईट एवढेच की, राज्य गेल्यावर त्याला हा स्वाभिमान सुचला.

बाजीरावाची येथील दिनचर्याही सांगण्यासारखी आहे. तो रात्री बाराला उठे. नाक धरून बसणारा असा त्याचा लौकिक प्रथमपासूनच होता. अर्थात हे लवकर उठणे त्या लौकिकास साजेसे होते. नंतर तो विष्णुसहस्रनामाचा पाठ म्हणे. गरम पाण्याने स्नान उरकून सूर्योदय झाला की, होमशाळेत तो अग्निदर्शनास जाई. तिथून मेण्यात बसून भागीरथीचे काठी हा ब्रह्मयज्ञास जाई. वाड्यात आल्यावर झोपाळ्यावर बसून, भाजीपाले व फळफळावांचे नमुने जी मंडळी आणीत त्यांना छोटया देणग्या देई. भाजीपाले कोवळे असले की, याची तबीयत खूष होई. कधी कधी हा पुरोडाश भक्षण करी. बारा वाजता भोजन करी. खाशा पंगतीस १०० मंडळी असत. सगळी मंडळी धरून दिवसा १,८०० पान होई. रात्रीही तितकीच मंडळी भोजनास असत. मुखशुद्धीच्या वेळी हा केळी खाई. भोजनसमयी तो पाणी पीत नसे. भोजनोत्तर तीन चार तास झोपाळ्यावर तो झोप घेई.

बाजीरावाची भोजनाची पंगतही नमुनेदार अन् अगदी रसेली असे. तो स्वतः सोन्याच्या ताटात जेवी. भोवताली सोन्याच्या अठ्ठावीस वाट्या अन् तसलेच अठ्ठावीस चमचे असत. हे ताट-वाटया, अन् चमचे ज्या चौरंगावर असत तो रुप्याने मढविलेला असे. मुलांना जेवणाचे साहित्य चांदीचे असे. स्वैपाकाला फोडणी असे तुपाची. दहा भाज्या, दहा चटण्या, कढी, तूप, असे जेवण असे. इतर पंगतीत रोज पुरण असे. त्यावरून खाशांच्या पंगतीला काय असेल याची कल्पना वाचकांनीच करावी. दररोज एक शेर केशराचा फन्ना होई. बाजीरावाच्या एकादश्या, उपास तापास अन् चतुर्थ्याही चालू असत. दर महिन्यास द्वादशी व

चतुर्थीला स्त्रिया व पुरुष मिळून दोन हजारांचे पान होई. ब्रह्मावर्तास राज्य गेल्यावरही त्याच्या ऐश्वर्याचा हा थाट चालू होता.

ऐन उमेदीत बाजीरावाचा आहारही चांगला असे. उतारवयात तो कमी झाला. भोजन उरकले की, झोप लागेपर्यंत करमणुकीसाठी त्याच्या भोवती बायका–पुरुषांचा गराडा असे. मुखशुद्धीसाठी हा मक्याची कोवळी कणसेही खाई. नंतर रामटेकच्या कळीदार अशा दहा पानांचा विडा खाई. कलकत्त्याहून त्याच्यासाठी खास शहाळी येत ती वेगळीच!

बाजीरावाला पोहण्याचा नाद होता अन् त्यात तो चांगला पटाईत होता. मांडी घालून पोहून तो भागीरथीचे तीर पार करी. याच्या देव्हाऱ्यात एक सुंदर संगमरवरी गणपतीची छोटी मूर्ती असे. पूजेच्या वेळी तो तिजपुढे रोज एक मोहर ठेवी या मूर्तीवर त्याचे पराकाष्ठेचे प्रेम होते. आता ही मूर्ती बिठूरच्या डुबे घराण्यात पहावयास सापडते.

बाजीरावाच्या पोशाखांतही रसिकता असे. येवल्याचे रेशीम अन् चंदेरीचे सूत मिळून त्याचा धोतरजोडा बनलेला असे. ऐन उमेदीत हा रंगीबेरंगी पोशाख करी. उतार वयात याचा पोशाख पांढरा शुभ्र असे. सणासमारंभात हा भरजरी पोशाख परिधान करी. भोवतालची मंडळी त्याला, 'गोकुळात भगवान कृष्ण जन्माला आले' असे म्हणत अन् मग खूष होऊन मुक्तहस्ताने त्यांना तो बक्षिसांची खैर करी. त्याला खूष करण्यासाठी खुषमस्कऱ्यांत नेहमी स्पर्धा असे. जो जास्त यशस्वी होई त्यास त्याप्रमाणे जास्त बिदागी मिळे. एकदा याचा दत्तक मुलगा नानासाहेब याने एक बग्गी विकत घेतली. तेव्हा 'जलचरांची वहाने कशाला घेतली,' असे म्हणून त्याने ती बग्गी मोडून नानास सात हजार रुपयांचा रथ करून दिला. या रथास मोत्यांच्या झालरी होत्या. इंग्रजांचा हा पक्का द्वेष्टा बनला असल्याने नानासाहेब इंग्रजी शिकला तेही त्याला दाद लागू न देता.

बाजीरावाचे ब्रह्मावर्ताचे जीवन असे एकंदरीत भोगमय होते. राज्य गेले तरी भोग त्याला सुटले नाहीत. अनेक छेलछबेल्यांचा उपभोग याने मनःपूत घेतला असला तरी लग्नाच्या बायकाही याने बऱ्याच केल्या. त्याने एकंदर लग्ने केली अकरा. त्यांपैकी सहा पेशवेपदावर असताना केली अन् पाच बिठूर येथे उरकली. याखेरीज रक्षा, नाटकशाळा अन् किती तरी प्रेमपात्रे होती ती वेगळीच.

(१) भागिरथी, (२) सरस्वती, (३) राधाबाई, (४) वाराणसी, (५) वेणुबाई ऊर्फ कुसाबाई, (६) सरस्वतीबाई, (७) सत्यभामा, (८) गंगाबाई, (९) मैनाबाई, (१०) सईबाई, (११) चितळे घराण्यातील एक (नाव उपलब्ध नाही). अशी त्याच्या बायकांची नावे. त्याची पहिली बायको १७९३मध्ये, दुसरी १७९७त व तिसरी १८०६ साली वारली. यासंबंधी श्री. य. न. केळकरांनी आपल्या 'इतिहासातील सहली' (खंड २, १९६४) ग्रंथात, 'बाजीरावाच्या बायका' या प्रकरणात पुढीलप्रमाणे मार्मिक भाष्य केले आहे : 'या वेळी बाजीरावाचे वय ३१ वर्षांचे होते. म्हणजे ते ऐन जवानीत होते. त्यांची लोकविलक्षण कामासक्ती लक्षात घेतली असता त्याच्या तीनही बायकांना तेच भोवले असावेत. त्या बिचाऱ्या चवदा पंधरा वर्षाइतक्याच उमरीच्या असणार !'

तीन बायका निवर्तल्या तरी बाजीराव निपुत्रिकच होता. तेव्हा त्याने पुन्हा चवथे लग्न (१८०६) केले. या चवथ्या स्त्रीस फिटस् येत. अन् वारंवार ती आजारीही पडत असे. जेव्हा तिला मूल होण्याचे चिन्ह दिसेना तेव्हा त्याने पाचव्यांदा बाशिंग बांधले (१८०८). पुढे वाराणसीबाईला पुत्र झाला तो निवर्तला अन् कुसाबाईची कूस काही प्रसवेना तेव्हा त्याने सहावे लग्न केले. अशा रीतीने पेशवेपदावर असताना तीन बायका निवर्तल्यावर त्याने तीन स्त्रिया वंशवेल वाढविण्याच्या इच्छेने केल्या. वंशाचा दिवा असणे ही त्या काळची रूढी मानली तरी बाजीरावाच्या

विषयसेवनाची तीव्रता त्यामुळे खास लपत नाही. पेशवे दप्तराच्या ३२ व्या खंडात पत्र नंबर २३ (२२-२-१८०३) च्या पत्रात, जनार्दन नारायण नावाचा कारकून बाजीरावासाठी मुली शोधण्यासाठी कोकणात गेल्याचा उल्लेख आहे. त्या पत्रात तो कारकून म्हणतो, 'राजश्री विनायक भट खरे यांची कन्या वर्ष ६ सरून सात वर्षं आषाढमासी लागली. ती मूल चांगल्यात दृष्टीस पडली. आणखी दोन मुली—सोमण व यक सहस्रबुद्धे यांच्या नव वर्षांच्या मध्यम प्रतीत आहेत. त्या तूर्त आणीत नाही. भेटी-नंतर त्यांचे स्वरूप वर्णन करीन.' १८०३ रोजी बाजीराव होता अठ्ठावीस वर्षांचा अन् त्यासाठी त्याचा कारकून मुली पहात होता, सात नि नऊ वर्षांच्या. पण त्या वेळी मुलींच्या लग्नाची कमाल वयोमर्यादा असे नऊ. नवरा-नवरीच्या वयातले अंतर, वर बिजवर असला की, अतिशय विषम असे. अर्थातच नवऱ्याच्या अति विषयसेवनामुळे स्त्रिया अकाली मरत. बाजीरावाच्या पहिल्या तीन लग्नाच्या बाबतीतला हाच प्रकार दिसतो. असो. पुढील पाच लग्ने त्याने बिठुरास केली. त्याच्या आठव्या स्त्रीला दोन मुली झाल्या. त्यांतली कुसुमबाई–ऊर्फ बयाबाई–ऊर्फ सरस्वतीबाई आपटे (ज. १६–१–१८४७) दीर्घकाळ हयात होत्या. तात्यासाहेब केळकरांच्या 'तोतयाच्या बंडाच्या' नाटकाचा प्रयोग १९१३ साली पुण्याच्या किर्लोस्कर थिएटरात पहाण्यास त्या उपस्थित होत्या. एवढी लग्ने करूनही बाजीरावाला मुलगा न झाल्याने अखेरीस मुलगे दत्तक घ्यावे लागले. त्यांतलाच एक धोंडोपंत ऊर्फ नानासाहेब पेशवे १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात नावारूपाला आला. बाजीरावाच्या संसाराची शोकान्तिका अशी आहे.

रावबाजीचे ब्रह्मावर्ताचे आयुष्य गंमतीदारपणे चालले होते. आपल्या आजोबाने — थोरल्या बाजीरावाने काय केले अन् आपण काय केले

याची क्षिती त्याला नव्हती. या उभयतांचे स्मरण झाले की, केशवसुतांच्या पुढील काव्यपंक्ती मनात उभ्या रहातात :

‘ त्या शूराने भगवा झेंडा हिंदुस्थानी नाचविला
निजराष्ट्राचे वैभव नेले एकसारखे बढतीला
आणि तुवां रे ?– त्वा नीचाने पाठ आपुली दावुनिया
रणांतुनी पौबारा केला, शेपुट भ्याडा वळवुनिया ’

रावबाजीच्या मृत्यूपूर्वी एक वर्ष आधी (१८५०) सरदार रघुनाथराव विंचूरकर ब्रह्मावर्तास गेले होते. त्यासंबंधी आपल्या ‘ तीर्थयात्रा प्रबंध ’ ग्रंथात त्यांनी पुढील हकीकत सांगितलेली आढळते. प्रथम भेटीत बाजीराव त्यांना म्हणाला, “ आम्ही येथे आल्यापासून आमचे सरदारांपैकी रघुनाथ-राव तुम्हीच येऊन भेटला. येणे करून संतोष वाटतो. ” पुन्हा ते निरोप घेण्यास निघाले तेव्हा बाजीराव त्यांना म्हणाला, “ आम्हांसही काशीयात्रेस जाणे आहे. तुम्ही आमचे बरोबर चालावे. ” रघुनाथरावांनी आपल्या वडिलांच्या अस्थी प्रयागला टाकावयाच्या आहेत असे म्हटले. त्या सुमारास त्यांची पत्नीही निवर्तलेली होती. ते स्मरून “ बरे तर. लौकर यात्रा करून परत यावे याच मुक्कमी तुमचे लग्न कर्तव्य आहे. ” असे म्हणून त्याने त्यांना भोजनास बोलावून — पोशाख वगैरे देऊन सन्मानाने निरोप दिला.

उतारवयात बाजीरावाची प्रकृती फार थकत गेली. महाराष्ट्र पुन्हा एकदा डोळे भरून पहाण्याची त्याची फार इच्छा होती. त्याला अर्धांग-वायूही झाला अन् मग इंग्रजांना स्वराज्याचे दान करणारा रावबाजी ब्रह्मावर्तास २८ जानेवारी १८५१ रोजी मंगळवारी सकाळी ८ ते ९ च्या दरम्यान मृत्यू पावला. सरदार विंचुरकर त्यासमयी तिथे उपस्थित होते. त्या वेळचे वर्णन त्यांनी ‘ तीर्थयात्रा प्रबंधा ’त पुढीलप्रमाणे केले आहे : ‘ या प्रसंगी प्रत्येकास फार दुःख झाले ! शेकडो ब्राह्मणांची कुटुंबे अन्नदाता

गेला असे पाहून तोंडात माती घालू लागली ! गावातील संपूर्ण लोक दुकानातील सर्व व्यापार बंद करून तेथे जमले. एकंदर पंधरा हजारांवर मनुष्ये त्यांच्या समीपतेसमयी एकसारखा शोक करीत होती ! नंतर नानासाहेब यांनी त्यांस अग्निसहवर्तमान भागिरथीतीरी नेऊन त्यांचा उत्तरविधी जसा कर्तव्य तसा केला. ' बाजीरावाच्या निधनाचे विंचूरकरांचे वरील वर्णन हृदयस्पर्शी असले तरी त्याच्या मृत्युसमयी थोरल्या बाजीरावाचे स्मरण होऊन केशवसुतांच्या पुढील काव्यपंक्ती आठवतात :

' निजनामाचा ' गाजी ' ऐसा अर्थ उरवुनी तो गेला
तर हळहळली आर्यमाउली ऐकुनि त्याच्या निधनाला !
मरणा आधिच मरून आणुनि काळोखी निज राष्ट्राला
तू मेलासी करून ' पाजी ' अहह पितामह–नामाला '

बाजीरावाच्या मृत्यूनंतर सहा वर्षांनी १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध झाले अन् त्यांत समग्र पेशवेकुळ नष्ट पावले. त्यातील वीर नानासाहेब पेशवे केव्हा मेला याचा पत्ता आजतागायत लागलेला नाही. रावबाजीची कन्या बयाबाई आपटे वाराणशीस दि. १९–६–१९१७ रोजी मृत्यू पावल्या. त्यांचे सौभाग्यलेण्यांसहचे छायाचित्र ' सह्याद्रि ' मासिकात (१९४२) पहावयास सापडते तर त्यांचे ' सोवळ्या ' झाल्यावरचे चित्र पारसनिसांच्या इतिहास संग्रह मासिकांत आढळते. त्यावरून त्या चांगल्या सुस्वरूप असाव्यात असे दिसते. दुसऱ्या बाजीराव पेशव्याच्या कुटुंबासंबंधीची माहिती इतिहासचार्य राजवाड्यांनी १२–२–१९१३ च्या ' केसरी'त दिली आहे ती वाचण्यासारखी आहे. बयाबाई आपटे १९१७ साली निवर्तल्यावर ' संदेश 'कार अच्युत बळवंत कोल्हटकरांनी ' संदेश ' पत्रात ' शेवटची वेल सुकली ' हा मृत्युलेख लिहिला आहे, तो कोण्याच्याही डोळ्यास पाणी आणील असा आहे. त्या वेळी त्यांनी म्हटले : ' मराठी राज्याचा इतिहास प्रतापवंत शिवाजी महाराजांपासून

सुरू झाला व प्रतापहीन बाजीरावाशी संपला. मराठी इतिहासाचे पहिले कव्हर शिवाजी आहे व शेवटचे मलपृष्ठ बाजीराव आहे.'

आमच्या सगळ्या संशोधकांनी शेवटच्या बाजीरावाचा चांगला समाचार घेतला आहे, सगळ्यांच्या रोषास तो पात्र ठरला आहे. पण अपवाद असावयाचा. त्यालाही एक भक्त भेटलाच अन् ते म्हणजे आमचे महाराष्ट्र सारस्वतकार वि. ल. भावे. यांनी आपल्या 'मराठी दफ्तर'च्या दुसऱ्या रुमालाच्या (१९२२) प्रस्तावनेत रावबाजीवर स्तुती-सुमने उधळली आहेत. अर्थात त्यांची ही रावबाजी स्तुती रियासतकार सरदेसायांनाही मान्य झाली नाही अन् त्याबद्दलचा निषेध त्यांनी आपल्या 'संसारयात्रे'त नमूद केलेला आहे.

मराठी राज्य गेल्याबद्दल—घालविल्याबद्दल अनेकांनी बाजीरावाला दोष दिला आहे. पण त्याला त्याचे काहीच वाटत नाही. तो काय म्हणतो पहा, "ईश्वराने राज्य घालविण्यास मला उत्पन्न केले. माझा काय इलाज आहे. राज्य गेले यात लोकांचे मी काय नुकसान केले?" बाजीराव कर्तृत्वशून्य ही गोष्ट तर खरीच, पण राज्यनाशास तो एकटाच जबाबदार होता काय हा प्रश्नही विचार करण्यासारखा आहे. यासंबंधी इतिहासाचार्य वि. का. राजवाड्यांनी व्यक्त केलेला अभिप्राय (ऐतिहासिक प्रस्तावना, खंड ३ रा, पृ. १८४, १९२८) पुढीलप्रमाणे आहे :

'१७९६ पासून १८१८ पर्यंत बाजीरावाच्या कारकीर्दीत दंगेधोपे, परस्पर मत्सर, देशद्रोह, यादवी, भ्रष्टाचार वगैरे सर्व काही प्रकार होऊन शेवटी भरतखंडातील सत्ता नष्ट होण्याची वेळ आली. दुष्ट, भ्रष्ट, भेकड, अविश्वासी, कर्तृत्वशून्य असा जो बाजीराव त्याचा जर द्वेष सर्व सरदारांना झाला होता तर त्याला काढून किंवा, दाबात ठेवून मराठ्यांची संयुक्त सत्ता राहिली नसती असे नाही. शिंदे, होळकर, गायकवाड, भोसले, पटवर्धन वगैरे सरदारांची इभ्रत संयुक्तसत्ता तोलून धरण्याइतकी नव्हती

अशी काही गोष्टी नव्हती. महाराष्ट्रातील शिलेदार, सुखवस्तू लोक, साधू, संत, भिक्षुक, शास्त्री कोठे पळून गेले होते अशांतलाही प्रकार नव्हता; परंतु परस्पर विश्वास, देशाभिमान वगैरे जे राष्ट्रीय नितिमत्तेचे मुख्य घटक त्यांची सर्वत्र वाण पडल्यामुळे ह्या सरदार व मुत्सद्दी मंडळांनी बाजीराव ब्रह्मावर्तास गेलेला सुखाने पाहिला.'

□ □ □



८. रणशूर रणजितसिंग

भारताच्या इतिहासात दोन रणजतसिंग प्रसिद्ध आहेत. एक महान योद्धा म्हणून प्रख्यात पावला तर दुसऱ्याने क्रिकेटचे क्षेत्र गाजविले. एक रणांगणावर लढला तर दुसरा क्रीडांगणावर. दोघेही इंग्लिशांना आवडत. एकाच्या शौर्याबद्दल त्यांना कौतुक वाटायचे तर दुसऱ्याच्या क्रिकेटनैपुण्याबद्दल त्यांना आदर वाटायचा.

दि. १४ नोव्हेंबर १७८० रोजी रणशूर रणजितसिंगाचा जन्म झाला. त्याच्या वडिलांचे नाव महासिंग आणि आईचे नाव बिबी राजकौर. अवघा दहा वर्षांचा असतानाच लढाईच्या धुमश्चक्रीत हा पित्याबरोबर हत्तीच्या अंबारीत असायचा. तेराव्या वर्षी हा गादीवर आला. पंजाबात त्या वेळी शीखांची लहानलहान बरीच राज्ये होती ती एकत्र करून रणजितसिंगाने 'खालसा' नावाचे एक स्वतंत्र अन् संघटित असे एक राज्य बनविले.

नुसते राज्य स्थापूनच रणजितसिंग थांबला नाही तर त्याने त्याचे रूपांतर सुराज्यात केले. राज्यात त्याने निधर्मी राजवटीचा प्रयोग केला. हेही याचे एक वैशिष्ट्य म्हणून सांगता येईल. याचा मुख्य प्रधान अझीझुद्दीन मोठा कर्तबगार होता. अंतर्गृहाची देखरेख खुशालसिंगाकडे याने

सोपविली होती. त्याच्या सैन्यात डोग्रा, गुरखे, हिंदु, मुसलमान, शिख, फ्रेंच, इटालियन, अमेरिकन अन् रशियन वगैरे भिन्न धर्मीय अन् परदेशी सैनिकही होते. एकदा याच्या पथकाने एका इंग्रज पलटणीवर हल्ला केला. पण त्या चकमकीत इंग्रज सैनिकांचे शास्त्रोक्त डावपेच पाहून याच्या मनावर फार परिणाम झाला अन् त्याचेच फळ म्हणजे त्याने तयार केलेली पाश्चात्य धर्तीची फौज. नेपोलियनच्या तालमीत तयार झालेले सरदार त्याने आपल्या पदरी ठेवले आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली याने आपल्या सैन्यास शिक्षण दिले. इंग्रजांच्या प्रचंड सैनिकी-सामर्थ्याची त्याला सतत जाणीव होती. युरोपियन पद्धतीवर तयार केलेले त्याच्यापाशी सुमारे ऐंशी हजार सैनिक होते. त्या काळीही त्याच्यापाशी साडे-तीनशेहून जास्त तोफा होत्या. त्याच्या ऐन उत्कर्षाच्या काळात मराठेशाही अस्तंगत झाली होती आणि रावबाजी इंग्रजांच्या हातावर मराठी राज्याचे उदक सोडून ब्रह्मावर्तास चालते झाले होते. त्याबद्दल हा हळहळे. इंग्रजांना या देशात पाय ठेवण्यास अवसर मिळू नये अशी त्याची तीव्र इच्छा असायची. इंग्रजांचा पूर्ण पराभव करा असे त्याचे सल्लागार त्यास म्हणत तेव्हा तो विषादाने म्हणावयाचा, "मराठ्यांचा तो दोन लाख भाला आज कोठे आहे?"

रणजितसिंगाला पंजाबचा सिंह म्हणत. चणीने हा लहानसा होता. पोशाखाकडे याचे बिलकुल लक्ष नसायचे. देवी आल्यामुळे त्याचा एक डोळा निकामी होऊन एकाक्ष होण्याचा प्रसंग याच्यावर ओढवला. एका गृहस्थाने त्याचा प्रधान अझीझुद्दीन याला म्हटले,

"तुमचा राजा कुठल्या डोळ्यानं आंधळा आहे?" त्यावर प्रधानानं म्हटलं, "त्याचा चेहरा जवळून पहाण्याचं धैर्य मला अजून होत नाही, त्यमुळं कुठल्या डोळ्यानं तो आंधळा आहे ते मी कसं सांगणार?" या आख्यायिकेवरून रणजितसिंगाच्या दराऱ्याची कल्पना येते.

उत्तम बंदुकी अन् उमद्या अश्वांचा रणजितसिंगाला भारी नाद. एखाद्या किल्ल्यात एखादी बंदूक आहे असे समजले की ती पैदा करण्यासाठी तो किल्ला सर केल्याशिवाय स्वस्थ बसत नसे. शहाजहानचा कोहिनूर हिरा याच्यापाशीच होता. हा हिरा आपल्या पश्चात पुरीचे जगन्नाथास देण्याची त्यांची इच्छा होती, पण नंतर तो हिरा इंग्रजांनी बळकाविला. इंग्रजांनी त्याच्या शौर्याची कल्पना असल्याने ते त्याला ओळखून होते. उभयतांचा तह झाल्याने दोघांत वैर कधी माजले नाही. तरी इंग्रजांची कारस्थाने तो नेहमी ओळखायचा. सदैव सावध असल्यामुळे त्याला त्रास देण्याची छाती इंग्रजांना कधी झाली नाही. सतत चाळीस वर्षे अविश्रांत श्रम करून त्याने शीखांचे स्वतंत्र राज्य चांगलेच भरभराटीस आणले. सर लेपेल ग्रिफिन या ग्रंथकाराने त्याच्याबद्दल म्हटलेले आहे : 'रणजितने आपले राज्य लष्करी दराऱ्यावर व शिस्तीवर स्थापन केले. त्याचा राज्यकारभार व्यवस्थित होता. पण त्याच्या पश्चात हे गुण कोणाच्याच अंगी नसल्याने सहा वर्षांत शिखांचे राज्य ढासळून पडले. इंग्रजांच्या वाढत्या वर्चस्वाची याला कल्पना होती, जाणीव होती. एकदा सरदारांपाशी बोलत असताना पुढ्यातल्या नकाशाकडे पाहून त्याने विचारले, हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत काढलेल्या या लाल रेघा कसल्या हो ?"

" लाल रेघांचा मुलूख इंग्रजांचा आहे." सरदार मंडळी बोलली.

" आता हे सर्वच लौकर लाल होणार" असे बोलून त्याने रागाने नकाशा भिरकावून दिला.

रणजितसिंगाचा खजिना नेहमी पैशाने तुडुंब भरलेला असायचा. त्यात भर पडली नाही तर तो कष्टी होत असे. मग मंडळी त्याला विचारीत, " महाराज आपली मुद्रा आज अशी खिन्न का ? "

" काय सांगू ! दिवस मावळत चालला पण मोतीमंदिरात आज पैचीही भर नाही. "

" महाराज चिंता कशाला करता? आमचा पैसा आपला. हवा तेव्हा घ्या. " जवळची मंडळी म्हणत. नंतर तो त्यांच्याकडून लेखी दस्तऐवज लिहून घेई. आणि दुसऱ्या दिवशी माणसे पाठवून त्यांच्याकडून पैसा आणून खजिन्यात जमा करी. फौजेसाठी पैसा गाठी असणे आवश्यक असल्याने अशा युक्त्या त्याला योजाव्या लागत. इंग्लंडच्या राजाला एक भव्य तंबू बहाल करून त्याने राजघराण्याशी चांगले संबंध ठेवले होते. इंग्रजही त्याचा घोड्यांचा षौक पाहून त्याला इंग्लंडमधून खास घोडे नजर करीत. त्याच्या राज्याचे उत्पन्न सालीना सुमारे अडीच तीन कोटींचे होते. आपल्या निधनोत्तर चाळीस लाख रुपये धर्मादायात खर्च व्हावेत अशी त्याची इच्छा होती.

रणजितसिंग जसा शूर, साहसी, उदार आणि धूर्त होता तसाच रसिकही होता. मदिरा अन् मदिराक्षींच्या क्षेत्रातही तो मागे नव्हता. उतारवयात त्याला अर्धांगाचा झटका आल्यावर खुणेने तो सर्व व्यवहार करी. शरीर थकले तरी बुद्धी शाबूत होती. पुन्हा एकदा अर्धांगाचा झटका आला आणि मग या पराक्रमी रणजितसिंगाचा अंत दि. २७ जून १८३९ रोजी झाला. त्याच्या मृत्यूने इंग्रजांनाही दुःख झाले. त्याच्या सन्मानार्थ त्याच्या वयाच्या संख्येइतक्या (५९) एकूणसाठ तोफांची सलामी इंग्रजांच्या लष्करी छावण्यातून देण्यात आली. रियासतकार सरदेसाई यांनी रणजितसिंगाबद्दल पुढीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे : " रणजितसिंगाच्या पिढीत समग्र आशिया खंडात त्याच्याएवढा पराक्रमी पुरुष दुसरा कोणी निपजला नाही. त्याने आपणास स्वतंत्र राजा असे म्हणवून न घेता भाषणात व लेखात 'शीख खालसाचा पुढारी' एवढेच पद स्वीकारले. "

या रणशूर रणजितसिंगाच्या स्मृतीप्रीत्यर्थ भारत सरकारनेही अलीकडेच (१९६६) पोस्टाचे तिकीट त्याचे छायाचित्र छापून प्रसिद्ध केले.

□ □ □

प्रमुख संदर्भ साहित्य

(१) New History of The Marathas–G. S. Sardesai Vols. 2 & 3 1958 & 1948
(२) Chhatrapati Shahu (unpublished)–Dr. B. G. Kunte, 1964
(३) Madhavrao Scindia–H. G. Keene-1891
(४) Mahadji Scindia–(unpublished) Dr. M. S. Agaskar. (1965)
(५) Poona in Bygone Days–D. B. Parasnis (1921)
(६) Nana Phadnis–Dr. Y. N. Deodhar–1962
(७) Bajirao I The Great Peshwa–C. K. Srinivasan, 1961
(८) Peshawa Bajirao I Maratha Expansion–Dr. V. G. Dighe, (1944)
(९) Bajirao II And The East India Company–P. C. Gupta–1939
(१०) The Last Peshwa And The English Commissioner–Dr. P. C. Gupta–1944
(११) Ranjit Singh–Sir L. Griffin–1892.
(१२) A History of the Maratha People 3 Vols, Kincaid–Parasnis– (1918, 1922 and 1925)
(१३) A History of The Mahrattas–Grant Duff. Vol. 1 (1826)
(१४) **मराठी, मुसलमानानी ब्रिटिश रियासती** – गो. स. सरदेसाई – १९५८, १९३२, १९५२, १९५३, १९५४, १९३९.
(५) **छत्रपति थोरले शाहू महाराज यांचे चरित्र** –चिं. ग. गोगटे– (१८९३)

(१६) **ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर चरित्र** – द. ब. पारसनीस (१९००)
(१७) **ऐतिहासिक पत्रबोध** – संपादक गो. स. सरदेसाई (१९६३)
(१८) **इतिहास-मंजरी** – द. वि. आपटे – (१९२३)
(१९) **महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास** – द. वि. आपटे-ओतूरकर (१९४१)
(२०) **पेशवे दप्तर खंड** – ४, १७, १८, ३०, ७, ८ (स. १९३०–१९३४)
(२१) **महादजी शिंदे चरित्र** – वि. र. नातू – १८९४
(२२) **नाना आणि महादजी** – चिं. ग. भानू – १८९५
(२३) **महादजी शिंदे चरित्र** – बा. रा. मावळंकर – १९५६
(२४) **महादजी शिंदे चरित्र** – सौ. प्रतिभा चितळे १९६५
(२५) **नाना फडणविसांचे चरित्र** – वासुदेवशास्त्री खरे (स. १९२७)
(२६) **महादजी शिंदे यांची कागदपत्रे** – संपादक गो. स. सरदेसाई (स. १९३७)
(२७) **बायजाबाई शिंदे चरित्र** – द. ब. पारसनीस, १९०२
(२८) **ऐतिहासिक पोवाडे** – य. न. केळकर, २ खंड १९२८, १९४४
(२९) **आनंदीबाई पेशवे चरित्र** – चिं. ग. कर्वे १९३८
(३०) **मंत्र्युत्तम नाना फडनवीस उत्सवपन्नाशी व शकावली-संपादक** – के. वि. जोशी १९५०
(३१) **ऐतिहासिक प्रस्तावना** – वि. का. राजवाडे १९२७
(३२) **' सह्याद्रि ' बाजीराव अंक** १९४०
(३३) **दुसऱ्या बाजीरावाच्या** आठवणी – शं. ना जोशी,
भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक,
वर्ष १८, अंक ४, १९३८
(३४) **पेशवेकालीन महाराष्ट्र** – वा. कृ. भावे. १९३५

□ □ □

अरविंद टाटके यांची ग्रंथसंपदा

प्रकाशित

१. संशोधक सप्तर्षी

२. पंडित मोतीलाल

३. डॉन ब्रॅडमन

४. ना. गो. कृ. गोखले

५. विश्वविख्यात क्रीडारत्ने

६. गाजलेले फलंदाज

आगामी

१. भारतीय क्रिकेटपटू

२. मोंगल बादशहा

३. मराठ्यांचे छत्रपती

४. पेशव्यांची प्रभावळ

५. ब्रिटिश इतिहासकार

अरविंद ताटके हे चतुरस्त्र लेखणीचे नवोदित लेखक आहेत. क्रिकेटवर जशी त्यांची लेखणी चालते तशीच राजकीय व्यक्तिचित्रेही त्यांनी खुमासदार लिहिली आहेत. गोखले जन्मशताब्दि निमित्ताने त्यांनी नामदार गोखलें यांचे चरित्रहि नवीनच प्रसिद्ध केलें आहे. इतिहासाचा व्यासंगहि त्यांचा दांडगा आहे. 'इतिहासातील स्मृतिचित्रे' ह्या पुस्तकातील व्यक्तिचित्रे जशी उद्बोधक आहेत तशीच मनोरंजकहि झाली आहेत. ताटके यांची अशीच काही व्यक्तिचित्रे आम्ही ह्यापुढेहि प्रसिद्ध करणार आहोत

श्री विद्या प्रकाशन
पुणे.